मासिक वार्तापत्र • अंक 36 • ऑगस्ट 2024 • सहयोग मूल्य : रु. 10 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


विशाळगड हिंसाचार: धार्मिक तणावाचे बीज रोवून निवडणुकीत मतांचे पीक काढण्याचे राजकारण! 5

एन.टी.ए. अंतर्गत केंद्र आणि राज्यस्तरीय भरती आणि परिक्षांमध्ये घोटाळे! 9

धीरूभाईपासून मुकेशपर्यंत : अंबानींच्या उदयात सरकारी यंत्रणेचा सहभाग 12


## भाजपसहित काँगेस व इतर सरकारांचाही कामगार अधिकारांवर जोरदार हल्ला! सर्वपक्षीय सरकारे गुंतली भांडवलदारांपुढे स्वत:ला सिद्ध करण्याच्या स्पर्धेत!

## उदारवाद्यांबद्दलचे भ्रम सोडा! क्रांतिकारी परिवर्तनाचा मार्ग धरा!

**संपादक मंडळ**

केंद्रातील मोदी (एन.डी.ए.) सरकार, आणि कर्नाटक, तामिळनाडू आदी राज्यातील “उदारवादी” काँग्रेस व द्रमुक सरकारांमध्येच नव्हे तर देशभरातील सर्वपक्षीय सरकारांमध्ये कामगारांच्या हक्कांवर हल्ला करण्यात, भांडवलदारांचे हित जपण्यात अहमहमिका लागली आहे. फॅशिस्ट भाजपच्या धर्मवादी अजेंड्याला नाकारत उदारवादी पक्षांकडे आस लावून बसलेल्या कामगार, कष्टकरी, विद्यार्थी, युवकांनी हे समजले पाहिजे की भांडवलदारांनी पोसलेल्या भाजप, काँग्रेस, द्रमुक, सीपीएम, राकाँ, शिवसेने सारख्या कोणत्याही पक्षाकडे आज आपल्याला द्यायला काहीच नाहीये, उलट नफ्याच्या दराच्या घसरणीच्या आर्थिक संकटाच्या दबावात ते दिवसेंदिवस आपल्या हक्कांवर हल्ले करत, आपले अधिकाधिक शोषण, लूट करण्याची परवानगी त्यांच्या भांडवलदार मालकांना देत जाणार आहेत.

जगाच्या अर्थव्यवस्थेसोबतच, भारताची अर्थव्यवस्था सुद्धा आता भांडवलशाहीच्या अंगभूत संरचनागत संकटाची, म्हणजे नफ्याच्या घसरत्या दराच्या संकटाची शिकार झाली आहे. अशामध्ये भांडवलदार मालकांना गुंतवणुकीवर परताव्याची हमी देण्याकरिता त्यांनी पोसलेल्या विविध पक्षांच्या सरकारांपुढे एकच मुख्य मार्ग आहे, आणि तो म्हणजे कामगारांचे शोषण अधिक वाढवणे. निवडणुकांपुरते धर्म, जात, प्रांत असे वाद पुढे आणणारे सर्व भांडवली पक्ष मात्र कामगार विरोधी धोरणे राबवण्यात एकजूट, एकमत आहेत हे स्पष्टपणे दिसून येत आहे.

2024 लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जागा कमी झाल्यानंतर, आणि एन.डी.ए. आघाडीचेच सरकार बनवावे लागल्यानंतर फॅशिस्ट भाजपची आता गरज बनली आहे की आपल्या मालकांपुढे, बड्या भांडवलदार वर्गापुढे, आपली पत पुन्हा सिद्ध करावी. याकरिता केंद्र सरकारने नुकतेच चार कामगार (विरोधी!) कायद्यांची अंमलबजावणी पुढे नेण्याकरिता तळवेचाटू कामगार युनियन्सच्या प्रतिनिधींसोबत एक सल्लामसलतीचे सत्र बोलावले होते. केंद्रिय मंत्री मंसुख मंडाविया यांनी सेवा युनियन आणि संघ परिवाराच्या भारतीय़ मजदूर संघासोबत चर्चा केल्या. सीटू, आयटक सहित इतर युनियन्ससोबत बोलणे केले जाणार आहे अशी बातमी समोर आली आहे.

या चार कामगार कायद्यांमुळे काय होईल याबद्दल आम्ही कामगार बिगुल मध्ये अगोदरही लिहिले आहे. (पहा, एप्रिल 2023 चा अंक). थोडक्यात मांडायचे झाल्यास या कायद्यांमुळे **किमान मजुरी कमी करण्याची, आणि ती वेळोवेळी न वाढवण्याची सरकारला सवलत मिळेल, ओव्हरटाईमकरिता जास्त दराने मजुरी द्यावी लागणार नाही, बोनस न देण्याची सवलत कंपन्यांना मिळेल आणि अशाप्रकारे कामगारांना अजून स्वस्तात राबवणे शक्य होईल; फॅक्टरी इंस्पेक्टरचे अधिकार संपतील आणि कारखाना मालकांना नियम तोडण्याची सवलत मिळेल; छोट्या कारखान्यांमध्ये आरोग्याच्या सोयी न पुरवण्याची सवलत चालूच राहील; मातृत्व रजा अनेक ठिकाणी धोक्यात येईल; अनियमित-ठेकेदारी पद्धतीने काम करवायला मान्यता मिळेल; संप करणे अत्यंत अवघड करून संपाचा अधिकार संपवला जाईल; कामगारांना मनमर्जीने काढून टाकण्याची मालकांना सवलत मिळेल, इत्यादी. थोडक्यात कामगारांचे अधिकाधिक शोषण करून मालकांना अधिकाधिक नफा ओरबाडण्याची संधी तयार केली जाईल.**

देशातील सर्व भांडवली पक्ष आणि त्यांच्याद्वारे नियंत्रित युनियन्सनी यावर घेतलेली भुमिका आणि भाजप सोडून इतर भांडवली पक्षांनी याच प्रकारची उचललेली पावले हे

पान 6 वर

## सर्वात मोठा विनोद: बजेट 2024! निवांत रहा! निर्मला ताई म्हणाल्या, देशात महागाई नाही! बेरोजगारी सोडवण्यासाठी मोठ्या कंपन्या इंटर्न नेमणार! अजून एक “मास्टरस्ट्रोक”!

**सुप्रीत**

एक मोठे संकट टळले आहे हो! आपल्या “सुज्ञ” आणि “आदरणीय” अर्थमंत्र्यांनी 165 परिच्छेद, 27 तक्ते, आणि 62 पानी अर्थसंकल्पीय भाषणात, महागाईच्या समस्येला नेमके 10 इंग्रजी शब्द समर्पित केले! ते शब्द आहेत:

*"भारताची चलनवाढ कमी, स्थिर आहे आणि 4 टक्के चलनवाढीच्या लक्ष्याकडे वाटचाल सुरूच आहे."*

होय, असेच म्हटले आहे. तुम्ही नुकतीच खरेदी केलेली ₹200 प्रति किलो तूर डाळ, तुम्ही नुकतेच केलेले ₹300 प्रति महिना रिचार्ज, तुम्ही नुकतेच भरलेले ₹104 प्रति लिटर पेट्रोल, ही सर्व “कमी, स्थिर” आणि स्वीकार्य महागाई आहे. त्या खोटे बोलत आहेत हे त्यांनाही माहीत आहे: RBI ने जून 2023 पासून रेपो दर (ज्या दराने RBI बँकांना कर्ज देते तो दर) कमी केलेला नाही. (हा दर वाढवल्याने अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा कमी होतो असे म्हटले जाते.) महागाई झाकून विकास दरांबद्दल खोटे बोलण्यात मदत केल्याचा सरकारला अतिरिक्त फायदा देखील होतो. तुम्ही ऐकले असेल की देशाची अर्थव्यवस्था (जी.डी.पी.) गेल्या वर्षी 8 टक्क्यांनी वाढली आहे. देशाच्या मुख्य आर्थिक सल्लागाराचा अंदाज आहे की या वर्षी वाढ सुमारे 6.5-7 टक्के असेल. असे "प्रभावी" विकास दर कोठून येत आहेत? महागाईला कमी लेखून ते काढले गेले आहेत. जी.डी.पी. हे एका वर्षात देशाद्वारे बाजारपेठेसाठी उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांच्या बेरजेचे मोजमाप आहे. उच्च चलनवाढ म्हणजेच उच्च किमतींमुळे आपोआपच जी.डी.पी. अंदाज उच्च येतो (वाढीचा दर मोजताना सरकार चलनवाढीसाठी "डिफ्लेटर" लागू करते. परंतु हे डिफ्लेटर हास्यास्पदरीत्या कमी आहेत. 2023-24 साठी उत्पादन क्षेत्रासाठी डिफ्लेटर 1.7 टक्के होते घाऊक महागाई 3.4 टक्के , ग्राहक निर्देशांक महागाई (सी.पी.आय.) 9.4 टक्के होती, तेव्हा सरकार 10 टक्के वाढीचा दावा करू शकले!) आणि अमित शहा सारख्या विद्वानांना सर्व काही गुलाबी आहे आणि भारत 5 ट्रिलियन “टन” अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे असा अभिमान बाळगू देतो!

यापैकी काहीही आश्चर्यकारक नाही. किंबहुना, कांद्याच्या वाढत्या किमतींबद्दल प्रश्न विचारला गेला, तेव्हा मी कांदे खात नाही म्हणून मला हे माहीत नाही, असा दावा करणाऱ्या मंत्र्याकडून काही अर्थपूर्ण अपेक्षा करणे मूर्खपणाचे ठरेल!

### नोकऱ्यांना नकार, कॉर्पोरेट टॅक्स-ब्रेकला होकार!

अर्थसंकल्पीय भाषणाच्या पान 7 मध्ये, निर्मला ताईंनी विकसित भारतसाठी “तपशीलवार रोडमॅप” सादर केला आहे आणि “सर्वांसाठी भरपूर संधी निर्माण करण्यासाठी” 9 प्राधान्यक्रमांची रूपरेषा दिली आहे. प्राधान्य क्रमांक 2 हे “रोजगार आणि कौशल्य” आहे, ज्यामध्ये सरकारने

पान 13 वर

## सर्वात मोठा विनोद: बजेट 2024!

पान 13 वरून

पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरणे आणि नवीन शाळा-महाविद्यालये सुरू करणे अपेक्षित आहे. आरोग्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूदींमध्ये नगण्य वाढ झाली आहे. आंध्र प्रदेश आणि बिहारला सुमारे 65,000 कोटी आणि 59,000 कोटी रुपये टीडीपी आणि जेडीयू च्या पाठिंब्याच्या बदल्यात दिले गेले आहेत. हीच परिस्थिती राहिली तर येत्या चार वर्षांत चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार (आणि त्यांचे भांडवलदार मित्र) केंद्राकडूनही अशाच अधिक 'भेटवस्तू' काढतील याचीच दाट शक्यता आहे. त्यांच्यासाठी एनडीए आता सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे, आणि ते तिला अशी सोडणार नाहीत.

अर्थसंकल्पीय दस्तऐवजात अनेक लबाड आणि अनेक पोकळ विधाने आहेत (ज्यांच्याकरिता तरतूदी नाहीत) ज्यात आपल्याला जाण्याची गरज नाही. सारांश असा आहे की अर्थसंकल्पात सामाजिक आणि आर्थिक संकट अधिक वाढवण्याचे आश्वासन दिले गेले आहे! यामुळे बेरोजगारी वाढेल, सार्वजनिक आरोग्य, पायाभूत सुविधा खालावतील, आधीच ढासळलेल्या सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेला आणखी एक धक्का बसेल आणि या देशातील आणखी हजारो कामगार आणि तरुणांचा जीव जात राहील. देशाच्या "भविष्यासाठी" हा मार्ग बड्या भांडवलदारांनी जाणीवपूर्वक निवडला आहे. सर्वांना समान आणि मोफत शिक्षण आणि सर्वांना रोजगार उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. खरेतर वित्तीय तुटीचा नाद सोडणे, अनुत्पादक खर्चाचे पुनर्निर्देशन (संरक्षण, गृह-व्यवहार, अवाजवी पगार, नोकरशहा आणि राजकारण्यांना पेन्शन आणि भत्ते इ. कमी करणे) करून तो खर्च शिक्षण, आरोग्य सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उपक्रमांवर करणे आणि त्याकरिता देशातील कोट्यधीश आणि अब्जाधीश यांच्यावर संपत्ती कर आकारणे यातून जनतेला थोडा दिलासा नक्कीच मिळू शकतो. पण भांडवलदार वर्ग 8 टक्के संपत्ती कर देण्यापेक्षा दरवर्षी 4500 मुले कुपोषणामुळे मरू देईल!

आर के लक्ष्मणच्या व्यंगचित्रात एकदा असे म्हटले होते की बजेटबद्दल कोणीही नेहमी म्हणू शकतो की "गरीबांना निराश केले जाते, पगारदार वर्गाला फटका बसतो आणि तो श्रीमंतांची सेवा करतो". भांडवली समाजात कोणत्याही अर्थसंकल्पाकडून अपेक्षा करण्यासारखे दुसरे काहीही नसते.

## वाचकांप्रती दिलगिरी

कामगार बिगुल चा हा छापील अंक अनेक महिन्यांच्या कालावधीनंतर प्रकाशित होत आहे. या कालावधीत मुद्रीत कामगार बिगुलची नियमितता टिकवू न शकल्याबद्दल आम्ही वाचकांचे दिलगीर आहोत. या काळातील अनेक घडामोडींवरील लेख marathi.mazdoorbigul.net वर उपलब्ध केलेले आहेत. पुढील काळात दर महिन्याला अंक प्रकाशित व्हावा याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत.

- संपादक मंडळ

### 'कामगार बिगुल'चे सर्व वाचक आणि हितचिंतक यांना आवाहन

'कामगार बिगुल'च्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना आमचे आवाहन आहे की जर आपण या प्रकाशनाचे महत्त्व समजत असाल आणि जनतेचे प्रसारमाध्यम उभे करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक आवश्यक भाग मानत असाल, तर खालील मार्गांनी 'कामगार बिगुल' सुरू ठेवण्यात आम्हाला साथ द्या:

1. कामगार बिगुलची वार्षिक, पंचवार्षिक वा आजीवन सदस्यता घ्या.
2. जर तुमची सदस्यता संपली असेल, तर तिचे नुतनीकरण करा.
3. 'कामगार बिगुल' चे वितरक बना. याला जास्तीत जास्त संख्येने कामगार-कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात तुमची भूमिका बनवा.
4. 'कामगार बिगुल' करिता नियमित आर्थिक सहयोग द्या.

आम्ही जनतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो आणि आमच्या अनुभवाने सिद्ध केले आहे की कोणतीही तडजोड न करता, एका विचाराने जोडलेल्या लोकांची एकत्र मेहनत, आणि सहयोगाच्या जिवावर मोठी कामं होऊ शकतात. याच शक्तीच्या आधारावर गेली अनेक वर्षे कामगार बिगुल प्रकाशित होत आहे. तुम्ही साथ द्याल, याचा विश्वास नक्कीच आहे.

### बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा :
http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp
चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :
9892808704



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

साथींनो
'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर : 74992 64646
• पुणे : 8669735643

### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# फ्रांस आणि युरोपात उजव्या शक्तींचा उदय : जागतिक आर्थिक संकटाची अभिव्यक्ती

✒ राहुल साबळे

आज भारतातच नाही तर जगभरातील विविध देशांमध्ये उजव्या शक्ती डोकं वर काढत आहेत. काही देशांत उजव्या विचारसरणीच्या पार्श्वा सरकार चालवत आहेत. तर काही देशांत त्या सक्रिय विरोधी पक्ष म्हणून कार्यरत आहेत. गेल्या महिन्यात फ्रांस देशातील संसदीय निवडणुकीचे निकाल फार चर्चेत होते. फ्रांसची 'नॅशनल रॅली पार्टी' जी एक अति-उजव्या विचारसरणीची पार्टी म्हणून ओळखली जाते ती काहीश्या फरकाने निवडणूक हरली; परंतु एक गोष्ट मात्र निश्चित झाली की फ्रांसच्या जनतेच्या मोठ्या हिश्श्याचा तिला पाठिंबा मिळत आहे. यावर या लेखात सविस्तर मांडणी पुढे येईलच. परंतु फक्त फ्रांस एकटा देश नाही तर युरोपातील अनेक देशांत उजव्या शक्तींचा उदय होत आहे. जगाच्या स्तरावर असलेले भांडवली व्यवस्थेचे आर्थिक संकटच, क्रांतिकारी डाव्या पर्यायाच्या अभावात, या उजव्या प्रतिक्रियेला जन्म देत आहे.

### उजवी विचारधारा म्हणजे नेमकं काय?

उजवी विचारधारा किंवा अति उजव्या विचारधारेची काही वैशिष्ट्ये आहेत जी वेगवेगळ्या देशांत तिथल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीनुसार कमी जास्त प्रमाणात आढळून येतात. कामगार वर्गाच्या हितांच्या विरोधात भांडवलदार वर्गाच्या हितांचे समर्थन, संरक्षण आणि त्यांच्या नफ्याची काळजी हे यापैकी सर्वात मोठे व समान वैशिष्ट्य. राष्ट्रवाद (म्हणजे भांडवलदारांचे हित हेच सर्वांचे हित आहे असे मानणे) , स्थलांतरितांना विरोध, लोकरंजकतावाद, पुराणमतवाद, इस्लामविरोध, झेनोफोबिआ (परदेशींना विरोध), वंशवाद ही अशीच काही वैशिष्ट्ये होत.

### फ्रान्स मधील संसदीय निवडणुका

फ्रांसमधील संसदेच्या वरच्या सभागृहाला सिनेट आणि खालच्या सभागृहाला नॅशनल असेंब्ली म्हणतात. नॅशनल असेंब्लीचे सदस्य सामान्य जनतेद्वारे निवडले जातात, तर सिनेटचे सदस्य नॅशनल असेंब्लीचे सदस्य आणि अधिकारी(मुख्यत्वे स्थानिक लोकप्रतिनिधी) निवडतात. 2017 पासून फ्रांसचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आहेत; जे रेनेसाँ पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. 'रेनेसाँ' हा एक मध्यममार्गी, प्रगतीशील, आर्थिक उदारमतवादी, युरोपियन युनियनच्या धोरणाला पाठिंबा देणारा आणि सामाजिक पुरोगामीत्वाचा पुरस्कार करणारा पक्ष आहे. तो 'एंसेंबल अलायन्स' युतीचा भाग आहे ज्यात थोड्याफार फरकाने एकाच प्रकारची विचारधारा असलेले पक्ष सामील आहेत. दुसरीकडे, प्रगतीशील सामाजिक धोरणे, पर्यावरणीय समस्या आणि कल्याणकारी सुधारणांना प्राधान्य देणाऱ्या काही डाव्या पक्षांची युती आहे जी 'न्यू पॉप्युलर फ्रंट' नावाने अस्तित्वात आहे. फ्रान्समध्ये तिसरा सर्वात मोठा गट आहे 'नॅशनल रॅली' जो अति-उजव्या विचारधारेचा म्हणजे राष्ट्रवादी, स्थलांतर विरोधी, युरोपियन युनियनचा टीकाकार, आर्थिक संरक्षणवादी, अल्पसंख्याक विरोधी पक्ष आहे.

मागील महिन्यात फ्रान्समध्ये 577 जागांसाठी संसदीय निवडणूक झाली त्यात डाव्या 'न्यू पॉप्युलर फ्रंट' आघाडीला 182 जागा मिळाल्या. 'एंसेंबल अलायन्स' ला 163 जागा मिळाल्या आणि उजव्या विचारसरणीच्या 'नॅशनल रॅली' ला 143 जागा मिळाल्या. 2022च्या संसदीय निवडणूकीत 'नॅशनल रॅली' ला 89 जागा मिळाल्या होत्या, हा पक्ष 1972 मध्ये अस्तित्वात आल्यापासून फक्त 1986 मध्ये याला 35 जागा मिळाल्या होत्या पण त्याव्यतिरिक्त कोणत्याही निवडणुकीत हा पक्ष 10 पेक्षा ज्यास्त जागा मिळवू शकला नव्हता. पण हे चित्र 2022 मध्ये बदलले आणि 2024च्या या निवडणुकीत या पक्षाने 143 जागा मिळवून इतिहास रचला आहे. जरी फ्रान्समध्ये 'न्यू पॉप्युलर फ्रंट' आणि 'एंसेंबल अलायन्स' हे युती बनवून सरकार चालवणार असले तरी 'नॅशनल रॅली'च्या वाढलेल्या प्रभावाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

गेल्या तीन वर्षांत रेनेसाँच्या इमॅन्युएल मॅक्रॉन यांना फ्रान्समध्ये अनेक लोक विरोधी धोरणे लागू केल्यामुळे टीकेचा सामना करावा लागला आहे, जसे की पेन्शन सुधारणेच्या नावाखाली मॅक्रॉन यांनी सेवानिवृत्तीचे वय 62 वरून 64 वर आणले, ज्यामुळे व्यापक निषेध आणि संप सुरू झाले. स्थलांतर कायद्यात सुधारणा करून अधिकृत कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांना बाहेर काढण्याच्या उद्देशाने कठोर इमिग्रेशन धोरणे लागू करण्यात आली ज्यामुळे जनतेत संतापाची लाट पहावयास मिळाली. मॅक्रॉनने पेन्शन दुरुस्ती सारख्या महत्वाच्या सुधारणांसाठी संसदीय मंजुरीच्या प्रक्रियेला बगल देऊन कायदा पास केला ज्याचा अनेकांनी अलोकशाही म्हणून विरोध केला. 2022 मध्ये संपूर्ण फ्रान्समध्ये पगारवाढ, कामाची परिस्थिती, संपाचा अधिकार, व्यावसायिक उच्च माध्यमिक शाळांमधील सुधारणांच्या विरोधात विद्यार्थी, कर्मचारी, कामगार संघटनांचे देशव्यापी आंदोलन पाहावयास मिळाले ज्यात तब्बल 10 लाख लोक सामील झाले होते. महागाई आणि बेरोजगारी बरोबरच पोलिस हिंसाचार, हवामान बदल धोरणे आणि गृहनिर्माण धोरणे यासारख्या मुद्द्यांवर फ्रांसची जनता वेळोवेळी रस्त्यावर उतरताना आपण पहिलीच आहे.

फ्रांसमधील अति-उजव्यांचा हा उदय त्याचप्रकारे झाला आहे, ज्याप्रकारे भारतात फॅशिस्ट भाजपचा उदय काँग्रेसच्या नव-उदारवादी धोरणांच्या परिणामी झाला आहे. काँग्रेस वा रेनेसाँ सारखे पक्ष उदारवादी धोरणे लागू करून भांडवलदारांचे हित साधताना जी महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार वाढवतात, त्याच्या परिणामी **जनतेत निर्माण झालेल्या असंतोषाच्या लाटेवर खोटा प्रचार करूनच भाजप सारख्या उजव्या शक्तींचा उदय होतो. खऱ्या कामगार वर्गीय क्रांतिकारी पर्यायाच्या अभावी हा उदय तर अधिकच सहजपणे होते.** आज फ्रांसच्या जनतेला प्रचंड प्रमाणात महागाई आणि बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. फ्रान्समधील सर्वात श्रीमंत 10 टक्के कुटुंबांकडे एकूण 47टक्के संपत्ती जमा झाली आहे. यावरून मॅक्रॉनचे सरकार भांडवलदारांच्या नफापूर्तीसाठी काम करत आहे हे स्पष्ट दिसून येते. मॅक्रॉन सरकारच्या विरोधात फ्रान्समधील कामगार कष्टकरी सामान्य जनतेत निर्माण झालेल्या असंतोष आणि संतापाचा फायदा घेत नॅशनल रॅली पक्षाने त्यांची जमीन मजबूत करण्याचे काम गेल्या काही वर्षात केले आहे. नॅशनल रॅली पक्षाने संरक्षणवाद आणि राष्ट्रवादी धोरणांद्वारे वाढती बेरोजगारी आणि आर्थिक असमानता मिटविण्याचे, बेरोजगारीचे कारण देशात वाढत चाललेली प्रवासी कामगारांची संख्या आहे असे सांगून ती कमी करण्यासाठी कठोर कायदे करण्याचे, फ्रान्सच्या संस्कृतीला जपण्याचे, देशाला सार्वभौम बनवण्यासाठी युनियनचे नियंत्रण काढण्याचे अशी अनेक आश्वासने दिली; त्यांनी फ्रांसच्या जनतेला बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचाराचे मूळ तिथली भांडवलदार धार्जिणी धोरणे आहेत हे समजण्यापासून परावृत्त केले आहे आणि प्रवासी कामगार, मुस्लिम अल्पसंख्यांक, युरोपियन युनियनची धोरणे हीच सगळ्या समस्यांची कारणे आहेत असा भ्रम पसरवला, ज्याला फ्रांसची जनता बळी पडली. याचे प्रमाण मागील महिन्यात झालेल्या निवडणुकीत आपल्याला दिसले ज्यात 'नॅशनल रॅली' पक्षाला 24 टक्के मतं मिळाली जी 2022च्या निवडणुकीत 15 टक्के होती. हा पक्ष सत्तेत आलेला नसला तरी त्याची वाढलेली शक्ती हेच दाखवते की फ्रांसमध्ये क्रांतिकारी पर्यायाच्या अभावी जनता उजव्या विचारांकडे झुकत आहे.

### युरोपात उजव्या शक्तींचा उदय

परंतु फ्रांस एकटा देश नाहीये जिथे उजव्या शक्ती डोकं वर काढत आहेत. युरोपमधील इतर देशांतही उजव्या विचारधारेचे समर्थक पक्ष सरकार चालवत आहेत जसे कि इटली मध्ये 'ब्रदर्स ऑफ इटली', फिनलंड मध्ये 'फिन्स पार्टी', हंगेरी मध्ये 'फिडेझ - हंगेरियन सिवीक अलायन्स', क्रोएशिया मध्ये 'क्रोएशियन डेमोक्रॅटिक युनियन', झेक रिपब्लिक मध्ये 'सिवीक डेमोक्रॅटिक पार्टी', स्वित्झर्लंड मध्ये 'स्विस पीपल्स पार्टी' या देशांव्यतिरिक्त जर्मनी, ऑस्ट्रिया, स्पेन, स्वीडन या देशांत अतिउजव्या विचारसरणीचे पक्ष त्या त्या देशांतील सरकारमध्ये एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून अस्तित्वात आहेत. युरोपात नुकत्याच युरोपियन पार्लमेंटची निवडणूक पार पडली. युरोपियन पार्लमेंट हे युरोपातील 27 देशांनी एकत्र येऊन स्थापन केलेले कायदेमंडळ आहे. हे कायदेमंडळ बँकिंग कायदे व व्याजदर, स्थलांतरितांसंबंधी धोरणे, टेक कंपन्या व व्यक्तिगत गोपनीयतेचे स्वातंत्र्य, हरित ऊर्जा, कार्बन उत्सर्जन उद्दिष्टे इत्यादी मुद्द्यांवर एकत्रितपणे निर्णय घेते. जून महिन्यात झालेल्या युरोपियन पार्लमेंटच्या निवडणुकीत फ्रान्स, जर्मनी आणि इटली मधील उजव्या विचारसरणीच्या पक्षाच्या उमेदवारांची वाढ झाली आहे. जवळपास 150 जागांवर असे उमेदवार निवडून आले आहेत ज्यात इटलीमध्ये 'ब्रदर्स ऑफ इटली' आणि फ्रान्समध्ये 'नॅशनल रॅली' आणि जर्मनीतील 'ऑल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' या पक्षांचा समावेश आहे.

युरोपीय देशांमध्ये सतत वाढत चाललेली बेरोजगारी, कमी रोजगार, स्थिरावलेले वेतन व महागाईमुळे त्या त्या देशातील कामगार आणि मध्यमवर्गीयांमध्ये चिंता आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्याने भांडवलदारांची सेवा करणाऱ्या सरकारांवरचा जनतेचा विश्वास कमी झाला असून भ्रमनिरास झालेल्या जनतेला आवाहन करण्यासाठी उजव्या पक्षांना सुपीक जमीन उपलब्ध करून दिली आहे. ते स्वतःला जनतेचे तारणहार म्हणून सादर करत, त्या देशाचे पूर्वीचे वैभव पुनर्स्थापित करण्याचे आश्वासन जनतेला देत आहेत.

युरोपचे आर्थिक आणि राजकीय संकट हाताळताना युरोपियन युनियन द्वारे दक्षिण युरोपातील आर्थिकदृष्ट्या कुमकुवत असलेल्या देशांना बेल आऊट पॅकेज दिले गेले, ज्यासाठी उत्तर युरोपातील काही देशांवर अधिक कर लावण्यात आले होते; परिणामी उत्तर युरोपीय लोकांमध्ये त्यांच्या कराच्या पैशाचा वापर दक्षिण युरोपला सहाय्य देण्यासाठी केल्यामुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, तर दक्षिणेकडील लोकांना उत्तर-युरोपीय देशांकडून लादलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे दडपल्यासारखे वाटत आहे ज्याचा फायदा उजवे पक्ष घेत आहेत. ते राष्ट्रवादाची भावना आणि युरोपियन संघातून मुक्ततेचा प्रचार करत जनतेचा पाठिंबा मिळवतात. सोबतच ते पुराणमतवादी प्रतिक्रियांचा वापर करत, स्थलांतरित आणि अल्पसंख्याकांना युरोपियन मूल्ये आणि सामाजिक स्थिरतेसाठी धोका म्हणून चित्रित करतात. युरोपच्या राजकारणात अति-उजव्या शक्तींचा उदय हा जागतिक राजकारणातील व्यापक अस्थिरता आणि अनिश्चितता दर्शवतो. भांडवलदारांचा नफा वाढवण्यासाठी मुख्य प्रवाहातील पक्षांद्वारे प्रतिगामी धोरणांचा अवलंब केला जात आहे, ज्याने उजव्या पक्षाच्या विचारधारेचे सामान्यीकरण होताना आपणास दिसते आणि अति-उजव्या पक्षांना सामान्य जनतेकडून मान्यता प्राप्त होत आहे.

### कामगार चळवळीवर होणारा परिणाम

आजवर ज्या देशात उजव्या विचारधारेचे पक्ष सत्तेवर आलेत त्यांनी भांडवलदारांचा नफा वाढवण्यासाठी तेथील कामगार कष्टकरी जनतेची खुली पिळवणूक केली आहे मग ते इटलीतील मुसोलिनीचे सरकार असो, जर्मनीतील हिटलरचे, मार्गरेट थॅचरचे, वा रिगनचे वा मोदीचे. उजव्या विचारसरणीचे पक्ष अनेकदा वंश, धर्म किंवा राष्ट्रीयत्वाच्या आधारावर समाजात विभाजनाची बीजे पेरतात. राष्ट्रवादी आणि स्थलांतरित विरोधी भावनांना चालना देऊन, ते कामगार-वर्गाची एकता खंडित करतात; त्यामुळे कामगारांची सामूहिकपणे एकत्र येऊन त्यांच्या अधिकारांसाठी लढण्याची आणि मालक वर्गाबरोबर मोलभाव करण्याची शक्ती कमकुवत होते. अति-उजव्यांचा उदय अगदी मुख्य प्रवाहातील पक्षांना अधिक पुराणमतवादी, राष्ट्रवादी किंवा संरक्षणवादी धोरणे स्वीकारण्यासाठी प्रभावित करू करतो. ज्यामुळे कामगार हक्क, वाजवी वेतन आणि सामाजिक संरक्षण यांसारख्या मूलभूत कामगार-वर्गाच्या समस्यांना दुर्लक्षित केले जाते आणि त्याऐवजी निर्वासितांचे नियंत्रण आणि तथाकथित राष्ट्रीय सार्वभौमत्व यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. बरेच उजवे पक्ष नवउदारवादी धोरणांचे समर्थन करतात, ज्यामुळे कामगार अधिकार आणि संरक्षण कमी केले जाते. कामगारांच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या युनियनची शक्ती कमी करणारी धोरणे राबवली जातात. युनियन विरोधी कायदे आणून कामाच्या ठिकाणी युनियनचा प्रभाव मर्यादित करण्याचे प्रयत्न केले जातात ज्याने कामगार युनियनची शक्ती आणि प्रभाव कमी होतो. उजव्या विचारसरणीचे पक्ष बहुधा देशांतील आर्थिक समस्यांसाठी स्थलांतरित आणि अल्पसंख्याकांना बळीचा बकरा बनवतात, असमानता, वेतन स्थिरता आणि एकूणच भांडवली व्यवस्थेत कामगारांचे शोषण यासारख्या संरचनागत समस्यांपासून कामगारांचे लक्ष वळवतात आणि त्यांची एकी तोडण्याचे काम करतात. देशाचे नागरिक म्हणून शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराचा समान अधिकार असलेल्या स्थलांतरित आणि अल्पसंख्याक गटांना राष्ट्रवादाच्या नावाखाली त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवणारे कायदे आणले जातात ज्याने कामगार वर्गाची हानी होते.

काही उजव्या पक्षांमध्ये हुकूमशाही प्रवृत्ती आहेत. त्यांचे नेते हिटलर आणि मुसोलिनीच्या विचारांचे समर्थन करतात. याचा अर्थ सत्तेत आल्यावर नागरी हक्कांवर निर्बंध लादले जातात, नागरिकांना त्यांच्या हक्कांसाठी संघटित होणे, निषेध व्यक्त करणे गुन्हा मानला जातो. असे वातावरण कामगार चळवळीच्या वाढीकरिता आव्हाने उभे करते.

भारतातील कामगार वर्गाने यातून हे नक्की समजले पाहिजे की प्रत्येक देशात भाजप सारखे पक्ष जेव्हा पुढे येतात, तेव्हा त्याची कारणे समान असतात, आणि ती आहेत भांडवलदारांच्या घसरत्या नफ्याच्या दराचे संकट. हे सुद्धा विसरू नये की साऱ्या भांडवली देशांचे आर्थिक आणि राजकीय हितसंबंध आपापसांत गुंतलेले आहेत, आणि आपसात लढणारे भांडवलदार व त्यांचे पक्ष कामगार वर्गाविरोधात मात्र एकजूट आहेत. भारतातील मोदी सरकारने जी देशाची दुरावस्था केली आहे, तीच फ्रांस वा इतर देशांमधील उजव्या शक्ती तेथील जनतेची करणार आहेत. यामुळेच कामगार वर्गाचा तत्त्वज्ञ असलेल्या कार्ल मार्क्सने नारा दिला होता, "जगातील कामगारानो एक व्हा."

# शहराला चमकवणाऱ्या कामगार कष्टकऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश कधी?

## शहरातील कामगारांच्या जीवनावर व्यक्तिगत प्रकाश टाकणारा एक प्रत्यक्ष पाहणी अहवाल

✎ अश्विनी

पुण्यातील अप्पर इंदिरा नगर, शहराच्या कडेचा भाग. अर्थातच मध्यवर्ती शहराला स्वच्छ, चकचकीत ठेवणारे, श्रीमंतांसाठी फ्लॅट्स बांधणारे, त्यांच्या गाड्या बनवणारे, त्यांच्या घरात घरकामासाठी स्वस्तात राबणारे कामगार राहतात त्या वस्त्या. सुमारे वीस वर्षाखाली या भागात जंगले होती. अतिशय विरळ घरे होती. तेव्हाच्या लोकांच्या गरजांनुसार पिण्याचे पाणी, ड्रेनेज लाईन ही व्यवस्था मनपाकडून केलेली. हळू हळू मजुरीसाठी गावाकडून शहराकडे येणाऱ्यांची संख्या वाढली आणि जे काम मिळत गेले त्यानुसार तिथेच स्थायिक झाले. आज इथे राहणारी अंदाजे 15 ते 20 हजार कामगार कष्टकरी जनता जीवनाच्या अत्यंत कष्टप्रद परिस्थितीमध्ये जगायला मजबूर आहे.

अप्पर मधील बहुतांश कामगार असंघटित क्षेत्रात काम करतात. पक्का रोजगार नसताना घर चालवण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी काहीतरी हातपाय मारावेच लागतील म्हणून बिगारी, घरकाम करणे यासारखे काम अनेकांनी पत्करले आहे. महिला बिगारी, केटरींग, घरकामासोबतच घरी बसून बिडी बनवणे, अगरबत्ती बनवणे, लसूण सोलणे, मका सोलणे, कागदी कंदील बनवणे, पाकिटे बनवणे यासारखी कामे घेतात तर पुरुषांमध्ये हमाली काम, मिस्त्री, गवंडी काम, रिक्षा चालवणे, ट्रक ड्रायव्हर, सिक्युरिटी गार्ड, मार्केटमध्ये छोट्या, मोठ्या दुकानांमध्ये काम करणे, कोणी झाडू खात्यात तर कोणी कचरा वेचण्यासाठी 'स्वच्छ' मध्ये 5-7 हजारांसाठी राबतो. रोज सकाळी अप्परच्या दोन्ही कामगार नाक्यावर पाहिल्यास जवळपास 300 - 400 कामगार काम मिळण्याची वाट पाहत उभे असतात. मजुरीचा दर रु 250 पासून सुरू होतो तर कुशल कामगारांसाठी तो 1000 पर्यंत जातो. अगदीच अशिक्षितांपासून तर ग्रॅज्युएशन झालेल्यांपर्यंत तरुण इथे काम शोधायला येतात. चेहरे अन कुशलता पाहून ठेकेदार कामावर घेऊन जातो. काम मिळतं ते 80-100 जणांना. उरलेल्यांना रिकाम्या हाताने घरी जाण्याशिवाय पर्याय नसतो. काम करून घेऊन मजुरी बुडवण्याचे प्रमाणही प्रचंड आहे. मुलांच्या शिक्षणाचे प्रमाणही ह्या भागात अत्यंत कमी आहे. किमान आपल्यासारखी रोजंदारीची वेळ मुलांवर येऊ नये म्हणून आईबाप मुलांना चांगले शिकवू पाहतात तर महागड्या शिक्षणामुळे 10 वी 12 वीच्या पुढे मुलगा पोचू शकत नाही. खूप कमी संख्या आहे अशा मुला-मुलींची जे स्वतः मेहनत घेऊन डिग्री पर्यंत पोचतात.

श्रेयस नगर, स्वामी समर्थ नगर या भागात कित्येक दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. नळ चालू केले की गढूळ पाणी येते. पिण्यासाठी तर दूरच, उलट कपडे वा भांडे धुण्याच्याही लायक ते पाणी नसते. अनेक लहान मुले, वयस्कर, महिला ते पाणी पिऊन आजारी पडत आहेत. गॅस्ट्रो सारख्या आजारांनी हॉस्पिटलची फी भरण्यात कमाई गायब होत आहे. वाढत्या महागाईला तोंड देत असताना पिण्याचे पाणीही दिवसामागे 60 रु.देऊन विकत घ्यावे लागत आहे. स्थानिक प्रशासनाला तक्रार केली असता आठवड्यातून एकदा टॅंकरने पाणी पुरवतात जे 3 दिवस पुरते, आणि बाकीचे 4 दिवस वणवण पुन्हा नशिबी येते!



अप्परच्या विविध भागात नालेसफाई वेळेत न झाल्याने चेंबरचे पाणी काहींच्या घरात घुसते. तसा तर बाराही महिने दुर्गंधीचा संचार असतो. मनपाच्या इंजिनिअर नुसार अप्परच्या पाण्याची पाइपलाइन व ड्रेनेज व्यवस्था वाढत्या लोकसंख्येनुसार दुरुस्त केली गेली नाही. तिचे संपूर्ण नूतनीकरण करण्यासाठी 20-25 लाखांचा खर्च आहे आणि तो मंजूर करायला मनपामधील बिल्डर लॉबी तयार नाही. साहजिकच आहे, उच्च मध्यम वर्ग, शेठ, धनदांडगे राहणाऱ्या सोसायटीत जर असा पाणी प्रश्न उद्भवला, तर महानगरपालिका धावून जाते, कारण तिथे माणसं राहतात! पण वस्त्यांमध्ये माणसं कुठे राहतात? ते तर हात आणि पोट असलेले, स्वस्तात राबणारे आणि नफा कमावून देणारे मशीन आहेत!

पद्मावती, पवन नगर भागात गेल्या तीन चार महिन्यांपासून वीजबिल वाढून येत आहे. जेमतेम एका खोलीत रात्रीच चालणारा मिणमिणता पिवळा लाईट आणि एक फॅन इतकी कमी उपकरणे असूनही रु. 700 ते 1000 रुपये वीजबिल येते. वेळेत भरले नाही तर दुसऱ्या दिवशी वीज कर्मचारी वीज कापायला हजर! वीज केंद्रावर तक्रार केली असता मीटर तपासावे लागेल ह्या नावाने वेगळी 750 रुपयाची पावती फाडली, तरी वेळेवर तपासणी सुद्धा होत नाही हा जनतेचा अनुभव.

संसाधनांची ही दैन्यावस्था असताना, उपजीविकेची मात्र भ्रांत! अनेक तास राबूनही मजुरी इतकी अल्प मिळते की मूलभूत गरजा सुद्धा पूर्ण करणे अशक्य! याच वस्त्यांमधील काही कामगार-कष्टकऱ्यांशी झालेल्या संवादातून पुढे आलेली काही उदाहरणे पाहूयात.

स्वामी समर्थ नगर मधील सुजाता. युपी वरून येऊन पुण्यात स्थायिक झाल्यात. अतिशय कोंदट खोली, कच्चीच, विटांनी बांधलेली. घरात 4 जण, पण लागणारे सामान ठेवायलाही घरात पुरेशी जागा नाही. सर्व मिळून लसूण सोलण्याचे काम करतात. दिवसाला 30-40 किलो लसणाचं पोतं घरी येतं. तो लसूण वाळवायचा, गाळून साफ करायचा, पायाने फोडायचा आणि नंतर स्वच्छ सोलून पोत्यात भरायचा. ही अत्यंत वेळखाऊ प्रक्रिया आहे. घरातले चारही जण कामाला लागले तरी दिवसभरातून 20 किलो लसूण सोलला जातो. किलोमागे 15 रुपये मिळतात. त्यातही वजन कमी भरलं म्हणून 20-30 रुपये कापूनच मिळतात. लसणाचा उग्र वास घरभर पसरलेला, लसूण सोलण्याने हातही सोलून लाल झालेले! इतकं केलं तर दोन वेळेचं जेवण कसतरी मिळतं!

पद्मावतीच्या सुरेखा. त्या 3-4 घरात घरकाम करतात. पती दिवसा बिगारी आणि रात्री दुसरे काम असे दोन जॉब करतात. मोठी मुलगी जॉब करून 8-10 हजार कमवते. दोन बहिणी 10 वीत शिकत आहेत. रूचाला शिक्षणाची खूप आवड! डॉक्टर व्हायचे स्वप्न आहे! परंतु आताच शाळेकडून छोट्या छोट्या गोष्टींसाठी प्रचंड फी आकारली जातेय. मागे वडिलांचा एकच जॉब असल्यामुळे शाळा सोडावी लागलेली. अशी परिस्थिती असताना डॉक्टर होईपर्यंत कसे पोचणार? त्यासाठी लागणारी लाखोंची फी आणायची कुठून? त्यात नीट सारख्या परीक्षांचे घोटाळे. हे अनेक प्रश्न त्या बालवयात आतापासून रुचाला भेडसावत आहेत. इवल्याशा डोळ्यातले स्वप्नही चुरडणारी क्रूर व्यवस्था यातून दिसते.

'स्वच्छ' मध्ये काम करणाऱ्या कांबळेताई आणि त्यांचे पती. रोज सकाळी 5 वाजताच घराबाहेर पडावे लागते. सोसायटीतल्या घराघरात जाऊन कचरा गोळा करायचा, तो वेगळा करायचा, जाऊन गाडीत भरायचा! अनेक वेळेस तो कचरा वेगळा करताना फुटलेली काच वगैरे हातात रुतते, रक्ताच्या धारा लागतात. परंतु चांगल्या प्रतीचे हॅण्ड ग्लोव्हज व सुरक्षा साहित्य मागूनही दिले जात नाहीत. एवढे करून पक्का पगार असा नाहीच! प्रत्येक घरामागे 50-70 रुपये आपणच मागायचे! 'स्वच्छ' कार्ड, ई-श्रम कार्ड, बांधकाम कामगारांचे लेबर कार्ड, अशा सगळ्या प्रकारचे कार्ड काढून बसलेत पण एका रुपयाने कुठून पैसा खात्यात आला नाही! नातवांना शिकवायच आहे पण त्यासाठी पैसा कुठून आणायचा, हा यक्षप्रश्न समोर.

पद्मावतीच्या कविता. कधी कामाची सवय नव्हती. पण मुलांचं शिक्षण आणि आर्थिक चणचणीमुळे कामासाठी बाहेर पडावे लागले. नवरा मार्केट यार्डात काम करतो. व्यसनाधीनतेने घराची दैन्यावस्था झालेली. अनुभव हा की कोणी आजारी पडलं, कोणाला अर्जंट पैसा पाहिजे तर स्थानिक नगरसेवक पुढे येतात, व्याजाने पैसेही देतात, म्हणजे थोडक्यात अपघातावेळी थोडीफार मदत करतात, परंतु रोजच्या जीवनाच्या संकटाकरिता मात्र कामगार वर्गाला वाऱ्यावर सोडलेले! रोजगार नसेल, जास्त फी मुळे मुलांना शाळेत ॲडमिशन घेता येत नसेल तर ह्यात आम्ही काय करणार असे म्हणून स्थानिक नगरसेवक हात वर करतात.

शिवतेज नगर मधले यादव मिस्त्री जीवनात अनेक मालकांकडे काम केल्याचा अनुभव मांडतात. ते म्हणतात की गेल्या 30 वर्षापासून इथे राहत आहे; आजपर्यंत अनेक प्रकारची कामे केली कारण कोणतंही काम फिक्स नव्हतं; आलो तेव्हा बिगारी कामाने सुरुवात केली, पाऊस लागला आणि ते काम गेलं, मग कॅटरिंग चे काम घेतले, ते ही सुटले; मग काही दिवस रिक्षा चालवली; नंतर चहा विकण्याचं काम केलं, काही दिवस सिक्युरिटी गार्ड म्हणून राहिलो, आणि पुन्हा येऊन बिगारी काम; सर्व प्रकारची कामे करून पाहिली; पण एक गोष्ट जाणली: कुठलेही काम करा, मालक हा तुम्हाला जिवंत ठेवण्यापुरताच पगार देतो, तो कामगार विरोधीच असतो!

सुपरमधील जाधव ताई. वय वर्षे 66. अतिशय छोट्याशा कोंदट खोलीत सर्व सामान. त्यात उंदीर आणि घुशी फिरतात. थोडाही पाऊस आला की घरात पाणी येतं. करोनाच्या अगोदर पर्यंत आय.एम.ए. मध्ये कामाला होत्या, नंतर संधिवाताचा त्रास खूप वाढला. त्या म्हणतात की आता कुठलही काम होईना; बहिण होती तोपर्यंत लसूण सोलण्याचे काम मिळे, पण आता घरही आवरणं होत नाही वयामुळे. पण जगायला पैसा तर लागतो, सरकारकडून एका पैशाने मदत मिळत नाही. लाडकी बहिण अन् लाडका भाऊ योजना आणल्यात पण वयस्करांसाठीच्या योजनेत हजारो अटी! पेन्शन चालू करायची म्हटल्यावर कागदपत्रांची पूर्तता करायलाच 2-3 हजार लागतील, ते कुठून आणायचे?!

सुपरच्याच सीमा. नवरा 15 वर्षापूर्वीच गेला. बसमध्ये कंडक्टर होता. त्यांचं पेन्शन नाही. मुलगा वॉटर प्युरिफायरचं काम करून जेमतेम 5-6 हजार कमावतो. ताईंना त्वचेचा आजार असल्यामुळे काम करण्याची गरज आणि इच्छा असूनही कोणी काम देत नाही. अतिशय कष्टात दिवस काढावे लागत आहेत पण ना काम, ना पेन्शन, ना महागाई कमी व्हायचे चिन्ह. घरभाडे, रेशन मधेच सर्व पैसा संपतो, दवाखान्याचा खर्च वेगळा!

शेळके वस्तीतील अनेक जण बिगारी काम करतात, सतत सिमेंट मध्ये हात असल्यामुळे हाताला फोड येणे, त्वचा लाल होणे हे आजार नेहमीचेच आहेत, पण पैसा नसल्यामुळे आहे तसेच सहन करून रोज कामावर जावेच लागते. अंबिका नगरच्या झुबेदा भाभी अनेक काम करून थकल्या. सतत हात दुखतो पण अनेक औषधं करूनही त्याला आराम नाही. जवळच्या क्लिनिक वर गेलं की स्टिरॉइड देऊन दुखणं दाबण्याचे काम करतात. नंतर ज्याचा खूप त्रास वाढेल. तरीही हॉटेलमध्ये पोळ्या लाटणं, भांडी घासणे, कॅटरिंग मध्ये स्वयंपाकाला जाणं, लाडू वळणं ही कामं करावी लागतात तेव्हाच थोडाफार पैसा येतो. कोणी हॉस्पिटलमध्ये मामा मावशी म्हणून राबतोय, कोणी येईल ते काम करतोय, अनेकांचा कामाच्या जागी नसलेल्या सुरक्षितते मुळे मृत्यू होतोय पण ह्यातही सरकारला काही देणं घेणं नाही!

ह्याच सर्वांच्या काबाड कष्टाने पक्की घर बांधली जाताहेत, घरोघरी चांगला स्वयंपाक बनतोय, श्रीमंत लोकं लहानग्यांना घरी सोडून निर्धास्तपणे कामावर जाऊ शकताय, रस्ते, घरे स्वच्छ होतात, हॉटेलमध्ये चांगलं जेवण जेवू शकता, हवी ती वस्तू पैसेवाला वर्ग विकत घेऊ शकतो, देशाची संपत्ती यांच्याच कष्टातून वाढतेय पण ह्याच कष्ट करणाऱ्या जनतेला चांगलं घर, चांगले दवाखाने, चांगल्या शाळा, पक्का रोजगार नाही! ह्या परिस्थितीत तात्पुरता सुधार करायला भांडवलदारच काही एन.जी.ओ.ना कामाला लावतात आणि खरेतर त्या किरकोळ दानधर्म करून जनतेला लाचार बनवण्याचे आणि विचारशक्ती मारण्याचेच काम करतात!

ही आज फक्त अप्परची परिस्थिती नसून पुण्यातच शेकडो अशा कामगार कष्टकऱ्यांच्या वस्त्या आहेत आणि देशभरात लाखोंनी ह्या वस्त्या आहेत. देश ज्यांच्या श्रमावर चालतो त्यांची स्थिती कमी जास्त प्रमाणात अशीच आहे. परंतु हे त्रिकालाबाधित सत्य नाही! ज्यावेळेस कामगार कष्टकरी आपली संघटित ताकद ओळखतील, त्यासाठी सर्व भेदभाव तोडून एकत्र येतील, आणि क्रांतिकारी लढे उभे करतील, तेव्हा ही परिस्थिती बदलण्याची सुरुवात होईल!

# विशाळगड हिंसाचार: धार्मिक तणावाचे बीज रोवून निवडणुकीत मतांचे पीक काढण्याचे राजकारण!

## भांडवलदार वर्गाच्या हिंदुत्ववादी राजकारणाविरुद्ध लढा! खऱ्या धर्मनिरपेक्ष राज्यासाठी लढा!

✎ ललिता

विशाळगड, कोल्हापूर जिल्ह्यात स्थित, शिवाजी राजेंच्या काळात बांधलेला किल्ला. जिथे काही महिन्यांपासून अतिक्रमण हटवण्याची मागणी अनेक संघटना करत होत्या. येथे धार्मिक ध्रुवीकरण, दंगली आणि तोडफोडीची आणखी एक घटना जुलै महिन्यात घडली आहे. राज्यसभेचे माजी खासदार आणि राजघराण्याशी जोडलेले संभाजीराजे यांनी या दंगली भडकावल्या होत्या. धार्मिक विष पेरणारे संभाजी भिडे ज्यांच्या प्रतिगामी, पितृसत्ताक आणि धर्मवादी वक्तव्यांमुळे यापूर्वी दंगली झाल्या आहेत, त्यांनी सुद्धा यावेळी उन्माद पसरवण्यात हातभार लावला.

तथाकथित प्रगतीशील संधीसाधू बुर्झ्वा नेतेच आता लंपट जमावाला मुस्लिमांवर हल्ले करण्यासाठी मोकाट सोडत आहेत. याच संभाजीराजेंचे वडील नुकतेच तथाकथित प्रगतीशील कॉंग्रेस पक्षाचे खासदार म्हणून निवडून गेले आहेत. अपक्ष उमेदवार असलेल्या संभाजीराजेंना या मुद्द्याचा वापर करून नाव आणि प्रसिद्धी मिळवायची आहे आणि म्हणूनच ते इतक्या खालच्या पातळीवर जात आहेत. ह्या घटनेतून हे सिद्ध होते की जेव्हा राजकारणाची पोळी भाजायची असते, लोकांना भडकावून मतांची बेगमी करायची असते तेव्हा कोणत्याही भांडवली पक्षासाठी धर्माचा मुद्दा एक गरजेचा टेकू असतो.

14 जुलैला 'चलो विशाळगड' ही हाक संभाजीराजे ह्यांनी दिली होती- कोणीही त्यांना थांबवले नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की तेव्हा विशाळगडवर जमलेल्या कार्यकर्त्यांसोबत कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलीस प्रमुख महेंद्र पंडीत, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील, उपअधीक्षक अप्पासाहेब पोवार उपस्थित होते. त्यांच्यासमोरच हा सगळा हिंसाचार घडला. पण, पोलीस बघ्याची भूमिका घेत होते, असं स्थानिकांचं म्हणणं आहे.

म्हणायला अतिक्रमण विशाळगडावर होते, परंतु विशाळगड पासुन 5 किलोमीटरच्या अंतरावर असणाऱ्या गजापुर गावातील मशिदीवर, घरांवर, दुकानांवर दगडफेक आणि तोडफोड केली होती. 26 घरं फोडली होती. प्रवास करून 15-20 किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या हॉस्पिटलला जायला गाड्या सुद्धा नव्हत्या; कारण 70-80 गाड्या सुद्धा फोडल्या गेल्या होत्या. एका घराला आग लावली गेली होती; तसेच गडाच्या पायथ्याशी काही लहान विक्रेते होते ज्यांच्या साहित्याचीही नासधूस केली गेली. यामध्ये काही पोलीस देखील जखमी झाले होते. स्पष्ट आहे की निशाणा अतिक्रमण नव्हते, तर अल्पसंख्यांक समुदाय होता: आणि त्यामुळेच महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराने पिडलेला परंतु या फसव्या धर्मवादी प्रचाराला बळी पडलेला बहुसंख्यांक समाज सुद्धा निशाण्यावरच होता!

संभाजी भिडेने भडकावणारे भाषण दिल्यानंतर सुद्धा त्यांना थांबवलं नव्हता. बीबीसीच्या बातम्यांवरून हे कळालं की "आम्ही मुलांना घेऊन जंगलात लपून बसलो म्हणून वाचलो" असं तिथले प्रत्येक जणच सांगत होता. सकाळी साडेअकराला सुरू झालेली तोडफोड संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सुरू असल्याचा दावाही ते करत होते. संध्याकाळी घरी परतलेल्या लोकांना ना खायला



अन्न ना अंगावर घालायला कपडा उरला होता.

हिंसाचारानंतर दुसऱ्याच दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण पाडण्यास सुरुवात केली. एका आठवड्यानंतरच बॉम्बे उच्च न्यायालयाने जाहीर केले की पावसाळ्यात कोणतीही तोडफोड केली जाणार नाही आणि स्थगिती लागू करण्यात आली.

### मतांच्या पोळ्या भाजायला हिंदुत्वाचे राजकारण

शतकानुशतके जुन्या विशाळगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर या गावात हिंदुत्ववादी संघटनांनी मुस्लिमांना लक्ष्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. बजरंग दल, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आणि शिवसेनेसोबत जोडलेल्या जमावाने फेब्रुवारीत एका दर्ग्यावर हल्ला चढवला होता. घटनास्थळी पोलीस अधिकारी उपस्थित होते, तरीही आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांना आठवडाभरापेक्षा जास्त वेळ लागला. केवळ सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि काहींना अटक करण्यात आली होती. त्यातील किमान दोघांचा काही दिवसांतच जामीन मंजूर झाला.

यावेळीही गजापूरच्या जनतेवर पूर्वनियोजित पद्धतीने हिंसाचार करण्यात आल्यानंतर सरकार, पोलिस गप्प बसले आहेत. फेब्रुवारीच्या या हिंसाचाराच्या घटनेदरम्यान भगव्या जमावाने दर्ग्यात पोलिसांच्या उपस्थितीत तोफांचा मारा केला आणि गुन्हेगारांचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होऊनही दोन दिवसांतच त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. त्यानंतर पिढ्यानपिढ्या तेथे असलेली घरे व वास्तूंना तोडण्यास स्थगिती देण्यात आली. तरीही बुर्झ्वा पक्ष आणि उजव्या विचारसरणीच्या संघटनांना चिथावणी देण्यासाठी ह्या मुद्द्यावर राग पेटवून हा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आणला.

संभाजीराजेंनी सरकारच्या निष्क्रियतेला तोंड देत विशाळगडावर मोर्चा काढण्याची हाक दिली, ही हाक अनेक उजव्या विचारसरणीच्या गटांनी सुद्धा दिली, ज्यांनी मोर्चा सुरू होण्यापूर्वीच हिंसाचाराचा अवलंब केला, हे आपल्या समाजातील धार्मिक ध्रुवीकरणाचे प्रतिबिंब आहे. यातून दिसून येत आहे की भांडवलदारांच्या पक्षांमध्ये, मग ते तथाकथित पुरोगामी असोत वा हिंदुत्ववादी, आतून एक प्रकारचे संगनमत काम करत असते.

खरे उद्देश्य लपवण्यासाठी संभाजीराजे यांनी कोणत्याही विशिष्ट धर्माला लक्ष्य न करता फक्त अतिक्रमण हटवण्याचे कमकुवत विधान केलेले असताना, धार्मिक तेढी दरम्यान ते मौन बाळगून होते आणि एका दिवसानंतर पोलीस ठाण्यात जाऊन आपण शिवभक्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन दिले. ह्याचा अर्थ असा आहे की त्यांना त्यांच्या कृतींचे परिणाम चांगलेच ठाऊक होते आणि धर्मवादी हिंसाचाराचे प्रतिफळ मिळवण्याचे त्याचे उद्दिष्ट होते.

नवे सरकार स्थापन झाल्यानंतर अवघ्या महिनाभरानंतर पोलिसांसह भाजपप्रणित राज्य सरकारांनी निवडणुकीच्या निकालानंतर मुस्लिमांना त्रास देण्यासाठी, अपमानित करण्यासाठी आणि त्यांच्यावर हल्ले करण्यासाठी नवनवीन पद्धती शोधण्यास सुरुवात केली आहे. उत्तर प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, गुजरात, मध्य प्रदेश आणि झारखंड अशा विविध राज्यांमध्ये मॉब लिंचिंगच्या 13 हून अधिक घटना घडल्या आहेत. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात कांवड यात्रेच्या मार्गावर असलेल्या दुकानांच्या होर्डिंगजवर दुकानमालकाची नावे लावण्याचे आदेश देण्यात आले असून, मुस्लिम दुकानदारांना हिंदूंपासून वेगळे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा तर जीविकोपार्जनाच्या मूलभूत अधिकारावर सरळ हल्ला आहे. कावडियांनी अनेक कारणे सांगून अनेक प्रवासी, पोलिसांना मारहाण केली, रेस्टॉरंटची तोडफोड केली. ज्या लोकांना फॅशिस्टांनी पोसले आहे, त्यांनी केलेल्या जमावाच्या हिंसाचाराची व्याप्ती इतकी आहे, आणि त्याने इतके भयंकर रूप धारण केले आहे की हे जमाव फॅशिस्टांच्याही संपूर्ण नियंत्रणात नाहीत.

कामगार वर्गाने हे विसरता कामा नये की जेव्हा-जेव्हा धर्म, जात, प्रदेश, भाषा आपल्यात फूट पाडण्यासाठी आणली जाते तेव्हा तो सत्ताधारी वर्ग आणि त्याच्या सर्व प्रतिनिधी पक्षांचा आपल्यात फूट पाडण्याचा आणि आपल्या वास्तविक प्रश्नांपासून लक्ष वळविण्याचा डाव असतो. कायदा हातात घेऊन विध्वंसक आणि तोडफोड करणाऱ्या तरुणांची लंपट टोळी धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी वापरली जात आहे ही लक्षात घेण्याची गोष्ट आहे.

### हक्क अधिकारांच्या आंदोलनांचे दमन पण धर्मवादी राजकारणाला समर्थन

पोलिसानी सुद्धा काहीच ॲक्शन घेतली नव्हती, त्यातून हे स्पष्टपणे दिसते की या हल्ल्यात सरकारचा हात आहे. त्याचे मौन म्हणजे संगनमत आहे, त्याची निष्क्रियता म्हणजे संगनमत आहे आणि विशेषत: दंगलखोरांना त्यांचे आश्वासन आहे की ते सर्व "अतिक्रमणे" हटवतील.

हिंसाचार सुरू असताना पोलीस कुठे होते? मोर्चाचे आयोजन केल्याप्रकरणी संभाजीराजेंना अटक का करण्यात आली नाही? हे सगळे प्रश्न विचारायला हवेत. सत्य हे आहे की अशा जातीय हिंसाचारात सरकार आणि पोलिसांचा अनेकदा सहभाग दिसून येतो. मॉब लिंचिंग, गोहत्या, लव्ह जिहाद, अतिक्रमण यांसारख्या प्रकरणांत जमावाकडून होणाऱ्या हिंसाचाराचे अनेक गुन्हे समोर येतात, आरोप सिद्ध होत नाहीत, आणि गुन्हेगार मोकाट फिरताना दिसतात.

दुसरीकडे आपल्या हक्कांच्या मागणीसाठी निदर्शने करणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर कारवाई करण्यात पोलिस तत्पर असतात. महाराष्ट्रातील फेलोशिपची मागणी करणारे पीएचडीचे विद्यार्थी, पेपरफुटीविरोधात कारवाईची मागणी करणारे देशभरातील विद्यार्थी, रोजगार आणि इतर मुलभूत हक्कांची मागणी करणारे तरुण कष्टकरी, त्यांच्यावर लाठीचार्ज, पोलिस गुन्हे आणि नजरकैदेत ठेवल्याची प्रकरणे पाहा.

पण खुनी, बलात्कारी, लिंचिंग करणारे, द्वेष पसरवणारी भाषणे करणारे राजकारणी, फसवणुक करणारे, गुंड मोकाट फिरतात, त्यांच्या हल्ल्यांचे व्हिडिओ बनवतात, त्यांच्या कृत्याचा अभिमान बाळगतात तरीही पूर्ण मोकळेपणाने फिरतात. खरे तर माजी खासदार जयंत सिन्हा यांच्यासारख्यांनी दोषींना पुष्पहारही घातला, आंदोलकांवर गोळ्या झाडण्याची मागणी करणारे अनुराग ठाकूर यांच्यासारखे लोक आता संसदेत बसले आहेत.

### आवासाचा हक्क आपला जन्मसिद्ध हक्क आहे

भांडवलदार वर्गाच्या इशाऱ्यावर अनेक कष्टकरी विध्वंस होत असतात, दिल्ली, मुंबई किंवा इतर कुठल्याही शहरात झोपडपट्ट्यांमधील राहणारा कामगार कष्टकरी रातोरात बेघर होतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कष्टकरी जनतेची घरे निर्दयी सरकारांकडून रातोरात उद्ध्वस्त केली जातात. आपल्याकडे एक कुख्यात बुलडोझर बाबा, योगी आदित्यनाथ देखील आहेत, ज्यांना बुलडोझर न्याय देण्यासाठी त्यांच्या गुंड समर्थकांकडून "गौरवले" जाते. कायदे धाब्यावर बसवून नाही तर कायदाच खिशात घालून बनलेली भांडवलदारांची घरं, फॅक्टऱ्या मात्र अबाधित राहतात; पण कामगार कष्टकरांची घरं निर्दयीपणे नष्ट केली जातात.

विशाळगडावर काही बांधकाम व्यावसायिक स्वरूपाचे आहे असा आरोप होत आहे. तसे असल्यास त्यावर नियमानुसार कारवाई होऊ शकते; परंतु मेहनत करणाऱ्यांची घरे पाडण्याचा सरकारला कोणताही अधिकार नसला पाहिजे. दिल्लीजवळील खोरीगावपासून ते कोल्हापूरपर्यंत कष्टकरी जनतेची घरे पाडणे,तेही योग्य प्रक्रिया न पाळता आणि दुसऱ्या राहण्यायोग्य घरात सुरक्षित पुनर्वसन न करता , हा निंदनीय गुन्हा आहे. कसेबसे घर बांधून दिवसरात्र कष्ट करून उदरनिर्वाह करणाऱ्या कामगार वर्गाला धर्मवादी फॅशिस्ट सरकार असो किंवा इतर भांडवली पक्ष असोत "बेकायदेशीर", "घाणेरडे" आणि मुस्लिमांच्या, शोषित उत्पीडित जातीतल्या माणसांबाबतीत दुय्यम दर्जाचे नागरिक मानते. सरकार आम्हाला राहण्यासाठी घरे का देत नाही, असा प्रश्न आज आपण विचारला पाहिजे. बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, शिक्षणाचे व्यापारीकरण आणि घरांच्या संकटाविषयी प्रश्न विचारू नयेत म्हणून सरकार धार्मिक तेढ निर्माण करते.

विशाळगडला सुद्धा घर पडण्यावर बंदी आणली आहे पण तरी देखील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री

पान 6 वर

# सर्वपक्षीय सरकारे गुंतली भांडवलदारांपुढे स्वत:ला सिद्ध करण्याच्या स्पर्धेत!

पान 1 वरून

स्पष्टपणे दाखवतात की देशातील भांडवलदार वर्गाची सेवा करण्यात, त्यासमोर स्वत:ला सिद्ध करण्यात हे सर्व पक्ष लागलेले आहेत.

गेल्या वर्षी तामिळनाडूतील द्रमुकच्या सरकारने फॅक्टरीज अमेंडमेंट बिल 2023 विधानसभेत पास करून निर्णय घेतला होता की कामाचे तास 12 केले जातील. तामिळनाडू मध्ये मोठी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि "अधिक रोजगार निर्माण करण्यासाठी" हा कायदा आणल्याचे बोलले गेले होते. तामिळनाडू देशातील सर्वाधिक कारखाने आणि औद्योगिक कामगार असलेले राज्य असल्याचा दावा करणाऱ्या सरकारला अजून मोठी गुंतवणूक यावी म्हणून कामगारांच्या अधिकारांवर हल्ला करावासा वाटला! दिखाव्याकरिता म्हटले गेले की या कायद्याने कामाचे तास "लवचिक" केले जातील. कारखाने आले तरीही कामाचे तास वाढवून रोजगार कसा वाढणार याचे उत्तर देणे द्रमुकला आवश्यक वाटले नाही. कामगार संघटनांनी विरोध दर्शविल्यानंतर मुख्यमंत्री स्टॅलीन यांनी कायद्याची अंमलबजावणी मागे घेत, बचावाचा पवित्रा घेत म्हटले की कामगारांच्या हितासोबत तडजोड केली जाणार नाही आणि "फक्त सुधार राबवण्यासाठीच नव्हे तर या मुद्यावरील एकमताला स्विकारण्यासाठी सुद्धा हिंमत लागते" असे म्हटले. नक्कीच या पक्षांच्या पोशिंद्या भांडवलदार वर्गाच्या हिताला तात्पुरते तरी डावलत कामगार-कष्टकऱ्यांच्या मताला ऐकण्यासाठी भांडवलदारांच्या पक्षांना हिंमत तर लागतेच!

जुलै 2024 मध्येच कर्नाटकातील कॉंग्रेस सरकारने "कर्नाटक शॉप्स ऍंड एस्टाब्लिशमेंट ऍक्ट" मध्ये बदल प्रस्तावित केले आणि कामाचे तास 14 पर्यंत वाढवण्याची आयटी व संबंधित कंपन्यांना परवानगी दिली. गुजरात, तेलंगणा, ओरिसात अगोदरच अशा तरतुदी अस्तित्वात आहेत, असे म्हणत कर्नाटकने हा कायदा प्रस्तावित केला होता. ओव्हरटाईमच्या नावाने हे तास वाढवण्याची परवानगी दिली गेली, परंतु हे वास्तव सर्वज्ञात आहे की आयटी कंपन्या ओव्हरटाईम देत नाहीत.

कामगारांचा वाढता विरोध पाहता कर्नाटकचे श्रममंत्री (ज्यांना खरेतर श्रमलूटमंत्री म्हटले पाहिजे!) संतोष लाड यांनी नाईलाजाने कबुली देत माध्यमांसमोर मांडले की हा कायदा पारित करण्यासाठी त्यांच्यावर उद्योगांचे दडपण आहे. काही बातम्यांनुसार अमेरिकेतील ॲप्पल आणि तैवानच्या फॉक्सकॉन या कंपन्यांनी कामाचे तास वाढवण्याकरिता दबाव बनवला आहे. अर्थातच या बदलांचा फायदा संपूर्ण आयटी व संबधित कंपन्यांच्या मालकांना होणार आहे. कर्नाटकातील 8,785 आयटी व संबंधित कंपन्यांमध्ये जवळपास 18 लाख कर्मचारी काम करतात व देशातील एकूण जवळपास 50 लाख कर्मचाऱ्यांशी तुलना करता 40 टक्के आयटी व संबंधित कर्मचारी कर्नाटकातच आहेत. थोडक्यात आयटी कर्मचाऱ्यांच्या मोठ्या संख्येला या कायद्याचा फटका बसणार होता. कर्नाटकात अगोदरच, तत्कालीन भाजप सरकारने, 2023 मध्येच फॅक्टरीज(कर्नाटक अमेंडमेंट) बिल पास केले आहे, ज्याद्वारे कारखान्यांमध्ये 12 तास कार्यदिवसाला, प्रत्येक तिमाहीत ओव्हरटाईमचे तास 75 वरून 145 करायला, आणि विना-ब्रेक 6 तास सतत कामाला, महिलांना रात्रपाळीत कामाला सुद्धा परवानगी दिली गेली आहे. आता कॉंग्रेस सरकार आम्ही भाजपपेक्षा कुठेही मागे नाही आणि आम्हीही भांडवलदारांचे पाईक आहोत हे दाखवण्यात गुंतले आहे. भारत जोडो यात्रेदरम्यानच राहुल गांधींनी रघुराम राजनला दिलेल्या मुलाखतीत कामगार कायदे ढिले करण्याचे आश्वासन दिले होते.

कर्नाटकच्या प्रस्तावित कायद्याने तीन महिन्यात एकूण 125 तासांपर्यंत ओव्हरटाईमची मर्यादा आखली होती, परंतु ओरिसातील लागू तरतूद तर 144 तासांपर्यंत ओव्हरटाईमची परवानगी देते. नवीन पटनाईकांच्या बिजू जनता दलाने 2020 मध्येच हे काम करून ठेवले आहे. ओरिसात कामाचे तास 12 करणारे आणि वरून 4 तास ओव्हरटाईमला परवानगी देणारे कायदे, कोव्हिडचे निमित्त करून, 2020 मध्ये पारित झालेले होते. वास्तवात तर या सर्व तरतुदींपेक्षा जास्तच काम करवले जाते, आणि कायदे नावापुरतेच कागदावर असतात हे सुद्धा एक उघड सत्य आहे.

2020 मध्येच उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात या सर्व भाजप शासित राज्यांनी कोव्हिडचे निमित्त करून कामगार कायदे ढिले वा रद्दबातल करण्यासाठी तातडीने पावले उचलली होती, ज्यापैकी गुजरातच्या 12 तासांच्या कार्यदिवसाला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने तात्पुरती का होईना खिळ बसली होती. कॉंग्रेसशासित पंजाब आणि राजस्थान, आणि बीजेडी शासित ओरिसाने सुद्धा त्याचवेळी काही पावले उचलली होती.

आज देशातील कोणत्याही गैर-भाजप शासित राज्यांचा या चार नवीन कामगार-विरोधी कायद्यांना कोणताही दबका वा कमजोर का होईना विरोधाचा सूर दिसून येत नाही. देशातील सर्वच प्रमुख भांडवली पक्षांचे कामगार अधिकारांवरील हल्ल्याबाबत एकमत आहे. अशामध्ये वाढत्या असंतोषाला काबूत ठेवण्याकरिताच या पक्षांकडे धर्म, जात, प्रांत अशा अस्मितांचे राजकारण केल्याशिवाय पर्याय नाही. हिंदुत्ववादी फॅशिस्ट भाजप असो वा आणि दुसरीकडे जात जनगणनेचा नारा देणारा कॉंग्रेस, वा तामिळ किंवा मराठी अस्मितेचे नारे देणारे द्रमुक, शिवसेनेसारखे पक्ष असोत, कामगारांवरील हल्ल्यामध्ये सर्व एक आहेत. स्वत:ला कामगार वर्गाचे पक्ष म्हणवणारे नकली कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय, सीपीएम, लिबरेशन सारखे) स्वत:च त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये भांडवलदारांकरिता पायघड्या पसरत आहेत, आणि देशातील भांडवली सत्तेचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. यामुळेच त्यांच्या नेतृत्वातील तथाकथित देशव्यापी युनियन्स (सीटू, आयटक सारख्या) कामगार कायद्यांविरोधात तोंडपुजेपुरताच विरोध करताना दिसत आहेत.

याचे कारण आहे या सर्व पक्षांवर आणि त्यांच्या सरकारांवर असलेला बड्या भांडवलदार, कॉर्पोरेट भांडवलदार लॉबीचा वचक आणि नियंत्रण. भारताची अर्थव्यवस्था नफ्याच्या घसरत्या दराच्या संकटात सापडलेली आहे, जे अजून काही नाही तर भांडवली व्यवस्थेच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळेच, म्हणजे उत्पादनाचे वाढते सामाजिकीकरण आणि दुसरीकडे हडपण्याचे खाजगीकरण, याच्या परिणामी निर्माण झालेले आहे. अशामध्ये नफ्याचा दर टिकवायचा वा वाढवायाचा असेल, तर नफ्याचा एकमात्र स्त्रोत असलेल्या मानवी श्रमाच्या वाढलेल्या शोषणाच्या आधारेच ते शक्य आहे.

तसे तर देशातील 93 टक्के, म्हणजे जवळपास बहुसंख्य कामगार असंघटित आणि अनौपचारिक क्षेत्रातच मोडतात, ज्यांना कोणत्याही प्रकारच्या कामगार कायद्यांचे संरक्षण मिळतच नाही. कामगार म्हणून नोंदच नसणे, कामाच्या शर्ती ठरलेल्या व लिखित नसणे, ज्यात कामाचे तास, मजुरीचा दर, मधली सुट्टी इतक्या मूलभूत गोष्टी सुद्धा व्याख्यायित नसणे, आणि त्यामुळेच रजा, आजारपणातील रजा, पीएफ, ग्रॅच्युईटी, विमा, ईएसआय सारख्या अत्यावश्यक बाबी तर दुरापास्तच असणे हे देशातील बहुसंख्यांक कामगार वर्गाचे वास्तव आहे. प्रस्तावित कायद्यांचा थेट हल्ला जरी जास्त प्रमाणात संघटित क्षेत्रातील कामगारांवर होणार असला, तरी कामगार वर्गाच्या एका हिश्श्यावर होणारा हल्ला मालक वर्गाची मग्रुरी निश्चितपणे वाढवतो, ज्याचा परिणाम सर्वच कामगार वर्गाच्या जीवनावर होत असतो.

दुसरीकडे देशातील भांडवलदार वर्गाची चीनसोबत "स्पर्धा" करत देशाला मॅन्युफॅक्चरींगचे केंद्रस्थान बनवण्याची इच्छा आहे. ॲप्पल आणि फॉक्सकॉन सारख्या कंपन्या चीनमधून भारतात याव्यात याकरिता चीनसारख्याच किंवा त्यापेक्षाही जाचक कामगार कायद्यांची अंमलबजावणी करून तो या कंपन्यांना आश्वस्त करू पहात आहे की भारतातील भांडवली राज्यसत्ता चीनी भांडवली राज्यसत्तेच्या तुल्यबळ दमनकारी असू शकते. हे उद्योग देशात आलेच नाहीत तर रोजगार निर्मिती होणार नाही, आणि कामगारांचे जीवन अवघडच राहील असा अपप्रचार भांडवलदार वर्ग आणि त्याचा भोपू मीडिया सतत करत असतो, आणि स्वत:च्याच अतोनात शोषणाला कामगार वर्गाची परवानगी मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. वास्तवात भांडवलदार वर्गाला "प्रोत्साहन" देत त्यांनी कारखाना लावावा याकरिता मनधरणी करणारी सरकारे कामगार वर्गाला प्रोत्साहन देऊन कारखाने चालवण्याकरिता का प्रयत्न करत नाहीत? भांडवलदार जर "हिंमत" करत नसतील तर स्वत:ला जनतेची म्हणवणारी सरकारे कामगारांच्या समर्थनाने स्वत:च ते कारखाने का उभे करत नाहीत वा उद्योगांचे राष्ट्रीयीकरण का करत नाहीत? हे प्रश्न विचारल्यास एकच उत्तर मिळते की ही सरकारे वास्तवात भांडवलदार वर्गाचेच हित जपणारी सरकारे आहेत!

चीन वा इतर काही पूर्व आशियाई देशांमध्ये कामगार अधिकारांचे अभूतपूर्व हनन, कामाच्या जागी पिळवणुकीच्या अत्यंत हलाखीच्या स्थिती (12 वा जास्त तास काम, मधली सुट्टीच नसणे, सुट्याच नसणे, कारखान्याच्या आवारातच राहणे, अत्यंत कमी मजुरी, बालमजुरी, संघटित होण्यास बंदी, इत्यादी) ती कारणे आहेत जी जागतिक भांडवलदारांना आणि कारखान्यांना त्या देशात नेत आहेत. जगाच्या स्तरावर भांडवली व्यवस्थेत असलेली मंदी नफ्याच्या घसरत्या दराचीच प्रतिक्रिया आहे, आणि नफ्याचा दर टिकवणे आता कामगार वर्गाच्या अतोनात शोषणातूनच शक्य आहे. त्यामुळेच औद्योगिक स्पर्धेत तुलनेने पिछाडलेल्या नवस्वतंत्र देशांतील सरकारांमध्ये सुद्धा आपल्याच देशातील कामगारांच्या अतोनात पिळवणुकीची स्पर्धा लागली आहे. परकीय गुंतवणुकीचा गाजावाजा होत असला, तरी या पिळवणुकीच्या स्पर्धेचा मुख्य फायदा निश्चितपणे देशातील भांडवलदार वर्गाला मोठा आहे.

अशामध्ये, आपल्या समोरील, कामगार वर्गासमोरील सर्वात मोठे आव्हान आणि कर्तव्य आहे की देशव्यापी स्तरावर आपल्या क्रांतिकारी युनियन्स मध्ये संघटित व्हावे, आणि कामगार कायद्यांविरोधातील हल्ल्याच्या विरोधात प्रदीर्घ, आणि झुंजार लढ्याची सुरुवात करावी. देशाच्याच नव्हे तर जगाच्या स्तरावर क्रांतिकारी कामगार वर्गीय आंदोलन कमजोर असण्याचाच परिणाम आहे की भांडवलदार वर्गाचा हा हल्ला दिवसेंदिवस तीव्र होत आहे. असे असले तरी, इतिहास साक्ष आहे की दबलेली जनता आज ना उद्या अन्यायाविरोधात संघटित होतेच आणि शोषकांना धडा शिकवतेच. आज देशामध्ये व्याप्त धर्म-जात-प्रांतवादी राजकारण झुगारून दिल्याशिवाय तो योग्य लढा उभा होणे शक्य नाही. त्यामुळेच अस्मितावादी, उदारवादी विचारांविरोधात संघर्ष करणे आपल्या संघटित होण्याची आज पूर्वशर्त आहे.

# विशाळगड हिंसाचार: धार्मिक तणावाचे बीज रोवून निवडणुकीत मतांचे पीक काढण्याचे राजकारण!

पान 5 वरून

सर्व अतिक्रमणे हटविण्याचे आश्वासन देत आहेत. सरकारच्या खऱ्या वर्ग चारित्र्याविषयी सर्व कामगार वर्गाच्या जनतेला हा इशारा द्यायला हवा. बेकायदा व्यावसायिक बांधकामे, व्यवसाय अबाधित राहतात, पण पत्र्याच्या झोपड्या झपाट्याने जमीनदोस्त केल्या जातात. हे सर्व जनविरोधी पक्ष भांडवलदारांच्या हितासाठी धडपडणारे पक्ष आहेत आणि म्हणून यावरून हे दिसून येते की, हे सरकार आणि त्याआधी आलेली सरकारे मग ती कॉंग्रेस असो वा शिवसेना असो वा फॅशिस्ट भाजप, सर्व जण कामगार वर्गावर कठोर कारवाई करण्यासाठी आणि त्यांना सन्मानाच्या जीवनापासून वंचित ठेवण्यासाठी एकवटले आहेत.

रोजगार, शिक्षण, आरोग्य, घरकुल या आपल्या हक्काच्या मागण्या मिळवण्यासाठी आपल्याला लढावे लागेल. या देशातील कष्टकरी जनतेने धर्म, जात, भाषा आणि प्रांत असे सर्व भेद बाजूला ठेवले पाहिजेत जे आपल्याला विभाजित करण्यासाठी आणि आपल्या वास्तविक प्रश्नांपासून विचलित करण्यासाठी वापरले जातात. या देशातील प्रत्येक कष्टकरी माणसाने एकत्र येऊन असा समाज निर्माण करण्याच्या लढाईत सामील झाले पाहिजे जिथे कोणीही उपाशी, बेघर आणि जीवनाच्या मूलभूत गरजांपासून वंचित असणार नाही. आपल्याला खऱ्या धर्मनिरपेक्षतेची मागणी करण्याची गरज आहे: धर्म आणि सत्तेची पूर्ण फारकत. अश्या समाजासाठी आपल्याला धार्मिक भेदभाव करणाऱ्या भांडवली पक्षांना सत्तेतून काढून टाकण्याची आणि आपले पर्यायी कामगार वर्गीय राजकारण उभे करण्याची गरज आहे.

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 9

# मालापासून ते पैशापर्यंत

✍अभिनव

पैसा (इंग्रजीतील Money (मनी) या अर्थाने, रुपयाचा भाग असलेले एकक या अर्थाने नाही:अनुवादक) ही एक रहस्यमय गोष्ट आहे. ज्याच्या खिशात तो पुरेश्या प्रमाणात आहे तो स्वतःला शक्तिशाली आणि जगाचा राजा समजतो. पण त्यालाही पैशाची भीती वाटते आणि तो पूजा करतो की पैसा नेहमी त्याच्या खिशात रहावा. ज्याच्याकडे पैसा नाही तो सुद्धा त्याच्या शक्तीपुढे नतमस्तक होतो आणि देवी लक्ष्मीने आपल्या खिशातही प्रवेश करावा अशी प्रार्थना करत राहतो. पण ही पैसा गोष्ट नक्की काय आहे? या रहस्यमय शक्तीमागील रहस्य काय आहे? हे समजून घेण्यासाठी आपल्याला माल आणि मालाचे उत्पादन समजून घ्यावे लागेल. आपल्याला मूल्य आणि विनिमय-मूल्य यांच्यातील संबंधांबद्दल समजून घ्यावे लागेल. या दिशेने काही प्राथमिक पावले आपण उचलली आहेत. आता पुढे जाऊया. पण यासाठी संक्षेपात थोडं मागे जावे लागेल.

### सामाजिक श्रम विभाजन आणि विनिमय

आपल्याला माहित आहे की मानवी श्रमाच्या उत्पादनांचा विनिमय तेव्हाच सुरू होऊ शकतो जेव्हा समाजात **सामाजिक श्रम विभाजन** असेल. म्हणजे, जर लोक सामूहिकरीत्या किंवा वैयक्तिकरित्या, त्यांच्यासाठी उपयुक्त असलेल्या सर्व गोष्टींचे उत्पादन स्वतःच करत असतील (जसे आदिम टोळी समाजात होते आणि अगदी प्रगत आणि उच्च स्तरावरील कम्युनिस्ट समाजात असे असेल) तर वस्तूंच्या विनिमयाची गरज नसेल आणि वस्तू केवळ उपयोग-मूल्य म्हणून अस्तित्वात असतील आणि त्या मालामध्ये रूपांतरित होणार नाहीत, कारण माल म्हणजे फक्त त्या वस्तू आहेत ज्यांची देवाणघेवाण किंवा खरेदी-विक्री केली जाऊ शकते. जेव्हा समाजात श्रमविभागणी असते, म्हणजेच विविध उत्पादक किंवा उत्पादकांच्या गटांद्वारे विविध उपयुक्त वस्तू तयार केल्या जातात, तेव्हाच सर्व उपयुक्त वस्तूंचे मालामध्ये रूपांतर होते. अशा परिस्थितीत विनिमय अनिवार्य होऊन जाईल. श्रमाचे सामाजिक विभाजन उत्पादक शक्तींच्या विकासासह विकसित झाले, जी स्वत: निसर्गासोबत मनुष्याच्या उत्पादन आंतरक्रियेत विकसित झाली. हे सामाजिक श्रम विभाजन उत्पादकांच्या नकळत विकसित होते. यामागे जाणीवपूर्वक नियोजन किंवा कुठलीही योजना नसते.

सामाजिक श्रम विभाजनासह, म्हणजे जेव्हा वेगवेगळे उत्पादक वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करतात, तेव्हा वस्तूंचा विनिमय सुरू होतो आणि यासोबतच त्यांचे मालामध्ये रूपांतर होते. आता ती केवळ उपयोग-मूल्ये राहत नाहीत तर सोबतच ती विनिमय-मूल्यांमध्येही रूपांतरित झाली आहेत. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, विनिमय-मूल्य हे दोन वस्तूंच्या देवाणघेवाणीच्या प्रमाणाशिवाय दुसरे काहीही नाही. म्हणजेच, 'क' या वस्तूच्या किती प्रमाणाचे 'ख' या वस्तूच्या किती प्रमाणासोबत देवाणघेवाण केली जाईल याचे गुणोत्तरच विनिमय-मूल्य आहे. आपल्याला हे देखील माहित आहे की विनिमय-मूल्य हे दुसरे काही नसून मूल्याचेच रूप असते, म्हणजेच दोन्ही वस्तूंच्या मूल्याचे प्रमाण किंवा त्यामध्ये लागलेल्या अमूर्त मानवी श्रमांच्या प्रमाणावरच हे गुणोत्तर ठरते. दुसऱ्या शब्दांत, विनिमय-मूल्य हे प्रत्यक्षात दोन वस्तूंच्या मूल्याचे गुणोत्तर आहे, जे स्वतः काही नसून अमूर्त मानवी श्रमाचे प्रमाण आहे, ज्याला सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम-काळात मोजले जाते.

ॲडम स्मिथचा असा विश्वास होता की मनुष्य त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळे देवाणघेवाण करतो आणि देवाणघेवाणीमुळे सामाजिक श्रम विभाजन निर्माण होते. मार्क्सने दाखवून दिले की बाब नेमकी उलटी आहे. वास्तवात श्रमाचे सामाजिक विभाजन उत्पादक शक्तींच्या विकासासह निर्माण होते आणि त्याच्या परिणामी देवाणघेवाण म्हणजेच विनिमय निर्माण होतो. मार्क्सने दाखवून दिले की विनिमय प्रत्यक्षात विकसित होण्याच्या खूप आधी, आदिम जमातींमध्ये वय आणि लिंग यांच्या आधारावर श्रमांची नैसर्गिक विभागणी विकसित झाली होती. नंतर, वेगवेगळ्या जमातींमध्ये देवाणघेवाण सुरू झाली कारण त्यांच्यामध्ये सामाजिक श्रम विभाजन विकसित झाले होते आणि ते वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करत होते आणि त्यांना एकमेकांच्या उत्पादनांची आवश्यकता होती. म्हणून, सामाजिक श्रम विभाजन देवाणघेवाणीपूर्वी निर्माण झालेले असते आणि त्याचा उत्तरोत्तर विकास विनिमयाला जन्म देतो आणि अशा प्रकारे माल उत्पादनासाठी ही एक पूर्वअट आहे.

**पण हेही खरे आहे की, जेव्हा एकदा माल उत्पादन सुरू होते तेव्हा उत्पादक शक्तींच्या उत्तरोत्तर विकासाबरोबर, हे माल उत्पादन सामाजिक श्रम विभाजनाला आणखी वाढवते.** एकच उत्पादन प्रक्रिया अनेक भागांमध्ये विभागली जाते आणि कालांतराने एक स्वतंत्र उत्पादन प्रक्रिया बनते.

मानवी सभ्यतेसाठी सर्व उत्पादित उपयोग-मूल्यांचे उत्पादन मानवी श्रमाद्वारे केले जाते आणि म्हणूनच मानवी सभ्यतेचा आधार दुसरा काही नसून मानवी श्रमच आहे. परंतु समस्त समृद्धीचे दोन स्त्रोत आहेत: श्रम आणि निसर्ग. श्रम हा सर्व संपत्तीचा पिता आहे तर निसर्ग ही सर्व समृद्धीची जननी आहे असे मार्क्सने म्हटले होते. परंतु सर्व मूल्यांचा केवळ एकच स्त्रोत आहे: श्रम. कारण मूल्य म्हणजे दुसरे काहीही नसून मालामध्ये वास्तवीकृत झालेले अमूर्त मानवी श्रम होय.

आता आपण मूल्य आणि विनिमय मूल्य यांच्यातील संबंध आणखी खोलात आणि तपशीलाने पाहू आणि याच प्रक्रियेत पैशाच्या उदय आणि विकासाची प्रक्रिया समजून घेऊ.

### मूल्याचे रूप, किंवा, विनिमय-मूल्य

आपल्याला माहित आहे की **उपयोग-मूल्याचा यथार्थ हा पूर्णपणे वैयक्तिक यथार्थ आहे.** याचा अर्थ असा आहे की एक उपयोग-मूल्य केवळ गुणात्मकरीत्या दुसऱ्यापेक्षा वेगळे म्हणून पाहिले जाऊ शकते. हे प्रत्येक उपयोग-मूल्याला गुणात्मकरीत्या विशिष्ट बनवते. उदाहरणार्थ, बूट आणि घड्याळ यांचे स्वतःचे वेगळे गुणात्मक वैशिष्ट्य आहे आणि गुणांच्या आधारावर त्यांचे विशिष्ट अस्तित्व आहे. त्यामुळे उपयोग-मूल्य म्हणून प्रत्येक माल विशिष्ट प्रकारच्या ठोस श्रमाचे उत्पादन असते आणि त्याला त्याच्या विशिष्ट उपयुक्ततेच्या आधारावर इतर मालांपासून गुणात्मकपणे वेगळे केले जाऊ शकते. जेव्हा आपण म्हणतो की उपयोग-मूल्य म्हणून प्रत्येक मालाचे पूर्णपणे वैयक्तिक वास्तव असते, तेव्हा त्याचा अर्थ हाच आहे.

**परंतु मूल्य म्हणून मालाचे वास्तव हे शुद्धरुपाने एक सामाजिक वास्तव आहे.** म्हणजेच, गुणात्मकदृष्ट्या दोन मालांच्या मूल्यांमध्ये, म्हणजे त्यांच्या वास्तवीकृत झालेल्या अमूर्त मानवी श्रमांमध्ये गुणात्मक फरक केला जाऊ शकत नाही. ते दोन्ही अमूर्त श्रमाचे दोन भिन्न प्रमाण आहेत आणि मूल्याच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये केवळ परिमाणात्मकपणेच फरक केला जाऊ शकतो, गुणात्मकरित्या नाही. गुणात्मकदृष्ट्या, एखाद्या मालाचे मूल्य हे सामान्य अमूर्त मानवी श्रमच आहे आणि इतर कोणत्याही मालामध्ये लागलेल्या सामान्य अमूर्त मानवी श्रमापेक्षा त्याकडे गुणात्मकदृष्ट्या भिन्न म्हणून पाहिले जाऊ शकत नाही. हा साधारणपणे मानवी मेंदू, मज्जातंतू आणि स्नायूंचा खर्च आहे, दुसरे काहीही नाही आणि त्यामुळे दोन्ही मालामधील मानवी मेंदू, मज्जातंतू आणि स्नायू यांच्या खर्चात गुणात्मक फरक केला जाऊ शकत नाही. दोन भिन्न उपयोग-मूल्यांमधील देवाणघेवाण करण्यासाठी, त्यांच्यामध्ये लागलेल्या ठोस श्रमांना नजरेआड करून त्यांच्यामध्ये लागलेल्या सामान्य मानवी अमूर्त श्रमांना लक्षात घेणे आवश्यक आहे, कारण हेच त्यांच्यामध्ये समान आणि तुलना करण्याजोगे आहे आणि याच प्रमाणाच्या आधारावर दोन मालांच्या देवाणघेवाणीचे अथवा विनिमयाचे गुणोत्तर निश्चित केले जाते. म्हणून, मूल्यांच्या रूपात मालांचे अस्तित्व पूर्णपणे सामाजिक आहे कारण त्यांचे सारतत्त्व संपूर्णपणे एक सामान्य सामाजिक वस्तू, म्हणजेच अमूर्त मानवी श्रम आहेत.

**मूल्य विनिमयाच्या प्रक्रियेतच अभिव्यक्त होते, परंतु ते निर्माण विनिमयात नाही तर उत्पादनात होते.** ज्याअर्थी मूल्याच्या रूपात मालांचे पूर्णपणे सामाजिक अस्तित्व असते आणि त्यांच्या मूल्याचे आकलन केवळ त्यांच्या सर्व वैयक्तिक वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष करूनच केले जाऊ शकते, त्यामुळे मूल्याच्या रूपात माल एकमेकांपासून केवळ परिमाणात्मकदृष्ट्याच भिन्न असतात. उदाहरणार्थ, खर्च झालेल्या अमूर्त मानवी श्रमाच्या प्रमाणाच्या आधारावर एका घड्याळासाठी दोन जोडी चपलांची देवाणघेवाण केली जाऊ शकते. मूल्याच्या रूपात त्यांच्यामध्ये केवळ परिमाणात्मक संबंधच आहे आणि मूल्याचा विचार करताना आपण उपयोग-मूल्यांच्या रूपातील त्यांच्या विशिष्टतेकडे दुर्लक्ष करतो.

**साहजिकच, फक्त दोन भिन्न मालांचाच विनिमय केला जातो कारण कोणीही समान मालाचा समान मालाशी विनिमय करणार नाही.** ज्याअर्थी मूल्याच्या रूपात मालाचे शुद्धपणे सामाजिक अस्तित्व असते, त्यामुळे एक माल आपले मूल्य केवळ दुसऱ्या मालाच्या रूपातच अभिव्यक्त करू शकतो. जेव्हा एक माल आपले मूल्य दुसऱ्या मालाच्या निश्चित प्रमाणाच्या रूपात अभिव्यक्त करतो, तेव्हा यालाच आपण विनिमय मूल्य म्हणतो, म्हणजे दोन मालांच्या मूल्यांच्या आधारे देवाणघेवाण करावयाच्या त्यांच्या प्रमाणांचे गुणोत्तर किंवा दोन मूल्यांच्या विनिमयाचे गुणोत्तर. या रूपात, विनिमय मूल्य दुसरे काही नसून मूल्याचे रूप (form of value) आहे. जेव्हा एखाद्या मालाचे मूल्य स्वतंत्र मूल्य-रूप धारण करते तेव्हा ते विनिमय मूल्याचे रूप धारण करते.

**पैसा दुसरे काही नसून मूल्याच्या रूपाच्या विकासाचा परिणाम आहे,** जो मूल्य आणि उपयोग-मूल्य यांच्यातील गहन होत जाणाऱ्या अंतर्विरोधाचा परिणाम असतो. आपण सर्व या रूपाला म्हणजे पैशाच्या रूपालाच ओळखतो ज्यामध्ये उपयोग-मूल्याचा प्रत्येक सुगावा, प्रत्येक खुण पुसली गेली आहे. हे चमत्कारिक रूप, म्हणजेच पैसा, आपल्याला रहस्यमय शक्तींनी संपन्न असल्याचे दिसते कारण त्याचा विनिमय जगातील कोणत्याही मालासोबत केला जाऊ शकतो. ज्या भांडवली समाजात संपत्ती अधिकाधिक मालांचे रूप धारण करत जाते, तिथे अधिकाधिक संपत्तीवान होण्याचा अर्थच आहे अधिकाधिक मालांचा मालक होणे. ज्याअर्थी पैशाचा विनिमय कोणत्याही मालासोबत केला जाऊ शकतो, त्याअर्थी त्याचे जास्त प्रमाण हे जास्त संपत्तीचा स्त्रोत असते. पैशाची हीच गूढ दिसणारी शक्ती त्यामागील रहस्य आणि त्याबद्दलची अंधभक्ती निर्माण करते, जे दुसरे काही नसून माल अंधभक्तीचेच सर्वात विकसित रूप आहे. ही माल अंधभक्ती समाजातील सर्व मानवांमधील संबंधांना मालांमधील संबंधांच्या रूपात दडवून टाकते. वास्तवात मालाच्या देवाणघेवाणीच्या रूपात, माणसं केवळ एकमेकांच्या श्रमांच्या विशिष्ट प्रमाणाची देवाणघेवाणच करत असतात. हे सत्य तर ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांनाही समजले होते की पैशाच्या रूपात व्यक्त केलेले मूल्य म्हणजेच किंमत हे केवळ नाममात्र किंवा सांकेतिक (nominal) विनिमय मूल्य असते, जे स्वतः मालांच्या उत्पादनात खर्च केलेल्या श्रमाच्या प्रमाणावर ठरत असते.

जेव्हा मनुष्य मिळून सामूहिकपणे सर्व वस्तूंचे उत्पादन करायचे, तेव्हा त्यांच्या श्रमाचे हे सामाजिक चरित्र, त्यांच्यातील संबंध, त्याला थेट आणि स्पष्टपणे दिसायचे. पण जेव्हा समाजात श्रम विभाजन होते आणि लोकांमधले श्रम केवळ देवाणघेवाणीद्वारे एकत्र येतात आणि आपल्या सामाजिक अस्तित्वाचा आणि चरित्राचा दावा करतात, तेव्हा मानवांमधील संबंध मालांमधील संबंधांच्या पृष्ठभागाखाली लपले जातात. **हेच माल अंधभक्ती निर्माण होण्याचे मूळ आहे.** परंतु आदिम कालखंडात जेव्हा दोन भिन्न मालांचे उत्पादक गरजांच्या योगायोगाच्या आधारे (म्हणजेच योगायोगाने पहिल्या मालाच्या उत्पादकाला दुसऱ्या उत्पादकाच्या मालाची गरज असते आणि दुसऱ्या मालाच्या उत्पादकाला पहिल्या उत्पादकाच्या मालाची गरज असते) देवाणघेवाण करत होते, तेव्हा श्रमाचे हे सामाजिक चरित्र आणि मानवाच्या नातेसंबंधांवर एक पातळ पडदा होता ज्याच्या मागे, थोडे विश्लेषण आणि प्रयत्नांती, अस्पष्टपणे त्या वास्तविक मानवी संबंधांना बघितले जाऊ शकत होते. पण जेव्हा मालांच्या थेट देवाणघेवाणी ऐवजी पैशाच्या माध्यमातून मालाची देवाण-घेवाण सुरू झाली, तेव्हा ही नाती हजारो पडद्यांच्या आड गेली आणि मालांच्या देवाणघेवाणीच्या प्रचंड गुंत्यात माणसांमधलं नातं पूर्णपणे अदृश्य झालं. आता जे दिसते, ते आहे चमकणाऱ्या पैशाची गूढ शक्ती ज्यापुढे प्रत्येकजण नतमस्तक होतो. या टप्प्यावर, माल-अंधभक्ती शिगेला पोहोचते, ज्याचे ठोस रूप आपल्याला दुकानांवर टांगलेल्या लिंबू-मिरचीपासून ते तिजोरीवर लिहिलेल्या 'शुभ-लाभ'पर्यंत पाहायला मिळते.

परंतु हे पैशाचे रूप कसे विकसित झाले हे जर आपण ऐतिहासिक आणि वैज्ञानिकदृष्ट्या समजून घेतले तर रहस्याचे हे वर्तुळ, पैशाची ही जादू

पान 8 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 9

पान 7 वरून

तुटते. आता आपण हाच ऐतिहासिक विकास वैज्ञानिक रूपात समजून घेऊ.

**मूल्याचे रूप अर्थात विनिमय-मूल्याच्या विकासाचे तार्किक टप्पे**

सर्व प्रथम आपण हे समजून घेतले पाहिजे की मालामध्ये उपयोग-मूल्य आणि मूल्य यात एक अंतर्विरोध असतो. हा अंतर्विरोध वैयक्तिक श्रम आणि सामाजिक श्रम यांच्यातील अंतर्विरोध व्यक्त करतो. माल उत्पादक समाजात सर्व माल उत्पादक एकमेकांपासून स्वतंत्रपणे, एकमेकांपासून वेगवेगळे आणि एकमेकांबाबत अज्ञात आपआपल्या मालाचे उत्पादन करतात. त्यांच्या मालाला बाजारात किती मागणी आहे किंवा त्यांना खरेदीदार सापडतील की नाही हे त्यांना माहीत नसते. ते एका आकलनावर आणि अपेक्षेवर मालांचे उत्पादन करतात. जर त्यांचा माल विकला गेला, तर त्यांचे श्रम सामाजिकदृष्ट्या उपयुक्त श्रम म्हणून मान्यता प्राप्त करतात आणि उपयोग-मूल्य व मूल्य यांच्यातील अंतर्विरोध दूर होतो. परंतु त्यांच्या मालाला खरेदीदार न मिळाल्यास, त्यांच्या मालाला सामाजिकदृष्ट्या उपयुक्त श्रम मानले जात नाही आणि त्याचे मूल्यही वास्तवीकृत होत नाही आणि त्याला काही अर्थ उरत नाही. जर एखाद्या माल उत्पादकाच्या बाबतीत हे सतत घडत राहिले तर तो अन्य मालाचे उत्पादन करण्यास सुरवात करतो आणि अशा प्रकारे समाजात अस्तित्वात असलेले सामाजिक श्रम विभाजन बदलते. माल उत्पादक समाजात हे अराजक पद्धतीने घडते, त्यात अनिश्चितता असते. ही अनिश्चितता स्वतः माल अंधभक्तीला प्रोत्साहन देते. कित्येक दुकानदार किंवा भांडवलदार त्यांच्या मालाच्या साठ्यासमोर अगरबत्ती पेटवून पूजा करताना जर तुम्ही पाहिले असतील, तर विक्रीची अनिश्चितता मालावरील अंधभक्ती कशी वाढवते आणि वस्तूंना एक गूढ आभा कशी देते हे तुम्ही समजू शकता.

माल उत्पादक समाजात आणि भांडवली माल उत्पादनावर आधारित समाजामध्ये उत्पादन कोणत्याही सामाजिक योजनेवर आधारित नसते. एखादी वस्तू किंवा सेवा किती आवश्यक आहे आणि किती प्रमाणात सामूहिक श्रमातून योजनाबद्ध पद्धतीने ती तयार करायची आहे याचे कोणतेही मूल्यमापन केले जात नाही. त्यामुळे मालांची विक्री ही सहज-सोपी प्रक्रिया राहत नाही. **हा स्वतः एक अंतर्विरोध सुटण्याचा प्रश्न आहे: उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध.** या अंतर्विरोधाच्या विकासाच्या प्रक्रियेच्या एका विशिष्ट टप्प्यावर पैशाचे रूप निर्माण होते, पैसा अस्तित्वात येतो. या अंतर्विरोधाच्या तार्किक टप्प्यांचे शास्त्रीय स्पष्टीकरण मांडून मार्क्स पैशाचे गूढ आवरण फाडून काढतात.

मार्क्स विनिमय मूल्याच्या चार प्रकारांबद्दल बोलतात: **आकस्मिक-रूप, विस्तारित-रूप, सामान्य-रूप आणि पैसा-रूप.** यावर काही तपशीलवार चर्चा करणे आवश्यक आहे.

आकस्मिक-रूप (accidental form) हे असे रूप आहे ज्यावर मार्क्स सर्वात जास्त वेळ देतात कारण या रूपामध्येच पैसा-रूपाचे बीज अस्तित्वात आहे आणि जर हे मूळ रूप योग्यरित्या समजून घेतले तर पैशाचे रहस्योद्घाटन करणे तुलनेने सोपे होते. केवळ या आकस्मिक-रूपातच आपण मूल्य आणि उपयोग-मूल्य यांच्यातील अंतर्विरोध स्पष्टपणे चिन्हांकित करू शकतो, जो शेवटी पैशाला जन्म देतो. मूल्य-रूपाचे (value form) वैशिष्ट्य हे आहे की दोन मालांच्या मूल्यांमध्ये फरक असूनही, एकमेकांच्या तुलनेत त्यांचे विनिमय मूल्य समान राहू शकते. उदाहरणार्थ, जर एखाद्या वेळी माल 'क' च्या उत्पादनासाठी 2 तासांचे अमूर्त मानवी श्रम लागत असेल आणि माल 'ख' च्या उत्पादनासाठी त्याच वेळी 4 तासांचे अमूर्त मानवी श्रम लागत असेल तर त्या वेळी एका माल 'ख' च्या बदल्यात दोन माल 'क' चा विनिमय होईल. जर एक वर्षानंतर दोन्ही मालांच्या उत्पादनात श्रमाची उत्पादकता समान दराने वाढली असेल आणि आता माल 'क'च्या उत्पादनासाठी 1 तासाचे श्रम आवश्यक आहेत, तर माल 'ख'च्या उत्पादनासाठी 2 तासाचे श्रम आवश्यक आहेत. त्यामुळे दोन्ही मालांचे आंतरिक मूल्य तर अर्धे झाले, परंतु त्यांचे एकमेकांच्या सापेक्ष विनिमय मूल्य समान राहिले, म्हणजे आताही एका माल 'ख'च्या बदल्यात दोन माल 'क'चा विनिमय होईल. **अशाप्रकारे, मूल्य-रूपाचे हे वैशिष्ट्य आहे की मालांचे मूल्य समान राहूनही त्यांचे विनिमय मूल्य बदलू शकते किंवा त्यांचे मूल्य बदलल्यानंतरही त्यांचे विनिमय मूल्य समान राहू शकते.**

आकस्मिक-रूपाचे वैशिष्ट्य काय आहे? येथे दोन मालांची देवाणघेवाण योगायोगाने होते, ज्यामध्ये माल 'क'च्या एका विशिष्ट प्रमाणाचा विनिमय माल 'ख'च्या एका विशिष्ट प्रमाणासोबत होतो. म्हणजे:

x माल क = y माल ख

म्हणजेच माल 'क'च्या x प्रमाणाचा विनिमय माल 'ख'च्या y प्रमाणासोबत होत आहे. हे योगायोगाच्या परस्पर गरजांच्या, म्हणजेच दोन्ही उत्पादकांच्या गरजांच्या योगायोगाच्या आधारे होणारी देवाणघेवाण आहे ज्याला अर्थशास्त्राच्या भाषेत गरजांचा योगायोग (coincidence of needs) म्हणतात. मार्क्स या वरवर साध्या दिसणाऱ्या समीकरणात अंतर्भूत असलेला अंतर्विरोध पकडतो आणि त्याकडे आपले लक्ष वेधतो, जो संपूर्ण भांडवली समाज आणि अर्थव्यवस्थेच्या मुळाशी आहे: मूल्य आणि उपयोग-मूल्य यांच्यातील अंतर्विरोध.

मार्क्स स्पष्ट करतात की येथे माल 'क' हे **सापेक्ष मूल्य (relative value)** आहे, जेव्हाकी माल 'ख' **समतुल्य मूल्य (equivalent value)** आहे. दुसऱ्या शब्दांत येथे माल 'क' त्याचे मूल्य माल 'ख'च्या रूपात अभिव्यक्त करत आहे. माल 'क', म्हणजे ज्या मालाचे मूल्य या समीकरणात अभिव्यक्त करायचे आहे, म्हणजे जो माल सापेक्ष मूल्याची भूमिका बजावत आहे, त्याच्यासाठी माल 'ख' हे मूल्याचे मूर्त रूप आहे. आपले मूल्य अभिव्यक्त करण्यासाठी, माल 'क'ला एका दुसऱ्या मालाची आवश्यकता आहे, जो योगायोगाने या प्रसंगात त्याला माल 'ख' च्या रूपात मिळतो आणि माल 'क' जणूकाही म्हणायला लागतो की "ख हेच तर मूल्य आहे!" म्हणजेच, माल 'क'ला या प्रकरणात त्याचे मूल्य स्वतंत्रपणे अभिव्यक्त करण्यासाठी माल 'ख'ची आवश्यकता आहे. म्हणून माल 'क' साठी माल 'ख' चे उपयोग-मूल्यच हे आहे की तो मूल्य अभिव्यक्त करतो. माल 'क' साठी माल 'ख' हेच मूल्याचे मोजमाप (measure of value) आहे. वास्तवात पैसा देखील माल 'ख' प्रमाणेच कार्य करतो, म्हणजेच मूल्य मोजण्याचे कार्य करतो, परंतु केवळ माल 'क' साठीच नाही तर सर्व मालांसाठी. जर आपण वरील समीकरण उलटे केले, तर माल 'ख' हे माल 'क' च्या उपयोग-मूल्यामध्ये त्याचे मूल्य व्यक्त करेल आणि माल 'क' हे त्याच्यासाठी समतुल्य मूल्य बनेल, म्हणजे जे त्याच्यासाठी मूल्याचे मोजमाप असेल, मूल्याच्या समतुल्य असेल. येथे आपण समीकरणाच्या ज्या बाजूला उभे असू, त्यानुसार सापेक्ष मूल्य आणि समतुल्य मूल्य बदलेल. जर आपण माल 'क' च्या दृष्टीकोनातून बघितले तर माल 'ख' हे समतुल्य मूल्य असेल, मूल्याचे माप असेल आणि जर आपण माल 'ख' च्या दृष्टीकोनातून पाहिले, ज्यामध्ये माल 'ख' च्या मूल्याला अभिव्यक्त करावे लागेल आणि माल 'ख' सापेक्ष मूल्य असेल, तर भूमिका बदलून जातील आणि आता माल 'क' समतुल्य मूल्याची म्हणजे मूल्याच्या समतुल्याची किंवा मूल्याच्या मोजमापाची भूमिका बजावेल.

**जसे की आपण पाहू शकतो की आदिम काळात झालेल्या या योगायोगाच्या देवाणघेवाणीमध्येच पैशाच्या जन्माची बीजे दिसून येतात.** माल 'क' च्या दृष्टीकोनातून, माल 'ख' हे दुसरे काही नाही तर पैशाची, म्हणजे मूल्याच्या रूपाची, म्हणजेच मूल्याच्या मापाची भूमिका बजावत आहे, कारण माल 'क' त्याचे मूल्य माल 'ख' च्या मूर्त रूपातच अभिव्यक्त करत आहे आणि त्याच्यासाठी मूल्याचे मूर्त रूप दुसरे काही नसून माल 'ख'आहे. माल 'ख' ची ही भूमिकाच पैसा बजावते, परंतु आकस्मिक-रूपाप्रमाणे कोण्या एका मालासाठी नाही, तर सर्व मालांसाठी. याचा अर्थ ते एक सार्वत्रिक समतुल्य (universal equivalent) आहे, मूल्याचे सार्वत्रिक रूप आहे. परंतु हीच बाब भांडवली अर्थतज्ञांच्या दृष्टीतून गायब होऊन जाते की जोपर्यंत सोन्याचे चमकणारे रूप किंवा गांधीजींचा फोटो असलेला हिरवा कागद आलेला नव्हता, तेव्हाही आपण माल 'ख' मध्ये पैशाचे बीज रूप बघू शकतो, कारण तो माल 'क' साठी तशीच भूमिका बजावत आहे जी पैसा सर्व मालांसाठी बजावते. जर माल 'ख' ला सापेक्ष मूल्य मानले, तर माल 'क' त्याच्यासाठी समतुल्य मूल्य किंवा पैशाचीच भूमिका बजावत असतो, म्हणजे माल 'ख' च्या मूल्याचे मोजमाप, त्याच्या मूल्याचे रूप, त्याच्या मूल्याचे समतुल्य.

परंतु मूल्याचे हे रूप पैशाच्या दैदिप्यमान करून टाकणाऱ्या रूपापर्यंत कसे पोहोचले हे समजून घेण्यासाठी आपल्याला उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोधाच्या विकासाचा दुसरा तार्किक टप्पा पाहावा लागेल: म्हणजे विस्तारित-रूप **(expanded form)**

विस्तारित रूप काहीसे असे दिसते:

x माल 'क' = y माल 'ख'

x माल 'क' = z माल 'ग'

x माल 'क' = w माल 'घ'

x माल 'क' = v माल 'च'

म्हणजे, जेव्हा एकाच वस्तूच्या एका प्रमाणाचा विनिमय अनेक भिन्न मालांच्या निश्चित प्रमाणासोबत होऊ लागतो. जसजसे सामाजिक श्रम विभाजन विकसित होते, तसतसे अनेक मालांचे उत्पादन होऊ लागते व अधिकाधिक वस्तूंचे मालांमध्ये रूपांतर होत जाते. सर्वसाधारणपणे, सर्व संस्कृतींच्या इतिहासात असे आढळून आले आहे की त्या संस्कृतींमध्ये विविध वस्तूंच्या वेगवेगळ्या प्रमाणांमध्ये सामाजिक गरजा आणि उपलब्धतेनुसार, त्यांमधील एक किंवा काही वस्तूंना अधिक मागणी असते आणि विविध माल उत्पादक त्यासोबत त्यांच्या मालांचा विनिमय करू इच्छितात कारण त्या सर्वांना त्याची गरज असते. शेती आणि पशुसंवर्धनावर आधारित समाजांच्या इतिहासात अनेक वेळा ही भूमिका विविध पशु जसे की गाय किंवा शेळी (म्हणजे गुरे) आणि वेगवेगळ्या धान्यांनी बजावली. इथपर्यंत की काही समाजांमध्ये तंबाखू, कवडी इत्यादींनीही ही भूमिका बजावली. परिणामी, वेगवेगळ्या समाजांच्या इतिहासात एक किंवा काही वस्तू अधिक महत्त्वाच्या बनतात आणि त्या अधिक विनिमययोग्य असतात कारण जास्त लोकांना त्यांची आवश्यकता असते. वैदिक काळात आपल्या देशात गायी आणि काही धान्यांची अशीच परिस्थिती होती.

या **विस्तारित-रूपामध्ये ही बाब पुढे येते की माल 'ख' मध्ये असे काही विशेष नव्हते की केवळ तेच मूल्याचे रूप, मूल्याचे मोजमाप आणि त्याच्या समतुल्याची भूमिका बजावू शकते आणि आकस्मिक-रूपात माल 'क'च्या एका प्रमाणाचे माल 'ख' च्या एका निश्चित प्रमाणाशी विनिमय हा केवळ अपघाती होता ज्यामध्ये माल 'क' साठी माल 'ख' मूल्याच्या मापाच्या भूमिकेमध्ये होता आणि माल 'ख' हे माल 'क' साठी समतुल्य मूल्य होते.** परंतु विस्तारित-रूपात आपल्याकडे माल 'क' बरोबर इतर अनेक मालांचे विनिमय समीकरण पुढे आहे आणि हे देखील स्पष्ट आहे की मूल्याचा स्वतःमध्ये 'ख' च्या उपयोग-मूल्याशी कोणताही नैसर्गिक किंवा अंतर्निहित संबंध नव्हता.

यानंतरचा टप्पा म्हणजे मूल्याच्या **सामान्य-रूपाचा (General Form)** टप्पा विस्तारित-रूपाच्या टप्प्यापेक्षा आणखी एका छोट्या पायरीसह पुढे येतो. यासाठी आपल्याला विस्तारित-मूल्य रूपालाच पालटायचे आहे. म्हणजे आता माल 'क' सापेक्ष मूल्याच्या भूमिकेत आणि माल 'ख', माल 'ग', माल 'घ', माल 'च' इत्यादी समतुल्य मूल्याच्या भूमिकेत नाहीत, ज्यामध्ये वेगवेगळ्या विनिमयांमध्ये माल 'क' त्याचे मूल्य अभिव्यक्त करत आहे, तर माल 'ख', माल 'ग', माल 'घ', माल 'च' इत्यादी सर्व सापेक्ष मूल्यांच्या भूमिकेत आहेत आणि हे सर्व माल त्यांचे मूल्य माल 'क' मध्ये अभिव्यक्त करत आहेत, जे आता इतर सर्व मालांसाठी समतुल्य मूल्य किंवा मूल्याचे माप किंवा मूल्याच्या रूपाची भूमिका बजावत आहे. आता समीकरणे अशी दिसतील:

y माल 'ख' = x माल 'क'

z माल 'ग' = x माल 'क'

w माल 'घ' = x माल 'क'

v माल 'च' = x माल 'क'

**वरील रूपालाच आपण सामान्य-रूप म्हणतो.** सामान्य यामुळे कारण यामध्ये सर्व माल त्यांचे मूल्य एका विशिष्ट मालामध्ये अभिव्यक्त करत आहेत. एक विशिष्ट माल सर्व मालांसाठी मूल्याचे रूप, मूल्याचे समतुल्य आणि मूल्याचे माप बनले आहे. हे एका बाजूला पहिल्या आकस्मिक किंवा तात्विक रूपाशी सुसंगत आहे कारण सर्व माल त्यांचे मूल्य कोणत्यातरी एका मालामध्ये अभिव्यक्त करत आहेत आणि हे सामान्य रूप देखील आहे कारण हा एक माल आहे जो सर्व मालांच्या मूल्यासाठी मूल्याचे मूर्त रूप बनला आहे. आता प्रत्येक मालाला त्याचे मूल्य अभिव्यक्त करण्यासाठी स्वतःचा समतुल्य शोधण्याची गरज नाही. म्हणजेच त्यांना प्रत्येक विनिमयाच्या वेळी वेगवेगळ्या प्रकारच्या ठोस श्रमांचे अमूर्तीकरण करून त्यांचे मूल्य अभिव्यक्त करण्याची गरज नाही. जणू काही सर्व माल आता एकजूट होऊन, एकत्र येऊन कोण्या एका मालाला त्यांचे सार्वत्रिक

पान 9 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 9

पान 8 वरून

समतुल्य मानतात, ज्यामध्ये ते सर्व त्यांचे मूल्य अभिव्यक्त करतात. उदाहरणार्थ, कॅलिफोर्निया, अमेरिकेत एकेकाळी तंबाखू ही भूमिका बजावत होता, चीनमध्ये कवड्या आणि वैदिक काळात भारतात गायी आणि काही धान्यांनी ही भूमिका बजावली होती कारण समाजातील बहुतेक लोकांना या विशिष्ट वस्तूंची गरज होती, त्यासाठी त्यांच्यामध्ये मागणी होती. त्यामुळे एका दीर्घ प्रक्रियेत काही माल असे सार्वत्रिक समतुल्याचे रूप ग्रहण करतात, ज्यासोबत सर्व उत्पादक त्यांच्या मालांची देवाणघेवाण करण्यास तयार असतात. यालाच **मार्क्स सुंदर साहित्यिक परिभाषेत म्हणतात की जणू काही सर्व मालांनी एकत्र येऊन निर्णय घेतला की एखादा विशिष्ट माल हे मूल्याचे रूप आहे,** सार्वत्रिक समतुल्य आहे आणि सर्व माल त्यात त्यांचे मूल्य अभिव्यक्त करतील आणि तेच त्यांच्यासाठी मूल्याचे मोजमाप असेल.

या सामान्य रूपाच्या जन्मानंतर **पैसा-रूपाचा (Money-Form) जन्म** हा देखील एक छोटा परंतु महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा होता. माल उत्पादकांनी आणि सर्वसाधारणपणे लोकांनी ऐतिहासिक अनुभवातून हे शिकले आहे की सार्वत्रिक समतुल्याची भूमिका बजावण्यासाठी एखाद्या मालामध्ये दोन गुणधर्म असणे आवश्यक आहे: पहिला, तो **नाशवंत नसला पाहिजे आणि दुसरा, तो सगळीकडे समान रूपात आणि गुणवत्तेत उपलब्ध** पाहिजे. उदाहरणार्थ, गाय किंवा बकरी किंवा धान्य नाशवंत असतात. कोणताही उत्पादक अशा सार्वत्रिक समतुल्याच्या रूपात स्वतःजवळ मूल्य किंवा समृद्धीचा दीर्घकालीन संचय करू शकत नाही आणि त्यांच्या टिकून राहण्याची कोणतीही हमी नसते कारण ते टिकाऊ नसतात आणि नाशवंत असतात. उदाहरणार्थ, जर एखाद्याने आपल्या मालाचा गाई किंवा बकरीसोबत विनिमय केला आणि बाजारातून परतत असताना त्याची गाय किंवा बकरी एखाद्या रोगामुळे मरण पावली किंवा पळून गेली, तर मालाच्या उत्पादकाचे नुकसान होईल आणि तो बरबाद होईल! त्याचप्रमाणे तंबाखूच्या अनेक प्रजाती आहेत, गायींच्याही अनेक प्रजाती आहेत. काही गायी जास्त प्रजनन करतात आणि चांगले दूध देतात आणि कमी श्रमाने त्यांचे उत्पादन केले जाऊ शकते आणि त्यांच्यापासून दुग्ध उत्पादन केले जाऊ शकते. अशा स्थितीत, दोन गायी किंवा दोन प्रकारच्या तंबाखूचा दर्जा आणि त्यांच्या उत्पादनासाठी लागणारे श्रम यांचे प्रमाणही वेगवेगळे असेल. म्हणूनच सुरुवातीच्या काळात जगातील विविध संस्कृतींनी अनेक वेगवेगळ्या धातूंची नाणी काढण्यास सुरुवात केली जी पैशाची भूमिका बजावू लागली. या संस्कृतींमध्ये राज्यसत्ता उदयास आलेली असल्याने संपूर्ण राज्यभर देवाणघेवाण सुलभ व्हावी म्हणून, अशा पैशांना राजमान्यताही मिळू लागली जेणेकरून ती सर्वांना स्वीकार्य होतील. शेवटी सर्वात कमी नाशवंत आणि सर्वाधिक एकसमान रूपात सापडणाऱ्या धातूचा शोध सोने आणि चांदीवर येऊन संपला आणि या दोन धातूंनी जवळपास सर्व सुसंस्कृत देशांमध्ये पैशाची अर्थात पैशाची भूमिका बजावण्यास सुरुवात केली.

यासोबत सर्व मालांनी त्यांचे मूल्य सोन्यामध्ये तथा गौण रूपात चांदीमध्ये अभिव्यक्त करणे सुरु केले. समजा सोन्याच्या एका ठराविक प्रमाणाचे उत्पादन होण्यासाठी 10 तास लागतात आणि सोन्याच्या त्या प्रमाणाला आपण 1 शिलिंग किंवा 1 रुपयामध्ये अभिव्यक्त करत आहोत, तर कोणतीही वस्तू ज्याच्या एका नगाच्या उत्पादनासाठी 10 तासांचे अमूर्त मानवी श्रम लागतात, त्याचा विनिमय एक शिलिंग किंवा एक रुपयासोबत केला जाईल. इथे सोने हे पैसा आहे आणि मूल्याचे माप (measure of value) आहे आणि त्याचे परिमाण (denomination) जसे की शिलिंग, पौंड, आना, कवडी, पैसा, रुपया, फ्रँक, इ. नावे ही खरी तर किमतीची मानके आहेत (standard of price), जेणेकरून मालांच्या विविध लहान-मोठ्या प्रमाणांची देवाणघेवाण सहजतेने करता येईल. जेव्हा आपण मालाचे मूल्य पैशामध्ये अभिव्यक्त करतो तेव्हा त्यालाच किंमत किंवा दाम (price) म्हणतात. सुरुवातीस ही व्याख्या पुरेशी आहे. नंतर आपण पाहणार आहोत की वेगवेगळ्या मालांच्या बाबतीत अनेकदा त्यांचे मूल्य आणि त्यांची किंमत यामध्ये फरक असतो. परंतु आत्तासाठी आपण ही मूलभूत व्याख्या वापरून विश्लेषणाला पुढे नेऊ. म्हणजेच पैशांसोबत मालाचे मूल्य किंमत-रूप (price-form) धारण करते.

हे लक्षात ठेवले पाहिजे की मूल्याच्या रूपाच्या विकासाचे हे टप्पे तार्किक (logical) टप्पे आहेत, ते कालक्रमानुसार (chronological) नाहीत. म्हणजेच त्यांच्या इतिहासात घडण्याच्या प्रक्रिया एकमेकांसोबत आच्छादित राहिल्या आहेत आणि जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये मागे-पुढे राहिल्या आहेत.

(पुढील अंकात चालू)

(**मूळ लेख:** मजदूर बिगुल, फेब्रुवारी 2022;
**मराठी अनुवाद:** जयवर्धन)

# एन.टी.ए. अंतर्गत केंद्र आणि राज्यस्तरीय भरती आणि परिक्षांमध्ये घोटाळे!

## मागील दहा वर्षांत ऐंशीहून अधिक पेपरफुटीच्या घटना!
## मोदी राजवटीत लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर पसरले अनिश्चिततेचे दाट धुके!

✎ **पूजा**

सौरभ, ज्योती, गौरी, आशुतोष, …..! एक खूप मोठी यादी अशा विद्यार्थ्यांची ज्यांनी डॉक्टर बनण्याचे स्वप्न बघितले, त्यासाठी मेहनत घेतली, चांगले गुणही मिळवले. तरी त्यांच्यासमोर आज उभे आहे एक विशाल प्रश्नचिन्ह! भविष्याविषयी एक गडद अनिश्चितता! त्यांच्यासाठी 'न्याय' मिळवून देणारी शेवटची आशा देखील फोल ठरली जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने नीट यु.जी. फेरपरीक्षा घ्यायला नकार दिला. एन.टी.ए. (नॅशनल टेस्टिंग एजेंसी) तर्फे घेतल्या जाणाऱ्या नीट यु.जी. ह्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेत झालेली पेपरफुटी आणि अनेक स्तरांवर झालेल्या गदारोळानंतर संपूर्ण देशभरात सुरक्षित परीक्षा आणि भरती प्रणाली यांची मागणी केली जात आहे. यानंतर एका पाठोपाठ एक सी.एस.आय.आर. नेट, यु.जी.सी. नेट, नीट पी.जी. ह्या परीक्षा देखील पेपरफुटीचे, परीक्षेच्या पवित्रतेचे कारण देऊन रद्द करण्यात आल्यात. त्यांनतर सरकारच्या ह्या बेजबाबदार कारभारामुळे देशभरात विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना रस्त्यावर उतरुन आपल्या मागण्यांसाठी, एका न्याय्य परीक्षा व्यवस्थेसाठी, जगभरात विश्वगुरू बनल्याचे ढोल बडवणाऱ्या मोदी सरकारवर, दबाव बनवावा लागला. पेपरफुटी, भरती प्रक्रियेत फेरफार ह्या घटना यापूर्वी देखील घडल्या आहेत पण एका केंद्र स्तरीय परीक्षेत इतक्या मोठ्या प्रमाणावर गोंधळ हा यापूर्वी घडला नव्हता! विशेष म्हणजे इतक्या मोठ्या घोटाळ्यानंतरही मोदी सरकारने विद्यार्थ्यांच्या विरोधातच पावले उचलली आहेत. जनतेत जाती धर्माचे झगडे लावून त्यांना आपापसात लढविणाऱ्या फॅशिस्ट मोदी सरकारने त्याच्या दमनतंत्राचा जोर आता विद्यार्थ्यांवर अधिक तीव्र केला आहे. शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरण दररोज नित्यनेमाने वाढवून मोदी सरकारने सामान्य, गरीब घरातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ढकलण्याचे आणि शिक्षण श्रीमंतांच्या झोळीत टाकण्याचे तंत्र सुरूच ठेवले आहे आणि आता पेपरफुटी, परिक्षांमध्ये फेरफारीच्या घटनांनी यात आणखी भर घातली आहे.

### नीट यु.जी. 2024: नेमके काय घडले?

2024 लोकसभा निवडणूक निकालाच्या धाकधुकीत एन.टी.ए.ने निकाल घोषित करण्याच्या निर्धारित तारखेच्या तब्बल 10 दिवस अगोदर म्हणजेच 4 जून रोजी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठीच्या परीक्षेचा म्हणजेच नीट यु.जी.चा निकाल जाहीर केला. निकालानंतर देशभरात परीक्षेला बसलेले विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या विविध प्रकारे तीव्र प्रतिक्रिया समोर येऊ लागल्यात. यात 67 विद्यार्थ्यांना पूर्ण म्हणजेच 720 पैकी 720 गुण मिळाले होते, यातील सहा विद्यार्थी हरियाणातील एकाच परीक्षा केंद्रातील आहेत. 1563 विद्यार्थ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा निकष न कळवता अनुदानित गुण देण्यात आलेत कारण ह्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वेळेत मिळाली नव्हती आणि ह्या विद्यार्थ्यांनी न्यायालयाकडे तक्रार नोंदवली होती. अनुदानित गुण देतांना हे लक्षात घेतले गेले नाही की असेही अनेक विद्यार्थी असतील जे प्रश्नपत्रिका उशिरा मिळून देखील न्यायालयापर्यंत पोहचू शकले नसतील. एन.टी.ए.ने त्याची पडताळणी करणे ही स्वतःची जबाबदारी मानली नाही आणि केवळ तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच अनुदानित गुण देण्यात आलेत. ज्यामुळे बरोबर उत्तराला 4 गुण देणे आणि चुकीच्या उत्तराला 5 गुण कमी करणे ही पद्धत असताना देखील विद्यार्थ्यांना 718, 719 गुण मिळालेत. भौतिकशास्त्राच्या एकाच प्रश्नाची 2 उत्तरे योग्य मानण्यात आलीत. पेपरफुटीबाबत बिहार, हरियाणा येथे काही लोकांना अटक करण्यात आली आणि हे समोर आले की प्रश्नपत्रिका काही विद्यार्थ्यांपर्यंत आधीच पोहचवण्यात आली होती, त्यांच्याकडून उत्तरे पाठांतर करवून घेण्यात आली होती. ह्या सर्व मुद्द्यांवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि एन.टी.ए. अध्यक्ष प्रदीप जोशी यांनी वारंवार आपले वक्तव्य बदलले. धर्मेंद्र प्रधान तर प्रश्न उचलणाऱ्या विद्यार्थ्यांवर राजकीय दृष्ट्या नुकसान पोहचवण्यासाठी मुद्दाम विरोध करणारे असा आरोप लावून मोकळे झालेत. हीच जागा आहे आपल्या देशाच्या राजकारणात विद्यार्थ्यांची. आपल्या हक्क, अधिकारांसाठी जे कुणी आवाज उचलतील त्यांना देशद्रोहीसारखी दूषणे दिली जातात परंतु खऱ्या समस्येवर काम मात्र केले जात नाही. देशभरात संतप्त विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थी संघटना यांनी रस्त्यावर उतरून निर्माण केलेल्या दबावामुळे ह्या दोघांना सत्य कबूल करणे भाग पडले. पुढे सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याची याचिका फेटाळून लावत विद्यार्थ्यांची ओळख जाहीर न करता पुन्हा निकाल जाहीर करण्याचा आदेश एन.टी.ए.ला दिला. त्यानंतर तीन टप्प्यांत निकाल जाहीर करण्यात आला. कारणादाखल सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, 'पेपरफुटी झाली आहे परंतु ती व्यापक देशस्तरावर झाल्याचे काही प्रमाण नाही त्यामुळे फेरपरीक्षा घेतली जाणार नाही.' या निकालामुळे देशभरात अनेक विद्यार्थ्यांनी देशातील परीक्षा प्रणाली तसेच न्यायव्यवस्था यांवर अविश्वास जाहीर करत आपला निषेध नोंदवला. पेपरफुटी सोबतच वेगवेगळ्या स्तरावर घोटाळे होऊनदेखील आज देशातील विद्यार्थ्यांना एका पारदर्शक आणि प्रामाणिक पद्धतीने परीक्षा घेतली जाण्याची अपेक्षा करण्याचा अधिकार देखील उरला नाही. यानंतर एकापाठोपाठ एक यु.जी.सी. नेट, सी.एस. आय.आर. नेट ह्या परीक्षा देखील पेपरफुटीचे कारण देऊन रद्द करण्यात आल्यात. नीट पी.जी.ची परीक्षा देखील ऐनवेळी पुढे ढकलण्यात आली ज्यासाठी देशातील 2 लाख डॉक्टर आपापल्या परीक्षा केंद्रांवर अनेक तासांचा प्रवास करून पोहचले देखील होते.

### एन. टी. ए. म्हणजे नॉन ट्रस्टेबल एजेन्सी!

परीक्षा सुरळीत पार पडाव्यात या एकाच कारणासाठी सुरू करण्यात आलेल्या एन.टी.ए.च्या सुरुवातीपासूनच परीक्षा प्रक्रियांवर संशय निर्माण होणे सुरू झाले. एन.टी.ए. ने घेतलेल्या अनेक परीक्षांमध्ये घोटाळे, पेपरफुटीच्या घटना समोर आल्यात. जसं की जे.ई.ई. मेन्स 2021 मधील पेपरफुटी ज्यात 9,39,008 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. नीट यु.जी. 2021 पेपरफुटी(13,66,000 विद्यार्थी) यु.जी.सी. नेट 2021 पेपरफुटी(12,67,000 विद्यार्थी), नीट यु.जी. 2022 घोटाळा (17,64,571 विद्यार्थी), नीट यु.जी. 2024 पेपरफुटी(13,16,268 विद्यार्थी), यु.जी.सी. नेट 2024 पेपरफुटी (9,08,580 विद्यार्थी) अशी प्रचंड मोठी यादी बनते! थोडक्यात सांगायचे तर सुरुवातीपासूनच सर्व केंद्रस्तरावरील परिक्षांमध्ये घोटाळे झाले आणि त्यात लाखो विद्यार्थी प्रभावित झालेत. त्यावर कुठलीही कारवाई न करता उलट हे प्रमाण वाढतच गेले. फक्त परीक्षा घेणे ह्या एकाच जबाबदारी पार पाडण्याच्या उद्दिष्टाने ज्या संस्थेची निर्मिती करण्यात आली त्यात इतक्या मोठ्या प्रमाणात घोटाळे होतांना दिसून येणं याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ ह्याच निघतो की आज शिक्षणाच्या बाजारीकरणाची धोरणे आणखी तीव्र करत, त्याला खाजगी संस्थांच्या हाती सोपवत, सामान्य जनतेकडून ते हिरावून घेणे! एन.टी.ए. चे 75 टक्के काम हे खाजगी कंपन्यांकडून करवून घेतले जाते ज्यामुळे पेपरफुटीची अत्याधिक शक्यता बनते. नॅशनल टेस्टिंग एजंसीची सुरुवात 2018 मध्ये झाली होती. 2017 मध्ये त्यावेळच्या अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात एन.टी.ए.ची घोषणा केली आणि विनीत जोशी यांची महासंचालक म्हणून निवड केली गेली. तत्कालीन

पान 10 वर

# धीरूभाईपासून मुकेशपर्यंत : अंबानींच्या उदयात सरकारी यंत्रणेचा सहभाग

पान 12 वरून

त्या अगोदर जिओ कसे अस्तित्वात आले याकडे पाहणे अत्यंत उद्बोधक ठरेल. मुकेश अंबानी यांनी प्रथम एक लहान, अज्ञात कंपनी विकत घेतली जिने आदल्या दिवशी देशस्तरावर वायरलेस स्पेक्ट्रम विकत घेतले होते. लिलाव जिंकण्यासाठी, या फर्मने स्वतःला तिच्या वास्तव किंमतीच्या शंभर पट असल्याचे घोषित केले होते. स्पेक्ट्रम परवान्याने त्याना फक्त इंटरनेट सेवा प्रदान करण्याची परवानगी दिली होती, परंतु तीनच वर्षानंतर, सरकारने तिला "पूर्ण मोबिलिटी" सेवेचा परवाना दिला. याच फर्मचे नाव बदलून जिओ केले गेले. थोडक्यात संपूर्ण मोबिलिटी परवान्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या काही अंश खर्चामध्ये परवानग्या दिल्या गेल्या. त्यामुळे मुकेश अंबानींना स्वस्त दरात परवाना मिळाला. मोदीचा आवडता "रेवडी" वाटपाचा युक्तिवाद त्यांच्या कॉर्पोरेट बॉसेससाठी कधी लागू होत नाही असे दिसते.

जिओच्या यशाची कहाणी पाहिल्यास, ट्रायच्या (टेलिकॉम रेग्युलेटरी अथोरिटी ऑफ इंडिया) नियमांमध्ये अनेक संशयास्पद बदल वेळोवेळी केल्यामुळे कंपनीच्या प्रगतीला हातभार लागल्याचे दिसून येते. रिलायन्सला त्यांच्या नेटवर्कच्या कनेक्टिव्हिटीची "चाचणी" करण्याची, जी नेहमीपेक्षा जास्त दिवसांसाठी होती, परवानगी दिल्याबद्दल ट्राय वर टीका करण्यात आली होती. जिओला स्पर्धा कायदे आणि नियामक छाननी टाळण्याची परवानगी दिल्याचा आरोप नियामकावर नंतर करण्यात आला. जिओ लाँच झाल्यानंतर एका महिन्यानंतर ट्रायने इंटरकनेक्शन चार्जमध्ये कपात करण्याची घोषणा केली होती, ज्यामुळे जिओला तिच्या ग्राहकांचे कॉल कनेक्ट करणे स्वस्त झाले. ट्रायने पुरेसे इंटरकनेक्टिंग पॉईंट्स न दिल्याबद्दल जिओला सुमारे 3000 कोटी, एअरटेल, व्होडाफोन इत्यादी इतर नेटवर्कलाही दंड ठोठावला. जेव्हा जेएस दीपक नावाच्या नोकरशहाने एका आयोगाचे नेतृत्व केले, ज्याने आरआयएलला ट्रायने झुकते माप दिल्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तेव्हा त्यांची दूरसंचार सचिव पदावरून बदली करण्यात आली. यातून दिसून येते की भाडवलदार वर्गाच्या इतर काही हिश्श्यापेक्षा रिलायन्सला सरकार दरबारी जास्त फायदा निश्चितपणे मिळाला आहे.

मोदी सरकारने अद्याप बी.एस.एन.एल. ला 4जी सेवांसाठी स्पेक्ट्रम दिलेला नाही, तो बहुधा जिओविरोधातील स्पर्धा रोखण्यासाठी. नुकतेच बी.एस.एन.एल. चे 4जी लाँच पुढील वर्षासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. 2015 मध्ये जेव्हा जिओ औपचारिकपणे लाँच करण्यात आले तेव्हा भारतात जवळपास नऊ खाजगी-क्षेत्रातील वायरलेस सेवा प्रदात्या कंपन्या होत्या. आज, प्रभावीपणे फक्त तीन आहेत-भारती एअरटेल, व्होडाफोन-आयडिया आणि जिओ. इकॉनॉमिक टाईम्सच्या म्हणण्यानुसार, स्वतःचे व्यवसाय साम्राज्य चालवणारा मुकेशचा लहान भाऊ अनिल अंबानी यानेही सांगितले होते की दूरसंचार क्षेत्रात अल्पसंख्यक संरचना आता वेगाने दुहेरीकडे जात आहे आणि अखेरीस एकाधिकार बनू शकते. सरकारच्या पाठिंब्यामुळे अनिल अंबानींचे भाकीत खरे ठरू शकते. उल्लेखनीय म्हणजे, जिओने अलीकडेच आपले डेटा शुल्क वाढवले आहे कारण ते आता पीएम मोदींच्या डिजिटल इंडियामध्ये आघाडीच्या स्थानी आहे.

रिलायन्सला विविध केंद्र आणि राज्य सरकारांकडून वर्षानुवर्षे मिळालेल्या उपकारांचे विस्तृत दस्तऐवजीकरण करण्यासाठी अनेक खंडांच्या वेगळ्या पुस्तकाची आवश्यकता असेल. पण जी काही उदाहरणे लिहिली गेली आहेत त्यातही भांडवलदार वर्ग आणि तिची व्यवस्थापकीय समिती, ज्याला सरकार म्हणून ओळखले जाते, ते आपले शोषण कसे करतात याचे स्पष्ट चित्रण आहे. अंबानी काही एखादी विसंगती किंवा "क्रोनी" नाहीत जसे त्यांना राहुल गांधी म्हणतात, परंतु आपल्यासारख्या बहुसंख्याक कामकरी जनतेच्या शोषणातून एका अतिश्रीमंत अल्पसंख्याकाच्या हितासाठी चालणाऱ्या भांडवली व्यवस्थेचाच भाग आहेत.

अंबानींसारखीच कथा देशातील आणि जगभरातील कोणत्याही व्यावसायिक घराण्याबद्दल लिहिली जाऊ शकते. 1990 च्या दशकापासून रूढ झालेल्या ट्रिकल-डाउन (पाझर सिद्धाती) अर्थशास्त्राने केवळ दुःख खाली पाझरवले आहे आणि आपल्या श्रमाने निर्माण केलेली सर्व संपत्ती लोकसंख्येच्या वरच्या 1 टक्के श्रीमंत लोकांपर्यंत पोहोचली आहे. नवउदारवादी धोरणे लागू होण्यापूर्वी परिस्थिती गुणात्मकदृष्ट्या चांगली होती असे नाही. तेव्हापासून परिस्थिती जास्त खराब झाली आहे. सर्व राजकीय पक्ष श्रीमंतांची सेवा करण्यासाठी आहेत, मग ते आमची काळजी घेण्याचे नाटक करतात. पुढे, हे विसरता कामा नये की काही भांडवलदारांना किंवा भांडवलदारांच्या वर्गांना सरकारांकडून अतिरिक्त उपकार मिळत असले तरी सरकार संपूर्ण भांडवलदार वर्गाच्या समान हिताची सेवा करते आणि त्यांच्यातील परस्परविरोधाला व्यवस्थापित करण्यासाठी कृती करण्याचा प्रयत्न करत असते.

तसेच, ज्या संस्था आणि स्वयंसेवी संस्थांना (एन.जी.ओ.) ही व्यावसायिक घराणी आपल्यापुढे तुटपुंजी भीक टाकण्यासाठी निधी देतात त्यांच्याकडून आपण फसू नये. फ्रेडरिक एंगेल्सने 1845 मध्ये धर्मादायतेबद्दल लिहिले होते, "इंग्रजी भांडवलदार स्वार्थासाठी दानधर्म करतात; ते सरळ काहीही देत नाहीत, परंतु आपल्या भेटवस्तूंचा व्यवसाय म्हणून विचार करतात, गरीबांशी सौदा करतात आणि म्हणतात: 'जर मी परोपकारी संस्थांवर एवढा खर्च केला आहे, तर मी त्याद्वारे यापुढे त्रास न होण्याचा हक्क विकत घेतो आणि आता तुमच्या अंधुक बिळासारख्या घरामध्ये राहण्यासाठी आणि तुमचे दुःख उघड करून माझ्या कोमल नसांना त्रास होऊ न देण्यासाठी तुम्ही बांधील आहात." अंबानी, अडानी, टाटा आणि बिर्ला यांची इच्छा आहे की आपण आपल्या अंधुक बिळासारख्या घरांमध्ये राहावे, आणि त्यांना श्रीमंत करण्यासाठी राबत रहावे. आपल्या दुःखातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग आहे, या भांडवलशाही व्यवस्थेचा नाश करण्यासाठी आणि समाजवादी समाजाच्या उभारणीसाठी आपल्याच क्रांतिकारी पक्षात संघटित होणे.

# एन.टी.ए. अंतर्गत केंद्र आणि राज्यस्तरीय भरती आणि परिक्षांमध्ये घोटाळे!

पान 9 वरून

शिक्षणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी 7 जुलै, 2018 रोजी विविध केंद्रस्तरीय परीक्षा एन.टी.ए. अंतर्गत घेतल्या जाण्याची अधिकृत घोषणा केली. एन.टी.ए. सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत तिचे जे कुणी महासंचालक राहिले आहेत त्यांचा सरळ संबंध संघ परिवार आणि भाजपासोबत राहिलेला आहे किंवा त्यांच्याशी जवळीक राहिली आहे. त्यामुळेच भाजपाने नेहमीच एन.टी.ए.ची बाजू सावरण्याचा प्रयत्न केला आहे जो आजही केला जात आहे. संघ आणि भाजपशी संबंधित व्यक्तींची वेगवेगळ्या पदांवर वर्णी लागावी याकरित एन.टी.ए. चा वापर केला जात असावा, हा संशय सुद्ध त्यातूनच बळावतो.

### घोटाळ्यांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावरील परिणाम!

नीट युजी मधील पेपरफुटी आणि गदारोळामुळे एरवी ज्या रँकसाठी विद्यार्थ्यांना चांगले सरकारी महाविद्यालय मिळू शकले असते त्यांनादेखील ते मिळणार नाही. अनेक विद्यार्थ्यांना एकतर परीक्षा पुन्हा देणे किंवा डॉक्टर बनण्याचे स्वप्न सोडून देणे याशिवाय दुसरे गत्यंतर उरले नाही. आजच्या नफाकेंद्री व्यवस्थेत विविध क्षेत्रातील ह्या स्पर्धापरीक्षा, प्रवेश परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी जीवन मरणाचा प्रश्न बनल्या आहेत. एक किमान स्तरावरील चांगले जीवन जगायचे म्हणजे एक नोकरी हवी ज्यासाठी ह्या परीक्षांमध्ये रात्रीचा दिवस करून सामान्य आर्थिक स्तरातील विद्यार्थी स्वतःला झोकून देतात. त्यांचा स्वाभिमान, अस्तित्व, व्यक्तिमत्त्व, गुण, अवगुण, आनंद, समाधान सर्व काही फक्त एका 'रँक' मध्ये गुंडाळून ठेवले जाते. एका अविरत चालणाऱ्या शर्यतीत त्यांना ही व्यवस्था उतरवते आणि माणूस म्हणून जगण्याचे अनेक अमूल्य क्षण, भावना त्यांच्याकडून ओरबाडून घेते. श्रीमंत घरातून न येणाऱ्या, स्पर्धेत कमी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना 'शून्य' समजले जाते. ही व्यवस्था विद्यार्थ्यांकडून मित्रांसोबत वेळ घालवणे, एखादी आवडती कादंबरी वाचणे, संगीत ऐकणे, कुठे फिरायला जाणे, आवडत्या व्यक्तींसोबत वेळ घालवणे, एखादा छंद जोपासणे यांसारख्या सर्व लहान सहान आनंदाच्या व्याख्या हिरावून घेते. त्यांचे कष्ट, स्वप्न, जिज्ञासा यांचे काहीही मोल नसते. आज देशात चारपैकी एक विद्यार्थी निराशेचा शिकार आहे. 2014 ते 2016 या वर्षांत 26,000 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. राजस्थान येथील कोटा शहर तर विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे केंद्र बनले आहे. मागील 3 - 4 वर्षांत 150 हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःला अपयशी मानून आत्महत्या केल्यात. आज तिथल्या कोचिंग सेंटर्स मध्ये आत्महत्या करता न येणारे पंखे लावले जात आहेत! पण हा त्यावरील उपाय नाही! कारण ह्या आत्महत्या शिक्षणक्षेत्रातील नफेखोरी, बाजारीकरण, स्पर्धेच्या व्यवस्थेने केलेले खून आहेत!

### भांडवली व्यवस्थेत शिक्षण फक्त श्रीमंतांची मक्तेदारी!! विद्यार्थ्यांच्या लुटीसाठी शिक्षण माफिया आणि शासन-प्रशासन संलग्न!

शिक्षणाचे बाजारीकरण आणि खाजगीकरण करवून शिक्षण श्रीमंतांच्या चाकरीत लावण्याचे काम वेगात सुरू आहे. मोठमोठ्या कोचिंग संस्था उभ्या केल्या आहेत ज्या लाखो रुपये फी विद्यार्थ्यांकडून उकळण्याचे काम करतात ज्यासाठी कित्येक विद्यार्थी शैक्षणिक कर्ज घेत असतात. एकीकडे खाजगी शिकवण्यांचा हा उद्योग 58,000 हजार कोटींचा म्हणजेच संपूर्ण शिक्षण खात्याच्या एकूण बजेटच्या 60 टक्के इतका मोठा उद्योग बनला आहे तर दुसरीकडे सार्वजनिक शिक्षणावरील खर्च सरकार दिवसागणिक कमी करत आहे. मागील 5 वर्षांत किमान 1.4 कोटी विद्यार्थी पेपरफुटी आणि परीक्षा, भरती प्रक्रियेत घोटाळा यांमुळे प्रभावित झाले आहेत. व्यापम घोटाळा, उत्तरप्रदेश, राजस्थान मधील शिक्षक भरती परीक्षा घोटाळा आणि पेपरफुटी, कर्नाटक, उत्तरप्रदेश, आसाम मधील पोलीस भरती घोटाळा, तेलंगणामधील अभियंता भरती परीक्षा घोटाळा, पाटण्यातील बी.एस.एस.सी. पेपरफुटी, इत्यादी अशा अनेक पेपरफुटी आणि घोटाळ्यांच्या घटना समोर असताना यावर काम करणे भाजप सरकारसाठी गरजेचे नाही. यासाठी काही लोकांची लोभी प्रवृत्ती जबाबदार आहे असा भ्रम जरी पसरवला जात असला तरी यासाठी संपूर्ण नफाकेंद्री भांडवली शिक्षण व्यवस्थाच याला जबाबदार आहे! भारतात खाजगी आणि सरकारी वैद्यकीय महाविद्यालये मिळून 1,09,170 जागा आहेत ज्यात प्रवेश मिळवण्यासाठी दरवर्षी सरासरी 23,33,297 विद्यार्थी प्रवेश परीक्षेला बसतात. यात खाजगी महाविद्यालयांची वार्षिक फी 80 लाख ते दीड कोटीच्या घरात जाते म्हणजेच उपलब्ध जागांपैकी 48.33 टक्के जागा आधीच श्रीमंत घरातील मुलांसाठी आरक्षित केल्या जातात. ह्या खाजगी जागांवर नीट यू.जी. परीक्षेत 720 पैकी 100, 107 असे गुण मिळवलेल्या विद्यार्थ्याला देखील प्रवेश मिळतो कारण त्यात तुम्ही पैसे किती भरू शकता हे महत्वाचं असतं. दुसरीकडे 51.66 टक्के जागांसाठी वास्तविक स्पर्धा होते हे मानण्यास हरकत नाही पण त्यातही पेपरफुटी करवून, फेरफार करवून, अत्यंत महागडी शिकवणी लावून श्रीमंत घरातील मुले आपली जागा मिळवतात. थोडक्यात हेच की सामान्य घरातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊ नये याची व्यवस्थित तरतूद आजच्या भांडवली व्यवस्थेने केली आहे जिचे डोळ्यात तेल घालून रक्षण करण्याचे काम मोदी सरकार करत आहे. नीट यू.जी. परीक्षेत 700 वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशातील काही बड्या कोचिंग संस्थांमध्ये शंभरावर देखील आहे. 50 सर्वोच्च गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या खाजगी कोचिंग संस्थांपैकी 37 एकट्या राजस्थान मधील सिकर जिल्ह्यात आहेत. सिकर मध्ये 149, कोटा येथे 74, कोट्टयम येथे 61, लखनऊ, लातूर, नोएडा, इत्यादी अनेक ठिकाणी असे संशयास्पद निकाल लागल्याचे दिसून आले असले तरी ह्या खाजगी संस्थांवर कुठल्याही प्रकारची कारवाई, चौकशी करण्यात आली नाही. भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेल्या चढाओढीत टिकण्यासाठी अशा प्रकारे परीक्षेत फेरफार होण्याच्या घटना ह्या घडतच राहतील.

शिक्षण क्षेत्रावर वर्चस्व स्थापित केलेला शिक्षण माफिया सामान्य घरांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांची लूट ही चालूच ठेवेल. त्याविरोधात आवाज उठवणे, एका दोषमुक्त परीक्षा, भरती प्रक्रियेच्या अधिकारासाठी लढणे, शिक्षणाला मूलभूत अधिकार बनवणे यासाठी संघर्ष उभा करणे हे विद्यार्थी तरुणांचे, सामान्य जनतेचे काम आहे.

# शहीद चंद्रशेखर आझाद: भविष्यात होणाऱ्या नव्या भारतीय समाजवादी क्रांतीचे प्रेरणास्रोत!



✍ अरुण

23 जुलै, शहीद चंद्रशेखर आझादांचा जन्मदिवस. चंद्रशेखर आझादांचा जन्म 23 जुलै 1906 रोजी मध्यप्रदेशमधील भाबरा या गावी झाला. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती, ज्यामुळे ते आपले प्राथमिक शिक्षणदेखील पूर्ण करू शकले नाहीत, घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे लवकरच आझाद बाहेर मिळेल ते काम, मजुरी करु लागले. सामान्य आर्थिक कुटुंबातील असणाऱ्या उणिवांची त्यामुळे त्यांना पूर्ण जाणीव होती. लहानपणी भावरा आणि त्याच्या आजूबाजूच्या भागातील आदिवासी, शेतकरी यांचे जीवन, सामाजिक परिस्थिती त्यांनी जवळून बघितली होती. काही दिवस त्यांनी मुंबईमध्येही कामगार म्हणून काम केले होते. मुंबईतील कामगारांचे जीवन स्वतः जगले होते आणि याचा आझादांच्या संवेदनशील व्यक्तित्वावर झालेला परिणाम वयाच्या अगदी 15 व्या वर्षी त्यांना स्वातंत्र्य चळवळीकडे घेऊन आला. 1921 मध्ये सुरु असलेल्या असहकार चळवळी मध्ये त्यांनी भाग घेतला. आंदोलनादरम्यान घोषणा देत असताना त्यांना पोलीसांनी पकडले होते, एवढ्या लहान वयातही न्यायाधीशाने त्यांना वेताचे फटके मारण्याची शिक्षा दिली होती. तेव्हा न्यायालयात बाल चंद्रशेखरने आपले आडनाव 'आझाद' असल्याचे नोंदवले. तेव्हापासून ते त्याच आडनावाने ओळखले जाऊ लागले.

पुढे गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतल्यावर आशाभंग झालेले आझाद 1922 साली राम प्रसाद बिस्मिल यांनी स्थापन केलेल्या 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोशिएशन'( एच.आर.ए.) या क्रांतिकारी संघटनेत सामील झाले. त्यानंतर ते एच.आर.ए.चे सक्रिय सदस्य झाले आणि त्यांनी एच.आर.ए.साठी निधी गोळा करण्यास सुरुवात केली. संघटना उभा करायला लागणारा पैसा सरकारी मालमत्तेवर दरोडा टाकून घेतला पाहिजे, या मताचे होते. त्यासाठी एच.आर.ए.च्या राम प्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खान, राजेंद्र लाहिरी, सचिन्द्र बक्षी, केशव चक्रवर्ती, मन्मथ गुप्ता, मुकुंदी लाल, मुरारी लाल, बनवारी लाल आणि चंद्रशेखर आझाद या क्रांतिकारकांनी 9 ऑगस्ट 1925 या दिवशी काकोरी येथे ट्रेनवर दरोडा टाकून सरकारी खजिना लुटला. त्यानंतर पोलिसांकडून झालेल्या धरपकडीमध्ये एच.आर.ए.च्या क्रांतिकारकांचे मोठ्या प्रमाणात दमन झाले. फाशी, तुरुंगवास यांचे चक्र सुरु झाले आणि यात एच.आर.ए.ची मुख्य फळीच मोठ्या प्रमाणात नष्ट झाली. विखुरलेल्या संघटनेला उभे करण्याचे महत्त्वाचे काम आझादांनी केले. पुढे 1928 साली संघटनेने स्वीकारलेल्या समाजवादी सिद्धांतांमुळे एच.आर.ए.चे नामकरण 'हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन' (एच.एस.आर.ए.) झाले. उद्देश होते, भारताला स्वातंत्र्य मिळवून समाजवादी राज्याची स्थापना करणे. आझाद या संघटनेचे कमांडर बनले.

मानवी शोषणाचा अंत, समानता, वर्गविहीन समाज या कल्पना आणि समाजवादाने आझाद प्रेरित झालेले होते. त्याकाळी समाजवादावरील बहुतेक पुस्तके ही इंग्रजी भाषेत असायची, हिंदी मध्ये उपलब्ध नव्हती. इंग्रजी भाषा, शिक्षण यांच्या मर्यादा असूनदेखील आझाद वैज्ञानिक समाजवाद समजून घेण्यासाठी आपल्या साथींकडून इंग्रजी पुस्तके वाचून, हिंदीमध्ये त्याचा अनुवाद करून घेत, त्याचा अर्थ समजून घेत, त्यावर चर्चा करत. त्यांनी 'कम्युनिस्ट जाहीरनामा', सत्यभक्त यांचे 'ए बी सी ऑफ कम्युनिझम' ही पुस्तके अशाच प्रकारे समजून घेतली होती. संघटनेतील इतर सहकाऱ्यांनी देखील पुस्तके वाचली पाहिजेत, अभ्यास केला पाहिजे याबाबत आझाद अत्यंत आग्रही होते.

ईश्वर आहे किंवा नाही यावर आझादांचे निश्चित मत बनले नसले तरी, ईश्वराची सत्ता नाकारणाऱ्या भगत सिंहांच्या विधानांना त्यांनी कधीही विरोध केला नाही, ना कधी ईश्वराची वकालत केली, ना कधी ईश्वराच्या मागे लागले. अगोदर त्यांच्यावर आर्यसमाजी विचारांचा प्रभाव होता मात्र जेव्हापासून संघटनेने समाजवादाचा रस्ता धरला, तेव्हापासून आझाद कधीही ईश्वराच्या मागे लागलेले दिसले नाहीत. समाजवादी राज्यात भविष्यात दिसणारे शेतकरी- मजुरांचे, सामान्य जनतेचे हित ओळखल्याने समाजवादी विचार स्वीकारायला त्यांना वेळ लागला नाही.

आजकाल सर्वच क्रांतिकारक, महापुरुष, इतिहासातील नेत्यांना जाती-धर्म यांसारख्या अस्मितावादी चौकटीत बंदिस्त करून त्यांच्या खऱ्या विचारांना फाटा देण्याचे काम काहीजन अजाणतेपणी आणि काहीजन त्यांच्या वैयक्तिक आणि राजकीय स्वार्थाकरिता अगदी जाणीवपूर्वक करत असतात. चंद्रशेखर आझाद पण यातून सुटू शकले नाहीत कारण या जगात मानवी समाजात जन्म घेणारा प्रत्येक व्यक्ती 'क्रांतिकारक', 'महापुरुष', 'नेता' घडण्याआधी आणि नंतर तो एक माणूस असतो. मानवी समाजात 'माणूस' म्हणून जन्म झाल्याकारणाने तो किंवा ती क्रांतिकारक त्या समाजाने आखलेल्या किंवा निर्माण केलेल्या किंवा निर्माण झालेल्या कुठल्या ना कुठल्या जात, धर्म, भाषा, पंथ, देश, प्रांत, राष्ट्र, रंग, लिंग यातील कुठल्यातरी सामाजिक पार्श्वभूमीतून येत असतो. 'जन्म' ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे ,त्यावर कुणाही व्यक्तीचा ताबा नसतो त्यामुळे कुठल्या सामाजिक पार्श्वभूमीत जन्म घ्यायचा यावरही कुणा व्यक्तीचा ताबा नसतो. कोणताही व्यक्ती जेव्हा क्रांतिकारी चळवळीत सहभागी होतो तेव्हा तो रोज सामाजिक क्रांतिकारी व्यवहारातून शिकत असतो, क्रांतीचे नवीन सिद्धांत, व्यवहार जन्माला घालत असतो आणि स्वतः देखील सकारात्मकपणे बदलत असतो, ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. अगदी तसेच चंद्रशेखर आझाद ब्रिटिशकालीन भारतात आत्ताच्या मध्यप्रदेश राज्यात एका ब्राह्मण कष्टकरी कुटुंबात जन्मले, पण जीवनात त्यांनी क्रांतीचा मार्ग स्विकारला आणि स्वतःला बदलत गेले. जसे कुठल्याही सर्वसाधारण भारतीय कुटुंबात वाढणाऱ्या प्रत्येक लहान मुलावर जशी आजूबाजूची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, कुटुंबातील धार्मिक वातावरण प्रभाव पाडते तसे आझादांवरही तो प्रभाव पडला. त्यामुळे काही जुन्या फोटोंमध्ये, त्यांच्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळातील, ब्राह्मण जातीची ओळख असणारे 'जानवे' आझादांनी परिधान केलेले दिसते.

पण सुरुवातीपासून अगदी 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' मध्ये सामील होईपर्यंत त्यांनी कधीही धार्मिक, जातीय द्वेष केल्याच्या अथवा पसरवल्याचा कुठलेही उदाहरण इतिहासात नाही. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आझादांवर सुरुवातीच्या काळात 'आर्य समाजी' विचारांचा देखील प्रभाव होता, हे देखील कुणापासून लपलेले नाही. पण जेव्हापासून आझाद 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोशिएशन' मध्ये सामील झाले, तेव्हापासून ते क्रांतिकारी जीवन जगले, जात, धर्म यांसारख्या कुठल्याही भेदाला किंचितही स्थान न देता त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण करण्याचा निर्णय घेऊन या उद्दिष्टाप्रती शक्य तितक्या ऐहिक गोष्टींचा त्याग करून ते जीवन जगले.

पुढे 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोशिएशन' समाजवादी तत्वांना स्वीकारून 'हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन' बनले आणि चंद्रशेखर आझाद हे संघटनेचे 'कमांडर इन चीफ' या सर्वोच्च जबाबदारीवर आले. समाजवादी संघटनेच्या क्रांतीच्या, धर्मनिरपेक्षतेच्याता, आंतर्राष्ट्रीयतावादाच्या मतांची त्यांना पूर्णपणे जाणीव होती, एवढेच नाही तर त्यांनी संघटनेची ही धोरणे फक्त कागदावर न ठेवता समाजवादी मूल्य आपल्या आणि संघटनेच्या क्रांतिकारी दैनंदिन आयुष्यात लागू केली आणि त्या समाजवादी मूल्यांकरिता, क्रांतीकरिता, मानवी समाजाकरिता सर्वोच्च त्याग म्हणजेच बलिदान द्यायला किंचितही मागे हटले नाहीत, त्याकरिता कुठलीही तडतोड केली नाही अथवा कुठली माफी मागितली नाही. प्रसंगी स्वतःच्या हाताने पोलिसांच्या हाती न लागता वयाच्या अगदी 25व्या वर्षी शहीदत्व पत्करले, हा इतिहास आहे जो कुणीही नाकारू शकत नाही.

आज चंद्रशेखर आझादांना ब्राह्मण म्हणून, हिंदू म्हणून, राष्ट्रवादी म्हणून साजरे करणारे वा त्यांच्या सामाजिक क्रांतिकारी व्यवहाराला नाकारून केवळ त्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीमुळे त्यांच्या कार्याला कमी लेखणारे असे सर्वजण हे आझादांचे समाजवादी विचार, समाजवादाचा आंतर्राष्ट्रीयतावाद, धर्म , जात याबद्दलची भूमिका, खरी धर्मनिरपेक्षता, आझादांचे समाजवादी क्रांतीचे उद्दिष्ट, त्यांचा खरा वैचारिक वारसा आणि त्यांनी क्रांतीसाठी दिलेले बलिदान या सर्वांना नाकारून आझादांचा उपयोग त्यांच्या वैयक्तिक आणि राजकीय फायद्यासाठी करून त्यांच्या शहीदत्वाचा अपमान करत आहेत, ते सर्वच समाजवादी क्रांतीचे, कामगार वर्गाचे आणि आझादांचे शत्रू आहेत.

स्वभावाने अत्यंत संवेदनशील, काळजीवाहू , धीट, शिस्तबद्ध, प्रसंगी कठोर असणारे आझाद संघटनेच्या 'कमांडर इन चीफ' या पदाला अगदी साजेसे क्रांतिकारक होते. लाला लजपत राय यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी 1928 मध्ये लाहोर येथे जॉन पी. सॉंडर्सवर केलेल्या गोळीबारात स्वतः आझाद देखील सामील होते. जनतेत क्रांतिकारकांना मिळणार प्रतिसाद बघता, क्रांतिकारी कारवाया रोखणे आणि क्रांतिकारकांचा बंदोबस्त करणे साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेची अत्यंत तातडीची गरज बनली होती. याचाच भाग म्हणून ब्रिटिश सरकारने 'हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन'च्या क्रांतिकारकांवर हल्ले, अटक, तुरुंगवास, गोळीबार यांचे सत्र सुरु केले. बराच काळ सरकारच्या हिट लिस्ट वर असणारे आझाद एकदाही पोलिसांच्या ताब्यात सापडले नाहीत. अटकेत असणारे त्यांचे सहकारी विशेषतः भगत सिंहांना लवकरात लवकर जेलमधून बाहेर काढले पाहिजे, या नियोजनात आझाद होते. राजगुरू जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी दिनांक 27 फेब्रुवारी, 1913 रोजी, अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क मध्ये गेले होते. एका अज्ञात खबऱ्याने पोलिसांना याची बातमी दिली. थोड्याच वेळात पोलिसांनी मैदानाला चहू बाजूंनी वेढा घातला आणि आझादांवर गोळीबार सुरु केला, आझादांनीही आपले पिस्तूल काढून पोलिसांना हल्ल्याचे उत्तर दिले, ज्यात त्यांनी एकहाती गोळीबारात तीन पोलिसांना मारले; मात्र त्यांच्याजवळील बंदुकीच्या गोळ्या संपल्यामुळे, पोलिसांच्या हातून मरण्यापेक्षा शेवटची गोळी त्यांनी स्वतःच्या डोक्यात मारली आणि अशा रीतीने भारतीय क्रांतिकारी चळवळीतील एक महान क्रांतिकारक शहीद झाला.

क्रांतिसारख्या महान आणि उदात्त समाजकार्याला आपले संपूर्ण जीवन अर्पण केलेले चंद्रशेखर आझाद शरीराने जरी आज आपल्यात नसले तरी, समाजवादी क्रांतीच्या विचाराच्या प्रेरणेच्या रुपाने, आपल्याला सदैव अन्याय, अत्याचार, शोषण यांच्या विरोधात, समाजवादी क्रांतीच्या दिशेने अग्रेसर करण्याकरिता सदैव मार्गदर्शक म्हणून प्रकाशरत आहेत. आज देशभरात बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे, भांडवलदार वर्ग दिवसेंदिवस जनतेवर करांचा बोजा लादत चालले असल्याने महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. दोन वेळेचा सकस आहार, मुलांचे शिक्षण, दवाखाना या गोष्टींची पूर्तता करता-करता सामान्य जनतेच्या नाकी नऊ आले आहेत. दिवस -रात्र मालकवर्गासाठी राबून संपत्ती निर्माण करणे आणि स्वतः जनावरांसारखे कसेबसे दिवस काढणे, हेच कामगार, मजूर वर्गाचे जीवन बनले आहे. चंद्रशेखर आझाद हे देशांत निर्माण झालेल्या निराशेच्या विरोधात नवा समाजवादी समाज निर्माण करण्यासाठी तरुणांमध्ये आदर्श असा निरंतर आशेचा स्रोत आहेत.

# धीरूभाईपासून मुकेशपर्यंत : अंबानींच्या उदयात सरकारी यंत्रणेचा सहभाग



✒ शशांक

अलीकडेच मुख्य प्रवाहाच्या मिडीयात आणि सोशल मीडियावर, रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानी यांच्या लग्नाभोवती लक्षवेधी बातम्या आल्या आहेत. इन्स्टिट्यूट फॉर कॉम्पिटिटिव्हनेसने सरकारी डेटा वापरून तयार केलेल्या 'भारतातील विषमतेची स्थिती' अहवालानुसार ज्या देशातील 90 टक्के लोक दर महिन्याला 25,000 रुपये देखील कमवत नाहीत, तिथे मुकेश अंबानी यांनी आपल्या मुलाच्या लग्नात 5000 कोटींहून अधिक रुपये उधळले आहेत. मुकेश अंबानींसाठी, खर्च केलेली रक्कम शेंगदाणे-फुटाण्यासारखी आहे, म्हणजे त्यांच्या एकूण संपत्तीच्या फक्त 0.5 टक्के. जगभरातील अभिनेते, खेळाडू आणि इतर "सेलिब्रेटी" काही किलोमीटर अंतरावर असलेल्या जगातील सर्वात कुरूप खाजगी निवासस्थानातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एकासाठी नाचत असताना, काही दिवसांनी शेजारीच एका जागी एअर इंडिया एअरपोर्ट सर्व्हिसेस लिमिटेड (एआयएएसएल) मध्ये विमानतळ लोडर्सच्या कामासाठी एका भरती मोहिमेत फक्त 600 रिक्त जागांसाठी 25,000 तरुण हजर झाले. हा विरोधाभास आपल्याला कामगार वर्गाचे महान शिक्षक, कार्ल मार्क्स यानी 1867 मध्ये भांडवलशाही समाजाबद्दल लिहिलेल्या गोष्टीची आठवण करून देतो - "एका ध्रुवावर संपत्ती जमा करणे, त्याच वेळी विरुद्ध ध्रुवावर दुःख, कष्ट, गुलामगिरी, अज्ञान , क्रूरता, मानसिक अधःपतन, यांचा संचय होय". अशीच देशातील बेरोजगारीची परिस्थिती आहे, ज्याचा गोदी मीडियामध्ये उल्लेख कधीच आढळत नाही, पण अंबानींच्या लग्नातील त्यांच्या संपत्तीचा विचित्र दिखावा रोज दिसतो. हे आश्चर्यकारक वाटू नये कारण अंबानीच्या रिलायन्सकडे नेटवर्क 18 ग्रुपच्या नियंत्रणाद्वारे सीएनएन-न्यूज18 आणि न्यूज18 इंडिया यासह अनेक वृत्तवाहिन्यांची मालकी आहे.

काही नावे घ्यायची झाल्यास, या कार्यक्रमाला भाजपचे पंतप्रधान मोदी, अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, काँग्रेस पक्षाचे सलमान खुर्शीद आणि राष्ट्रीय जनता दलाचे लालू प्रसाद यादव आदी राजकीय क्षेत्रातील नेतेही उपस्थित होते. यातून हे सर्व पक्ष कोणाची सेवा करतात हे स्पष्टपणे दिसत आहे. हे नेते संसदेत ज्या काही राजकीय कसरती करतात ते केवळ देशाच्या खऱ्या मालकांप्रती, अंबानीसहित एकंदरीत भांडवलदार वर्गाप्रती, असलेली निष्ठा लपवण्याचे नाटक आहे. अंबानींनी त्यांच्या फायद्यासाठी पक्षपातळीवर राजकीय संबंध कसे राखले आहेत हे देखील यातून दिसून येते.

ऑस्ट्रेलियन पत्रकार हमिश मॅकडोनाल्ड यांच्या 'द पॉलिस्टर प्रिन्स: द राइज ऑफ धीरूभाई अंबानी' या अनधिकृत चरित्रात धीरूभाई पुढे म्हणतात: "कक्षा बदलत राहते…. कोणीही कायमचा मित्र नसतो; कोणीही कायमचा शत्रू नाही. प्रत्येकाचा स्वतःचा स्वार्थ असतो. एकदा तुम्ही ते ओळखले की, प्रत्येकाचे चांगले होईल." धीरूभाईपासून मुकेश अंबानींपर्यंतच्या अंबानींच्या इतिहासातील काही उदाहरणे आपण पाहणार आहोत, की ज्यातून या राजकीय संबंधांमुळे त्यांना सरकारी समर्थन मिळवण्यात आणि साम्राज्य निर्माण करण्यासाठी त्यांच्या बाजूने धोरण राबवण्यात कशी मदत झाली.

## कंपनीची सुरुवातीची वर्षे

1958 मध्ये, धीरूभाईंनी त्यांच्या चुलत भावासोबत भागीदारीत सूत आणि मसाल्यांचा व्यापार सुरू केला आणि व्यवसायाचे नाव रिलायन्स कमर्शिअल कॉर्पोरेशन होते. त्यानंतर, त्यांनी अहमदाबादजवळ एक छोटी सूतगिरणी घेतली आणि कापडाचे उत्पादन सुरू केले. "लायसन्स-राज" च्या युगात, व्यावसायिकांना आवश्यक असलेल्या मंजुऱ्या मिळवण्यासाठी खूप लाळघोटेपणाची आवश्यकता होती. मुरली देवरा, जे काँग्रेस पक्षात प्रगती करत होते, या सहकारी सूत व्यापाऱ्यांच्या सहवासात धीरूभाई नवी दिल्लीला सतत भेटी देत असत. देवरा नंतर बीएमसीचे प्रमुख आणि नंतर संसदेत दक्षिण मुंबईचे प्रतिनिधी बनले होते.

धीरूभाईंच्या पहिल्या समर्थकांपैकी एक बँकर आणि राजकारणी टी. ए. पै होते, ज्यांचे कुटुंब सिंडिकेट बँकेचे प्रमुख होते आणि जे रिलायन्स टेक्सटाईल इंडस्ट्रीजचे मुख्य फायनान्सर बनले. जुलै 1969 मध्ये इंदिरा गांधींनी आणि भारतातील इतर सर्व आघाडीच्या बँका आणि विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले तेव्हा त्यांची मालमत्ता गमावल्याबद्दल पै नाखूष असले तरी के. के. पै सारखे त्यांच्या कुटुंबातील सदस्य वर्षानुवर्षे उच्च कार्यकारी पदांवर विद्यमान राहिले; तर टी.ए. पै यांना राज्यसभेचे काँग्रेस सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात आले, नंतर ते उद्योगमंत्री झाले, ज्यामुळे त्यांना औद्योगिक परवान्यांच्या वाटपात निर्णायक भूमिका मिळाली. धीरूभाईंसाठी, याचा अर्थ असा होता की आता आयात योजना आणि उत्पादन योजना मंजूर करण्यासाठी त्यांचाच संपर्क माणूस महत्त्वाच्या पदावर होता. धीरूभाईंनी 1971 मध्ये नायलॉन फॅब्रिकच्या निर्यातीविरुद्ध पॉलिस्टर फिलामेंट धाग्याची (PFY) आयात अधिकृत करण्यासाठी पै यांना राजी केले. याचा परिणाम म्हणजे हायर युनिट व्हॅल्यू स्कीम सुरू झाली, ज्यामुळे धीरूभाईंचे "भाग्य" उजळले. 1971 मध्ये ही योजना स्वीकारणे अनेकांना फारसे रुचले नव्हते. इतर निर्यातदारांनी हीच योजना वापरण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी धीरूभाईंना एक किंवा दोन वर्षांचा फायदा झाला होता. त्यामुळे टी. ए. पै यांच्याशी असलेल्या धीरूभाईंच्या नातेसंबंधामुळे ते भारतातील प्रमुख पॉलिस्टर आयातदार बनले.

आणीबाणीनंतर सत्तेवर आलेल्या जनता सरकारशी धीरूभाईंचा फारसा संबंध नसल्यामुळे, त्यांनी जनता आघाडी फोडण्याच्या इंदिरा गांधींच्या प्रयत्नामागे आपली संसाधने (रोखीच्या सुटकेस) लावली. इंदिराजींचे पुन्हा सत्तेत स्वागत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या मोठ्या पार्टीचा खर्च धीरूभाईंनी नवी दिल्लीतील अशोका हॉटेलमध्ये केला होता. नवीन इंदिरा सरकारला धीरूभाईंनी दिलेला पाठिंबा सार्थकी लागला, कारण ऑक्टोबर 1980 मध्ये रिलायन्सने बिर्लासारख्या प्रस्थापित व्यावसायिक घराण्यांपेक्षा पॉलिस्टर फिलामेंट यार्नच्या निर्मितीसाठी तीनपैकी एक परवाना मिळवला.

अनेक वर्षांच्या "परवाना-राज" नंतर – देशाच्या भांडवलदार वर्गाने, स्वतःसाठी एक संरक्षित बाजारपेठ मिळाल्याने ते बळकट झालेले होते, तेव्हा परमिट राजचे निर्बंध उठवावेत अशी मागणी केली. बदलत्या काळानुसार मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यासाठी अंबानी तयार होते. अशीच एक संधी म्हणजे शेअर बाजाराच्या माध्यमातून घराघरांतून पैसे उभे करणे. 1986 च्या अखेरीस, धीरूभाईंनी आठ वर्षांत जनतेकडून अभूतपूर्व 940 कोटी जमा केले होते. ही रिलायन्सची तथाकथित यशोगाथा कायम ठेवण्यासाठी शेअरच्या किंमतींमध्ये व्यवस्थित कुटील चढ-उतार आणि सरकारी धोरणांमध्ये पद्धतशीर फेरफार चालू राहिले, ज्यामुळे जनतेचा पैसा येत राहीला.

त्यांच्या भांडवली गरजांसाठी मंजूरी सोबतच, धीरूभाईंनी अर्थ मंत्रालयातील "ओळखी"द्वारे महसुलाच्या बाजूने सुद्धा टोल-फ्रीचा आनंद घेतला. रिलायन्सने त्यांच्या नफ्यावर कोणताही कॉर्पोरेट आयकर भरणे टाळले. ती भारतातील सर्वात प्रसिद्ध 'शून्य-कर' कंपन्यांपैकी एक बनली. 1996-97 मध्येच त्यांनी पहिला कॉर्पोरेट आयकर भरला. येथे आम्ही केवळ अंबानींना मदत केलेल्या सौद्यांचा फक्त वरवरचा भाग दर्शवला आहे. उदारीकरणानंतर, आणखी काही उल्लेखनीय उदाहरणे आहेत ज्यांची चर्चा केली जाईल.

## पॉलिस्टर पासून नैसर्गिक वायू पर्यंत

जानेवारी 1999 मध्ये, सरकारने देशातील हायड्रोकार्बन साठा प्रथमच खाजगी अन्वेषणासाठी खुला केला. नवीन अन्वेषण परवाना धोरण (एन.ई.एल.पी.) ने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सरकारी आणि खाजगी कंपन्यांना देशभरातील साइटवर ड्रिल करण्याच्या अधिकारांसाठी स्पर्धेकरिता आमंत्रित केले. एन.ई.एल.पी. राजवटीत रिलायन्ससाठी गोष्टी अधिक चांगल्या झाल्या. व्ही.के. सिब्बल आणि काँग्रेसचे मुरली देवरा (ज्यांच्यासोबत धीरूभाई त्यांच्या सुरुवातीच्या काळात दिल्लीला जायचे) यांच्या अधिपत्याखालील हायड्रोकार्बन्स महासंचालनालय आणि पेट्रोलियम मंत्रालय यांनी तीन "अपारंपरिक" निर्णय घेतले ज्यामुळे मुकेश अंबानींना कंत्राट देण्यात आले. भारताच्या तेल आणि वायू सार्वभौमत्वाचा कणा म्हणून काम करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी ओ.एन.जी.सी.च्या जीवावर हे केले गेले. ओ.एन.जी.सी. आणि रिलायन्स यांच्यातील संबंधांशी संबंधित वादाचे मुख्य केंद्र केजी डी6 हे होते, कृष्णा गोदावरी खोऱ्यातील भारतातील सर्वात जास्त चर्चित नैसर्गिक वायू ब्लॉक. साइट्सच्या नावावरही अंबानींचा प्रभाव दिसत होता: डी6 मधील प्रदेशातील इतर ब्लॉक्सच्या नावांमधील "डी" म्हणजे "धीरूभाई" होते. जेव्हा रिलायन्सने बेसिनमध्ये गॅस शोधला तेव्हा तो आतापर्यंतचा सर्वात मोठा शोध म्हणून गाजावाजा केला गेला. नंतर असे वृत्त आले की रिलायन्सने केवळ भांडवल उभारणीसाठी बाजाराची दिशाभूल करण्यासाठी दावे केले. कॅगच्या निष्कर्षानुसार कंपनीने सरकारसोबत केलेला करारही अंबानींच्या बाजूने अत्यंत झुकलेला होता. याद्वारे कंपनीने ब्लॉक विकसित करण्यासाठी केलेली भांडवली गुंतवणूक वसूल करणे शक्य झाले.

रिलायन्सवर महसुलातील मोठा वाटा मिळवण्यासाठी गुंतवणुकीच्या खर्चात वाढ करून दाखवल्याचा आरोप होता. रिलायन्सवर किंमती वाढवण्यासाठी इंधनाचा साठा केल्याचा आरोपही करण्यात आला आणि अनेक वेळा किंमती वाढल्या सुद्धा. अंबानींच्या जुन्या मित्रांपैकी एक प्रणव मुखर्जी (तेच जे नंतर राष्ट्रपती झाले) यांच्या नेतृत्वाखाली सरकारने किंमत दुप्पट करून प्रति युनिट 4.20 डॉलर करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे स्वतःचे पेट्रोलियम मंत्री, मणिशंकर अय्यर यांनी पत्रकार परंजॉय गुहा ठाकुर्ता यांनी दिलेल्या वृत्तानुसार एका बंद खोलीच्या बैठकीत सांगितले की, भारतातील प्रत्येकाला "420" म्हणजे काय हे माहित आहे, आणि रिलायन्सच्या फायद्यासाठी गॅसच्या किमतीत स्पष्ट फेरफार केल्याचा इशारा दिला. आधीच नमूद केल्याप्रमाणे मुकेश अंबानींना अधिक कंत्राटे देणाऱ्या देवरा यांना पदावर आणण्यासाठी अय्यर यांना पदावरून हटवण्यात आले. ओ.एन.जी.सी.ने रिलायन्सवर सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीच्या जवळपासच्या साइट्समधून साठा पळवल्याचा आरोपही केला. मुरली देवरा कार्यालयात असताना, ओ.एन.जी.सी.चे उत्पादन ठप्प झाले होते, जेणेकरून रिलायन्सला गॅस पळवता येईल. विशेष म्हणजे अनेक वरिष्ठ नोकरशहांनी ओ.एन.जी.सी. सोडून रिलायन्समध्ये सामील होऊन समूहाला निविदा जिंकण्यास मदत केली ज्यातून त्याने अफाट माया कमावली आहे. हे सर्व सार्वजनिकरित्या उपलब्ध आहे परंतु कॉर्पोरेट मीडियाद्वारे लपवले गेले आहे, ज्यावर रिलायन्स एकतर नियंत्रण ठेवते किवा मानहानीच्या खटल्यांची धमकी देते, आणि अशाप्रकारे त्यांचे वकील त्यांच्या क्लायंटच्या (रिलायन्सच्या) आसपास निर्माण झालेल्या उद्योजकीय प्रतिभेच्या मिथकाचे वास्तव उघड करणारे कोणतेही अहवाल दाबतात.

## जिओ फॅक्टर

'डिजिटल इंडिया' हा दोन व्यक्तिमत्त्वांनी मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये प्रचलित केलेला एक आकर्षक वाक्यांश आहे. पहिले प्रधानमंत्री मोदी आणि नंतर मुकेश अंबानी. मोदींच्या डिजिटल इंडियाच्या गाजावाजासोबत जिओचा उदय हा योगायोग नाही. स्पर्धकावर वचक ठेवण्यासाठी आणि स्पर्धाविरोधी कृती प्रतिबंधित करण्यासाठी कायदे असूनही, कंपनीने अत्यंत कमी (भक्षक) किंमती देऊन आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे हरवले हे सर्वांना माहिती आहे.

पान 10 वर

# सर्वात मोठा विनोद: बजेट 2024!

पान 1 वरून

आपली 'उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह' योजना शांतपणे सोडून दिली आहे आणि थेट 'रोजगार-लिंक्ड इन्सेंटिव्ह' पॅकेजकडे वळले आहे. बेरोजगारीची कबुली देण्यासाठी हे बजेट इतकेच "जवळ" आले आहे. रोजगार निर्मितीसाठी त्यामध्ये नमूद केलेल्या वरवरच्या दिखाऊ योजना, चिडवणाऱ्या आणि निराश करणाऱ्या, काही प्रमाणात मनोरंजक देखील आहेत:

1. मजुरीच्या घटकांवरील सबसिडी: हे सर्व मूलत: कंपन्यांना थेट उत्पन्न म्हणून जाईल आणि त्यांना वेतनावर कमी खर्च करण्यास मदत होईल! त्यामुळे सरकार आता करदात्यांच्या पैशातून कंपन्यांना पैसे देईल.

- औपचारिक क्षेत्रातील सर्व नवीन नोकरदार कामगारांना एक महिन्याचे वेतन अनुदान (₹15,000 पर्यंत).
- रोजगाराच्या पहिल्या चार महिन्यांसाठी उत्पादन क्षेत्रातील कामगारांसाठी नियोक्ता आणि कर्मचारी ई.पी.एफ.ओ. योगदानामध्ये सबसिडी.
- प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यासाठी 2 वर्षांपर्यंत ई.पी.एफ.ओ. योगदानाच्या नियोक्त्याच्या वाट्यापैकी ₹3000 पर्यंत मासिक अनुदान.

2. कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी कामगार-महिला वसतिगृहे, क्रेचेस उघडण्यासाठी उद्योगाशी सहकार्य, पण अर्थसंकल्पीय तरतूदच नाही

3. कौशल्य कार्यक्रम, कौशल्य कर्ज, शिक्षण कर्ज : ज्याचा मुळात अर्थ असा होतो की सरकार अधिक कुशल, आणि स्वस्त(!), कामगार निर्माण करण्यासाठी, मालकांचा नफा वाढवण्यासाठी, शिक्षण-प्रशिक्षण देईल.

4. आणि शेवटी: शीर्ष 500 शीर्ष कंपन्या पाच वर्षांसाठी दरवर्षी सुमारे 4000 इंटर्न नियुक्त करतात. प्रति महिना 5,000 इंटर्नशिप भत्ता आणि 6,000 ची एकवेळ मदत सरकारद्वारे प्रदान केली जाईल. सी.एस.आर. निधीतून प्रशिक्षण खर्च आणि इंटर्नशिप खर्चाच्या 10 टक्के वित्तपुरवठा करण्यास कंपन्यांना परवानगी आहे.

- अशाप्रकारे सरकार पुन्हा कंपन्यांना पैसे देईल आणि "इंटर्नशिप" ची किंमत कमी करण्यास मदत करेल आणि कराच्या पैशांसारखे सीएसआर वेतनात वळवेल!

32 कोटी बेरोजगार लोकांच्या देशासाठी, जेथे 92 टक्के कर्मचारी अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत आहेत, सरकारने हेच देऊ केले आहे: एक महिन्याचे पगार अनुदान (आपण ई.पी.एफ.ओ. मध्ये नोंदणीकृत असल्यास!), पी.एफ. सबसिडी, मोठ्या कॉर्पोरेट्समध्ये कर्ज आणि इंटर्नशिप, जे प्रभावीपणे सर्व कॉर्पोरेट्सना सबसिडी देतात!

या सरकारचा नोकऱ्या निर्माण करण्याचा कोणताही हेतू नाही हे त्यांच्या "आर्थिक नेत्यांच्या" वक्तव्यावरून स्पष्ट होते. "सरकार नोकऱ्या निर्माण करणार नाही आणि करू नये. ही खाजगी क्षेत्राची भूमिका आहे," असे स्टॅनफोर्ड आणि हार्वर्ड-शिक्षित निती आयोगाचे अर्थतज्ज्ञ म्हणतात. अलीकडील संवादात, मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. ए. नागेश्वरन यांनी स्पष्ट केले:

*"सामान्य जगात, काम देणे हे व्यावसायिक क्षेत्राचे काम आहे ... सरकार कौशल्य विकासाचे प्रयत्न करू शकते, शैक्षणिक धोरणाची पुनर्रचना करू शकते, पगाराच्या पेमेंटसाठी कॉर्पोरेट आयकर सूट देऊ शकते तसेच भविष्य निर्वाह निधी योगदानासाठी सबसिडी देऊ शकते".*

बेरोजगारीच्या संकटाला तोंड देण्यासाठी त्यांची भूमिका काय असेल असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले:

*"हे बघा, मी एवढंच करेन की प्रत्येक व्यासपीठावर आणि स्टेजवर म्हणेल की आपल्याला बेरोजगारीचा प्रश्न सोडवायचा आहे, आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यात तेच माझं योगदान आहे. कारण या गोष्टींबद्दल मी फार काही करू शकत नाही."*

परस्परसंवादात पुढे, त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की जगभरातील सरकारे बेरोजगारीचे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी आणि "कामगार बाजारात अधिक वाईट रीतीने व्यत्यय आणण्यासाठी" कल्याणकारी धोरणांद्वारे "काम करण्यासाठी प्रोत्साहन कमी" करत आहेत. या दृष्टिकोनाची एकमात्र समस्या अशी आहे की यात असे मानले आहे की खाजगी क्षेत्र उत्पादन वाढवेल आणि पुरेशी मागणी आणि वापर असेल तर नोकऱ्या निर्माण करेल, पण हे दोन्ही घटक भारतीय अर्थव्यवस्थेत विक्रमी कमी आहेत (आर्थिक वर्ष 23 मध्ये भारताची घरगुती निव्वळ आर्थिक बचत 5.3 टक्के होती, 47 वर्षातील सर्वात कमी), जे नफ्याच्या घसरत्या दराच्या वास्तविक संकटाचेच लक्षण आहे.

मग सरकारच्या "रोजगार-संबंधित प्रोत्साहनांचे" काय? त्यांचा रोजगार निर्मितीवर आणि त्यामुळे मागणी वाढण्यावर परिणाम होणार नाही का? नाही! प्रत्येक कंपनी इंटर्नसची नियुक्ती करते, दरवर्षी काही कर्मचारी भरती करते. उत्पादन वाढवण्याची गरज असल्याशिवाय (जे नफ्याचा दर कमी होत नसेल तर शक्य आहे) यापैकी कोणतीही कंपनी हजारो अतिरिक्त कर्मचारी किंवा इंटर्नसना कामावर घेण्याइतकी मूर्ख नाही आणि सरकारने त्यांना सांगितले म्हणून अतिरिक्त खर्च करणार नाही. खाजगी व्यवसाय हे "राष्ट्रीय हितासाठी" नाही,तर नफा कमावण्यासाठी चालतात. अशा परिस्थितीत, अशी सर्व प्रोत्साहने म्हणजे आधीच नियोजित भरतींना (ती भरती, जी व्यवसायांनी तशीही केलीच असत) सबसिडी देणे आणि अशा प्रकारे त्यांचा नफा वाढवणे आणि शून्य अतिरिक्त रोजगार निर्माण करणे.

## वित्तीय तूटीचा बागुलबुवा

या अर्थसंकल्पात लोकांना काहीही दिले जात नाही हे सर्वांना स्पष्ट दिसत असताना, मोठे उद्योग (फिक्की, सी.आय.आय. सारख्या संस्था) आणि भांडवली अर्थतज्ञ 'आर्थिकदृष्ट्या विवेकपूर्ण' असल्याबद्दल या अर्थसंकल्पाची प्रशंसा मुद्रित माध्यमांमध्ये तसेच वृत्तवाहिन्यांमध्ये करत आहेत. "किमान त्यांनी वित्तीय शिस्त राखली" असे अनेक बोर्ड रूम्स, गुंतवणूकदारांच्या बैठकींमध्ये बोलले जात आहे. हा "वित्तीय तूट" प्रकार म्हणजे काय हे समजून घेण्याचा प्रयत्न करूया.

एन.डी.ए.-1 सरकारपासून लागोपाठच्या भारतीय सरकारांनी स्वत:च ठरवलेल्या कामांपैकी एक म्हणजे "कल्याणकारी" खर्च कमीत कमी करणे आणि खाजगी नफेखोरीसाठी बाजार शक्य तितका खुला करणे. "किमान सरकार, जास्तीत जास्त शासन" या घोषणेचा अर्थ हाच होता. केंद्र सरकारच्या कल्याणकारी खर्चात मोदींच्या अंतर्गत दरवर्षी घट झाली आहे (कोविड वर्ष वगळता) आणि या अर्थसंकल्पानुसार, तो 0.3 टक्के ने कमी होईल असे दिसत आहे. सरकार जनतेवर कमी खर्च का करत आहे? याचे साधे कारण खालीलप्रमाणे आहे.

भांडवली राज्य कल्याणकारी निधी केवळ एका मर्यादितेच खर्च करू शकते, कारण ते भांडवलदार वर्गाच्या नफा कमावण्याच्या हिताच्या विरोधात कधीही जाऊ शकत नाहीत. पण जर व्यवहारात हे दिसत असेल की भांडवली सरकारची कल्याणकारी कृती मर्यादित प्रमाणात का होईना शिक्षण आणि आरोग्य सेवेत गुंतवून लोकांचे जीवन थोडे ठीक करू शकते, काही नोकऱ्या निर्माण करू शकते, तर मग लोक अशा सरकारी कारवाईची मागणी करू लागतील आणि प्रश्न विचार लागतील की संकटाच्या काळात सरकारने कल्याणकारी हस्तक्षेप करण्याऐवजी सरकारी मालमत्ता भांडवलदारांना कवडीमोल भावाने विकणे, खाजगीकरण करणे आणि त्यांना गुंतवणुकीसाठी प्रवृत्त करण्यासाठी भांडवलदारांना सर्व प्रकारच्या सवलती आणि बोनस देणे का चालवले आहे? आज आरोग्यसेवेतील गुंतवणुकीमुळे लोकसंख्येला खरोखरच फायदा होऊ शकतो, पण त्यामुळे शिक्षणात, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये रोजगारासाठी अशाच प्रकारच्या गुंतवणुकीची मागणी सुद्धा होऊ शकते. (2022 मध्ये दिल्लीतील अंगणवाडी सेविकांच्या संपादरम्यान, एका नोकरशहाने स्पष्ट केले की ते सरकारचे कायम कर्मचारी म्हणून मान्यता देण्याची त्यांची मागणी का मान्य करू शकले नाहीत: "अगर आपके लिए किया तो सबके लिए करना पडेगा!", म्हणजे जर आम्ही तुमच्यासाठी केले, तर आम्ही प्रत्येकासाठी ते करावे लागेल). तेव्हा भांडवलदारांसाठी जास्त योग्य मार्ग हा आहे की देश चालवण्याचा उत्तम मार्ग बाजाराची अर्थव्यवस्था आहे असा तर्क जनतेत स्थापित करणे!

त्यामुळे भांडवली सरकार स्वत:च्य निधीच्या 'असस्टेनेबिलिटी'बद्दल भीती निर्माण करून अशा कोणत्याही धोकादायक कल्पनेची उगवण अगोदरच नाकारण्याचा प्रयत्न करते. हे करण्याचा एक मार्ग म्हणजे 'वित्तीय तूटीचा बागुलबुवा' वाढवणे. विविध प्रकारच्या सरकारी कर्जासाठी वित्तीय तूट हा दुसरा शब्द आहे. सरकारी कर्ज म्हणजे सरकारचा खर्च आणि सर्व स्त्रोतांकडून मिळणारा महसूल यातील फरक. क्रेडिट रेटिंग एजन्सी, गुंतवणूकदार आणि बुर्जुआ अर्थशास्त्रज्ञ कल्याणकारी खर्चासाठी सरकारी कर्ज घेण्यास परावृत्त करतात, असा दावा करतात की उच्च वित्तीय तूट सरकारकडून कर्जाचे हप्ते थकवले जाण्याचा धोका वाढवते, कारण ती सरकारच्या फेडू शकण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त कर्जाला दर्शवते.

भारत सरकारने वित्तीय तूट जी.डी.पी. च्या 3 टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट ॲक्ट, 2003) आहे. या अर्थसंकल्पात, सरकारने तूट जी.डी.पी. च्या 4.9 टक्के पर्यंत कमी करण्यासाठी आश्वासन दिले आहे. ही तूट गेल्या आर्थिक वर्षात साध्य केलेल्या जी.डी.पी. च्या 5.6 टक्के पेक्षाही खाली आहे. अर्थशास्त्रज्ञ रथिन रॉय यांनी नमूद केले आहे की सरकारी कर्जातील ही 0.7 टक्के कपात मध्यम आणि कामगार वर्गावरील कर वाढवून (जीडीपीच्या 0.4 टक्के ) आणि सरकारी खर्चात (जी.डी.पी.च्या 0.3 टक्के ) कपात करून भरपाई केली गेली आहे. पगारदार वर्गावरील थेट कर वाढविण्यात आला आहे, तर परदेशी कंपन्यांवरील कॉर्पोरेट कर 40 टक्के वरून 35 टक्के पर्यंत कमी करण्यात आला आहे आणि एंजेल कर (गुंतवणूक कंपन्यांनी स्टार्टअप्स मध्ये त्यांच्या बाजारमूल्यापेक्षा जास्त केलेल्या गुंतवणुकीवरील कर) रद्द केला आहे. गेल्या वर्षीप्रमाणे, सकल कर महसुलातील आयकराचा वाटा (30.2 टक्के ) कॉर्पोरेट कराच्या वाट्यापेक्षा (29.7 टक्के ) जास्त असेल. भांडवलदार वर्गाचे खिसे भरण्यासाठी सरकार कामकरी जनतेच्या खिशावर डल्ला मारत आहे आणि 'वित्तीय तुटीचा बागुलबुवा' निर्माण करत आहे.

वाढत्या वित्तीय तुटीमुळे सरकार आपली कर्जे चुकवू शकणार नाही या भीतीला काही जागा नाही. आय.एम.एफ. चा अंदाज दर्शवितो की भारताचे कर्ज/जी.डी.पी. गुणोत्तर आणि व्याज-परतावा/जी.डी.पी. गुणोत्तर कमी होत आहे आणि पुढील काही वर्षांमध्ये असेच राहील. असाही दावा आहे की वित्तीय तूट वाढल्याने "अतिरिक्त मागणी" वाढते ज्यामुळे चालू खात्यातील तूट वाढते (परकीय चलनाची कमतरता), जी देखील बोगस आहे. अगदी थोडक्यात, औद्योगिक मंदीच्या काळात "अतिरिक्त मागणी" बद्दल बोलणे मूर्खपणाचे आहे आणि चालू खात्यातील तूट वाढवण्याचा आक्रोश करणारा हाच भांडवलदार वर्ग जेव्हा सरकार अनुत्पादक आयातीवर (जसे की सोन्याची आयात) निर्बंध लावण्याचा प्रयत्न करते किंवा सीमा शुल्क वा प्रत्यक्ष कर वाढवते (जे खर्च कमी न करता वित्तीय तूट कमी करेल), तेव्हा ओरडा करतो.

## उर्वरित बजेट

सारांश, हा अर्थसंकल्प, गेल्या दहा वर्षांतील अगोदरच्या बजेटप्रमाणे, भारतीय जनतेला काहीही देत नाही. मनरेगा, महिला आणि बालविकास, युवा घडामोडी आणि क्रीडा, शालेय शिक्षण तसेच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (ज्यामुळे सुमारे 46 टक्के रोजगार प्रभावित होतो) यांच्याकरताच्या तरतुदीत अर्थसंकल्पात (महागाईचा हिशेब केल्यानंतर) खऱ्या अर्थाने घट झाली आहे. उच्च शिक्षणाचे बजेट सुमारे 57,000 कोटींवरून 47,000 कोटींवर 17 टक्क्यांनी कमी झाले आहे! सरकारने खरे तर सध्याच्या शाळा-महाविद्यालयांच्या

पान 2 वर

# वाढते बलात्कार आणि त्यावरील समाजातील अयोग्य प्रतिक्रियांवर प्रकाश

पान 15 वरून

समाजाची वर्गांमध्ये विभागणी आणि स्त्रियांच्या गुलामगिरीने झाली, परंतु भांडवलशाहीच्या विकासाबरोबरच देहविक्रय हा अधिक व्यापक आणि संघटित स्वरूपात अस्तित्वात आला. भांडवली व्यवस्था स्त्रियांची स्वस्त श्रमशक्ती व देहविक्री यातून अमाप नफा कमावते. आणि म्हणूनच ती याला "व्यवसाय" म्हणते, आणि तथाकथित दिखाऊ सन्मान देऊ पाहते. जर हा "व्यवसाय" आहे, आणि इतकाच सन्माननीय आहे (इतका की माजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पत्नींनी सुद्धा त्याचे समर्थन केले!) तर कॉलेजमध्ये याचे डिग्री कोर्सेस चालवून त्यात प्रवेश घ्यायला जातील का ही "उच्चभ्रू" मंडळी? या शोषणात गुंतलेल्या सर्व महिलांची मुक्ती तेव्हाच शक्य आहे जेव्हा बाजाराच्या, देवाणघेवाणीच्या, माल खरेदी-विक्रीच्या भांडवली व्यवस्थेला नष्ट केले जाईल.

### महिलांसाठी न्यायाची खोटी आशा : बलात्काराच्या प्रकरणांमध्ये कायदा आणि अंमलबजावणी

भारतात सगळ्या गुन्ह्यांसाठी कायदे केले गेले आहेत. महिलांना घरगुती हिंसेपासून संरक्षण कायदा - 2005, बालकांच्या लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा - 2012 (POCSO), भारतीय दंड संहिता (IPC) अंतर्गत लैंगिक अत्याचाराचे कायदे - धारा 375: लैंगिक अत्याचाराची परिभाषा, धारा 354: स्त्रीच्या शीलाचे उल्लंघन, धारा 354B: स्त्रीला उघड करण्याचा प्रयत्न आणि इतर. इतके सगळे कायदे असून त्याची अंबलबजावणी कशा पद्धतीने होते हा मोठ्ठा प्रश्न आहे. वर्षानुवर्ष संघर्ष करून सुद्धा "न्याय" मिळत नाही.

2002 मध्ये गुजरात दंगलीदरम्यान बिल्कीस बानो वर झालेला बलात्कार आणि तिच्या कुटुंबातील 7 लोकांची हत्या कधी न विसरता येण्या इतकं क्रूर आणि अमानवीय आहे. बिल्कीस बानो वर सामूहिक बलात्कार करण्यात आला, 11 बलात्काऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती परंतु मोदी सरकारच्या कृपेने 2022 मध्ये त्यांना सोडलं गेलं, नुसतं तेवढं नव्हे, हार-फुलांनी त्यांचा सत्कार केला गेला. वर्षानुवर्ष चालू असलेली ही लढाई अजून संपुष्टात आलेली नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यात या सरकारचं महिला विरोधी चरित्र समोर येतं. भाजपचा आमदार ब्रिजभुषण सिंह वर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल असून तो आज मोकाट फिरतोय. उन्नाव मधील भाजपचा एम.एल.ए कुलदीप सिंह सेंगरने एका मुलीवर बलात्कार केला. या सरकारमधील अनेक नेत्यांवर महीलाविरोधी अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत मग या सरकार कडून तरी काय अपेक्षा केली जाऊ शकते? आणि सरकारच असे असेल, तर जनतेने काय न्यायाची अपेक्षा ठेवायची?

अनेकांनी आपले म्हणणे मांडत सांगितले आहे की शिवकालीन शिक्षा दिली पाहिजे :

*"छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायालयातील सजा चवरंग करा आणि भर चवकाता लोकांच्या स्वाधीन करा म्हणजे कळेल लोकांना बलात्कार करणे म्हणजे काय सजा मिळते ते"*

*"चौकात गोळ्या झाडल्या पाहिजे त्या वेळी हे बंद होईल"*

*"यांना शिवकालीन शिक्षा द्या. म्हणजे असले प्रकार पुन्हा होणार नाहीत. हात पाय तोडून टाका"*

अशा विचारामागे मध्ययुगीन सामंती मानसिकता काम करते. खूप कडक शिक्षा दिली तर गुन्हे होणार नाहीत असे वाटते. 17व्या शतकात, सिख समुदाय आणि मुघल साम्राज्य यांच्यातील संघर्षांमध्ये बलात्कार आणि इतर हिंसाचाराच्या घटना घडल्या. मुघल साम्राज्याशी मराठा साम्राज्याच्या संघर्षातही बलात्कार आणि लैंगिक हिंसाचाराच्या घटना घडल्या, विशेषतः किल्ल्यांच्या गनिमी काव्याच्या वेळी. 1739 मध्ये नदीर शाहच्या दिल्लीवरील आक्रमणात लूटमार आणि बलात्कार यांचा समावेश होता. मध्ययुगात महिलांवर होणारे अत्याचार कधी थांबले नाहीत आणि आजही ते जगात कुठेही थांबले नाहीत. गुन्हेगारांना शिक्षा झाल्याच पाहिजेत, परंतु बलात्कारासाठी मृत्युदंडाची शिक्षा दिल्यामुळे उलट बलात्कारानंतर खून केला जाण्याची शक्यताच बळावते.

अनेकांनी कायद्याची प्रक्रिया, दोन्ही बाजूंना म्हणणं मांडण्याची संधी, गुन्हा सिद्ध होणं हा सगळा फाफटपसारा नकोसा वाटतो आणि गोळ्या घालणे, हात पाय तोडून टाकणे, लोकांच्या हातून चिरडणे हे जास्त योग्य वाटतं. लोकशाही मूल्य-मान्यता न रुजल्यामुळे तडकाफडकी न्यायाची कल्पना अस्तित्वात येते. इतिहासाचं गौरवीकरण करून वर्तमानातील राजकीय प्रगतीला नाकारण्याचं काम केलं जातं. कायद्याची प्रक्रिया पाळली जाणे, कायद्यासमोर समानता, बचावाची संधी, ह्या त्याच बाबी आहेत ज्या महिलांना सुद्धा याच समाजात स्वतःच्या हक्क अधिकारांसाठी लढण्याची संधी देतात. तेव्हा तडकाफडकी शिक्षेच्या मागणीचे अजिबात समर्थन होऊ शकत नाही.

### स्त्रियांवरील अत्याचार थांबलेच पाहिजेत!

बलात्कार, ॲसिड अटॅक, घरगुती हिंसा, "एक तर्फी प्रेमातून" होणारी हिंसा, आर्थिक-मानसिक- शारीरिक- लैंगिक शोषण, स्त्रियांच्या शरीराचे होणारे वस्तुकरण, "सौंदर्याच्या" बाजारू कल्पना, वैवाहिक बंधन, मर्यादित स्वातंत्र्य, बेरोजगारी अशा अनेक प्रसंगांना आयुष्यभर स्त्रियांना सामोरे जावे लागते. समाजामध्ये लैंगिक विकृतीसाठी रान मोकळं करून देण्यात भांडवलशाही जबाबदार आहे. स्त्री-पुरुष देहांचा बाजार करून लैंगिक विकृती निर्माण केली जाते ज्या मध्ये अश्लील सिनेमे, गाणी, जाहिराती, व्हिडिओ, फोटो समोर येतात. काही गाण्यांची उदाहरणे-

*तू "चीज़" बडी है मस्त मस्त!*

*तू हां कर, या ना कर(!), तू हैं मेरी किरन*

*सेहरा सजाके रखना, डोली सजाके रखना,*
*"लेने" तुझे ओ गोरी आयेंगे तेरे सजना*

*कभी कभी मेरे दिल में ख़्याल आता है, ये बदन ये निगाहें मेरी "अमानत" है!*

*तुझे "डायमंड जैसे" संभालके रखना*

अशा अनेक गाण्यांमध्ये स्त्रियांना वस्तू म्हणून प्रस्तुत केलं आहे. स्त्रीचा देह पुरुषाची "अमानत" आहे, पुरुषाची संपत्ती आहे आणि म्हणूनच पुरुष स्त्रीवर अधिकार गाजवू शकतो, तिच्या इच्छेचे काहीच स्थान नाही. आज भांडवलशाहीची हीच शिकवण आहे. माणसाच्या सर्वात निसर्ग सुलभ भावनांना अक्राळ-विक्राळ, आक्रमक, बीभत्स रूप दिले जाते. सर्व मानवी नाती बाजारू आणि लेन-देनची नाती बनून जातात.

स्त्री विरोधी "मानसिकता" मनातून येत नसते तर ती भौतिक वास्तवातून निर्माण होते. समाजात रूढ असलेली शोषणकारी सामाजिक-आर्थिक रचना याला कारणीभूत आहे. ही शोषणकारी रचना आधीपासूनच अस्तित्वात मुळीच नव्हती. मानवी समाजाच्या इतिहासात स्त्री-पुरुष समानता असलेला आदिम साम्यवादी समाज अस्तित्वात होता. स्त्रीच्या दुय्यमत्व असलेल्या समाजाकडे वाटचाल तेव्हाच झाली जेव्हा अगोदर अतिरिक्त उत्पादन, त्यातून खाजगी संपत्ती व त्यावर आधारित वर्गविभाजित समाज उदयाला आला आणि त्यासोबतच खाजगी संपत्तीच्या वंशपरंपरेने हस्तांतरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी लग्न, कुटुंब व पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था जन्माला घातली गेली. खासगी संपत्तीशी स्त्रीचं दुय्यमत्व जोडलं गेलं आहे. भांडवलशाहीमध्ये खाजगी संपत्तीचे महत्त्व पाहता तिला खाजगी संपत्तीचा वारसा टिकवणाऱ्या दमनकारी कुटूंब व्यवस्थेची तर विशेष गरज आहे. रोजगार, शिक्षणाचे ते अधिकार नाकारून जे स्त्रिला व प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य देऊ शकतात, भांडवलशाही सतत ती भौतिक परिस्थिती तयार करत राहते जी स्त्रियांना असुरक्षित, असहाय्य करत असते. म्हणूनच भांडवलशाहीमध्ये स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाला आणि त्यातून जन्माला येणाऱ्या पितृसत्तावादी वर्चस्ववादी विचाराला, आणि त्याच्याच परिणामी होणाऱ्या बलात्कारांना अंत नाही.

आज स्त्री विरोधी अत्याचाराच्या मुळाशी भांडवली पितृसत्ता काम करते. काही मर्यादित अधिकारांसाठी भांडवलशाही अंतर्गत लढा उभा केला जाऊ शकतो पण स्त्रियांना या अन्याय-अत्याचारापासून, दुयमत्वापासून, अर्धवट स्वातंत्र्यापासून तो पर्यंत मुक्ती मिळणार नाही जो पर्यंत या भांडवली व्यवस्थेला मुळापासून उखडून फेकून स्त्री विरोधी मानसिकता निर्माण करणाऱ्या भौतिक परिस्थिती बदलून एका अशा समाजाकडे वाटचाल करत नाही, जिथे खासगी संपत्ती संपुष्टाकडे जाईल आणि कुठल्याही प्रकारच्या शोषणाला, बर्बरतेला वाव नसेल!

# महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम 2024

पान 16 वरून

घालणे नाही तर राजकीय कार्यकर्ते, विरोधक यांची दडपशाही हेच आहे हे आपल्याला मागील 10 वर्षात अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होते. पीपुल्स यूनियन फॉर सिविल लिबर्टीज या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार यू.ए.पी.ए. कायद्याअंतर्गत 2015 ते 2020 मध्ये अटक करण्यात आलेल्या व्यक्तींवरील आरोप सिद्ध होण्याचा दर 3 टक्क्यांपेक्षाही कमी होता. या वरून स्पष्ट होते की आरोप सिद्ध होण्याचा दर एवढा कमी असताना सुद्धा अनेक राजकीय कार्यकर्त्यांना अनेक वर्ष सरकार जेल मध्ये या कायद्यामुळे ठेऊ शकते. बहुसंख्य प्रकरणामध्ये जामीन मिळायला सर्वोच्च न्यायालयपर्यंत जावे लागते आणि हे अत्यंत खर्चीक काम असते. या कायद्यांतर्गत जेल मध्ये असलेल्या कामगार-कष्टकरी घरातून येणाऱ्या व्यक्ती साठी ही प्रक्रियाच शिक्षा बनून जाते. या प्रक्रियेतून स्व:तला निर्दोष सिद्ध करण्यात ते असमर्थ ठरतात आणि वर्षानुवर्षे तुरुंगात डांबले जातात. यु.ए.पी.ए. कायदा अटक करणे, तपास करणे, जामीन मिळू न देणे, गुन्हा दाखल न करता तुरुंगात ठेवणे, इत्यादी बाबींमध्ये तपास यंत्रणांना अमर्याद अधिकार देतो तर आरोपी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीला नाममात्र अधिकार देतो. नियमित गुन्हेगारी प्रकरणांमध्ये आरोपीला जामीन मिळणे हा एक नियम मानल्या जातो. परंतु यू.ए.पी.ए. अंतर्गत अटक झाल्यानंतर मात्र जामीन मिळण्यासाठी वर्षानुवर्षे वाट बघावी लागते. यातील बहुसंख्य खटल्यांमध्ये अनेक वर्षे तुरुंगात राहिल्या नंतर निर्दोष सुटका झालेल्यांचे प्रमाण मोठे आहे. आनंद तेलतुंबडें यांना अडीच वर्षापेक्षा जास्त काळ तुरुंगात ठेवले गेले. शेवटी मुंबई उच्च न्यायालयाकडून त्यांना जामीन मिळाला. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून तर यासारख्या कायद्या अंतर्गत अटक होणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यू.ए.पी.ए. सारखे कायदे कुठल्याही प्रकारचा विरोधाचा स्वर दाबून टाकण्याचे मोदी सरकारचे हत्यार बनले आहेत. खोट्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या व्यक्तीचे पूर्ण आयुष्य स्वत:ला निर्दोष सिद्ध करण्यात उध्वस्त होते. भीमा कोरेगाव प्रकरणात अटक असलेल्या स्टॅन स्वामी यांचा स्वतःला निर्दोष सिद्ध करण्यातच आणि योग्य त्या आरोग्य सुविधा न मिळाल्यामुळे जेलमध्ये दुर्दैवी मृत्यू झाला. आता प्रस्तावित कायद्याद्वारे यु.ए.पी.ए. पेक्षाही अधिक लोकशाही-विरोधी कायदा महाराष्ट्र सरकार बनवू पहात आहे.

प्रश्न आहे की यु.ए.पी.ए., मकोका, राज्यद्रोहाचे कलम सारखी जनविरोधी हत्यारे सरकारांकडे अगोदरच असताना अजून एक नवीन कायदा का? सरकारला इतके दमनकारी अधिकार स्वत:कडे का हवे आहेत? याचे उत्तर सोपे आहे. जनतेची दैन्यावस्था करणाऱ्या, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, धर्मवादाचा कळस करणाऱ्या या सरकारला जनतेच्या असंतोषाची प्रचंड भिती आहे आणि म्हणूनच सर्व लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवत अशा पाशवी अधिकारांची त्यांना गरज भासत आहे.

'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम 2024' हे यू.ए.पी.ए. सारख्या जनविरोधी कायद्याचेच पुढचे पाऊल आहे आणि सरकार विरोधातील सर्व आवाजाला "शहरी नक्षलवाद" घोषित करून त्यांचे दमन करणारे असेल. सर्व न्यायप्रिय नागरिकांनी या कायद्याचा विरोध करून सरकारने हा कायदा अमलात आणू नये यासाठी सरकारवर दबाव बनवणे गरजेचे आहे. या कायदा लागू करून भांडवली लोकशाहीने दिलेले जे थोडे बहुत अभिव्यक्ती स्वतंत्र उरले आहे तेही महाराष्ट्र सरकार संपवू पाहत आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारची संसदेतील ताकद काही प्रमाणात कमी झाली असली तरी येणारे 5 वर्ष जनविरोधी फासीवादी धोरणे राबवण्यात ते कुठलीही कसर बाकी सोडणार नाही. फासीवादी मोदी सरकार आणि राज्यात महायुतीच्या सरकारला कामगार-कष्टकरी वर्गाची एकजुटताच अशी जनविरोधी कायदे अमलात येण्यापासून रोखू शकते.

# वाढते बलात्कार आणि त्यावरील समाजातील अयोग्य प्रतिक्रियांवर प्रकाश

✎ स्वप्रजा

पुण्यात 13 जून रोजी बलात्काराच्या 5 घटना समोर आल्या. ज्या देशात दिवसाला सरासरी 100 बलात्कार होतात म्हणजेच दर 6 मिनिटाला एक बलात्कार, तिथे एकाच दिवशी 5 बलात्काराच्या घटना समोर येणे काही आश्चर्यजनक नाही. पहिल्या घटनेत कोल्हापूरच्या एका 34 वर्षीय महिलेवर लग्नाचं आमिष दाखवून बलात्कार केल्याचा प्रकार घडला. दुसऱ्या घटनेत 22 वर्षीय तरुणीला लग्नाचं आमिष दाखवून जीवे मारण्याची धमकी देत बलात्कार केला आहे. तिसऱ्या घटनेत विवाहित महिलेच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी देत महिलेवर बलात्कार झाला आहे. चौथ्या घटनेत अल्पवयीन मुलीशी इंस्टाग्रामवर ओळख वाढवून तिच्याशी मैत्री करुन तिला नातेवाईकाच्या घरी नेऊन तिच्यावर बलात्कार केला आहे. पाचव्या घटनेत अल्पवयीन मुलीचं अपहरण करुन तिला गोव्याला नेऊन तिच्यावर बलात्कार केला आहे. ही बातमी सोशल मीडियावर प्रसारित होताच प्रतिक्रियांमध्ये नागरिकांच्या मतांचा पूर आला. या प्रतिक्रियांपैकी अनेक प्रतिक्रिया ना फक्त सपशेल चुकीच्या आहेत, तर वास्तवात त्याच मानसिकतेचे द्योतक आहेत ज्या मानसिकतेतून बलात्कार होतात. जो पर्यंत प्रश्नाच्या मुळाशी आपण जात नाही, प्रश्नाबद्दलच्या चुकीच्या धारणाना खोडत नाही, तोपर्यंत त्याचं खरं कारण समजण्यात आपण अपयशी ठरु आणि त्याच्याशी लढणंही शक्य होणार नाही. तेव्हा, बलात्काराबद्दल सर्वप्रथम समाजामध्ये रूढ असलेल्या त्या चुकीच्या विचारांचा आढावा घेऊयात, जे विचार स्वत: त्याच पितृसत्ताक मानसिकतेचे प्रतिनिधी आहेत, जे बलात्काराला संस्थागत मान्यता देतात.

## बलात्कारानंतर पीडितांना दोषी ठरवणे: समाजातील गैरसमज आणि वास्तविकता

महिलांवर अन्याय-अत्याचार झाला असता, तो का झाला असावा यावर सगळेच आपलं मत मांडतात. तसेच काही "जागरूक" नागरिकांनी आपलं मत कमेंट स्वरूपात मांडलं :

*"मुली खूप माजल्या आहेत मग बलात्कार नाही होणार तर काय तुमचा सत्कार होईल का... नालायक मुली आज पाहिले तर मुलींची फॅशन 75% अंग प्रदर्शन करसाल तर होणारच आहे..."*

*"जोपर्यंत मुली आंग भरुन कपडे घालणार नाहीत तोपर्यंत बलात्कार हे होतच राहणार"*

आता यांच्या मते या "माजलेल्या" मुली ज्यांनी अंगभर कपडे नाही घातले, "अंग प्रदर्शन" केलं म्हणून त्यांच्यावर बलात्कार झाला आणि होणारच, अशा मुलींसोबत अजून होणार तरी काय? याच्या मते त्यात बलात्कार करणाऱ्या व्यक्तीचा तरी काय दोष? 2 महिन्याच्या लहान मुलीवर लुधियाना मध्ये बलात्कार झाला, दिल्ली मध्ये 3 वर्षाच्या मुलीवर सामूहिक बलात्कार झाला, आंध्र प्रदेशात 6 महिन्याच्या मुलीवर बलात्कार झाला आणि 38,000 पेक्षा जास्त बलात्कार लहान मुलांवर झाल्याच्या नोंदी आहेत, ते सुद्धा त्यांनी "अंग प्रदर्शन" केल्यामुळे झाले असावेत? एवढंच नव्हे, नुकत्याच जन्मलेल्या लहान बाळावर सुद्धा बलात्कार झाल्याच्या नोंदी आहेत मग त्यात सुद्धा त्या बाळाचा दोष असावा, कारण नुकत्याच जन्मलेल्या बाळाला किमान आपलं अंग झाकण्या इतकी "अक्कल" असावी की नाही?

अगदी लहान वयापासूनच मुलींना "संस्कार" देण्याची प्रथा या पुरुषप्रधान समाजात चालत आली आहे. तिने कसे कपडे घालावे, 7 च्या आत घरी यावं, चारचौघात कसे बोलावे, कसे वागावे, कसे बसावे, कसे हसावे इथपर्यंत सगळ्या गोष्टी मुलींना सांगितल्या जातात आणि या समाजाने तयार केलेल्या साच्याप्रमाणे जर मुलगी वागली नाही तर तिच्यावर "संस्कार" केले गेले नाहीत, पोरगी "हाताबाहेर" गेली आहे, "वाया" गेलेली पोरगी, "माजलेली" पोरगी अशी विशेषणे लागतात. खरतर अंग झाकलेली स्त्री असो किंवा बुरखा घातलेली, कुठलीही स्त्री सुरक्षित नाही. आज स्त्रिया कुठेही गेल्या तरीही त्या सुरक्षित नाही, कामाच्या ठिकाणी अत्याचार, मंदिरात अत्याचार, रस्त्यावर चालताना अत्याचार, ट्रेन मध्ये बसल्यावर अत्याचार, बस मध्ये अत्याचार! कुठलीही जागा आज स्त्रियांसाठी सुरक्षित नाही. स्त्रियांना सांगितलं जातं "घरी बसा". पण घर तर मुळीच सुरक्षित नाही. घरगुती हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रिया घरी सुद्धा नवऱ्याचा मार, लाथ्या-काठ्या सहन करतात. 2023 मध्ये 28,000 स्त्री विरोधी अत्याचाराच्या नोंदीपैकी 6,500 पेक्षा जास्त गुन्हे हे घरगुती हिंसाचाराचे नोंदवले गेले. हे तर नोंदवलेले गुन्हे आहेत, कित्येक महिला निमूटपणे त्यांच्यावर होणारे शारीरिक, मानसिक, लैंगिक हिंसाचार सहन करतात आणि गुन्हे नोंदवले जात नाहीत.

बलात्कार करणारे पुरुष दोषी नाहीत, कारण अत्याचार करण्याचा त्यांच्याकडे परवानाच आहे, दोष आहे तो स्त्रीचा की ती त्यांच्या निशाण्यावर का आली! गुन्ह्याचा दोष पीडिताच्या माथी मारणे, हे अन्यायकारी व्यवस्थेचे एक मोठे वैचारिक हत्यार असते. थोडक्यात हे विचार बलात्काराचे आणि बलात्काऱ्याचे समर्थनच करतात !

## बलात्काराचा दोष प्रेम करणाऱ्याच्या माथी मारणारेही कमी नाहीत. या कमेंट्स पहा.

*"हे सगळे गुन्हे खोटे आहेत पोरी पोरांना फसवत आहेत"*

*"...या पाचही घटना फक्त आणि फक्त प्रेम प्रकरणात झालेल्या आहेत. त्यामुळे बलात्कार होत आहेत... एक सामान्य माणूस म्हणून नागरिक म्हणून समाजात जे गढूळ वातावरण झालं आहे मुलींच्या आणि मुलांच्या बाबतीत त्याच परिवर्तन करणे आपले काम आहे.. शासन आणि पोलीस याना दोष देऊन काहीच होणार नाही.... जेव्हा कुठं तरी पोलिसांना एखादं जोडपं किंवा अविवाहित मुलं-मुली दिसतात तेव्हा आम्ही सहमतीने सोबत आहोत असं म्हणणारे मुलं-मुलीच अश्या प्रकरणाला बळी पडतात..."*

थोडक्यात मुलींनी स्वतंत्रपणे आपल्या जीवनाचे निर्णय घेतले, जोडीदार निवडू पाहिले तर त्यांच्या माथी बलात्कारच येणार! स्त्रीकडे एक स्वतंत्र, सक्षम, जबाबदार व्यक्ती म्हणून पाहू न शकणाऱ्या, स्त्री-पुरुष नात्याला फक्त लैंगिक संबंधांच्याच रूपात समजू शकणाऱ्या, लग्नानंतर नवऱ्याने केलेल्या बलात्काराला सुद्धा मान्यता देणाऱ्या पितृसत्ताक मानसिकतेला हेच समजते की सर्वच प्रेम प्रकरणे बलात्कारात संपतात ! हे खरे आहे की काही प्रेम प्रकरणांमध्ये बलात्कार होतात, परंतु यामागे सुद्धा स्त्रीच्या इच्छेचे अस्तित्व न मानणारी पितृसत्ताक मानसिकताच काम करत असते! बलात्काराचे निमित्त करुन स्त्रीला प्रेम करण्याचा अधिकार नाकारणे, तिला तिच्या निवडीचा अधिकार नाकारणे हा सुद्धा समाजाने तिच्या अस्तित्वावर केलेला बलप्रयोगच आहे!

अनेकांनी आपल्या कमेंट मध्ये मुलींना कसं "स्वावलंबी" बनवलं पाहिजे यावर आपलं मत मांडलं :

*"मुलांना सोबत चटणी पूड आणि धारधार शस्त्र सोबत ठेवत जा.. अस काही झालं की मारायला कमी करू नका पुढचं पुढे पाहून घेऊ... ह्या न्यायव्यवस्था च्या भरवश्यावर बसून राहील तर आयुष्यभर न्याय भेटणार नाही..."*

*"सर्व मुलींना आपल्या वडिलांनी मोबाइल न देता आत्मरक्षणाचे क्लास लावावे. म्हणजे कराटेचे प्रशिक्षण देण्यात यावे. आणि तिला हातात मोबाइल ऐवजी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी एक हत्यार द्यावे. म्हणजे ही वेळ येणार नाही"*

तर या नागरिकांच्या मते एकदा का मुलीच्या हाताततील मोबाईल जप्त केला आणि त्यांच्या हातात मिरचीची पूड, दंडुका, धारदार शस्त्र किंवा इतर हत्यारे दिले तर बलात्काराच्या घटना होणार नाहीत. दिवसाढवळ्या स्त्रियांवर चाकू भोसकून वार होतात, कोयत्याने हल्ले होतात, दगडाने ठेचून हत्या होते अश्या अनेक घटना आपल्या समोर आल्या आहेत. कुस्तीपटू, जे स्वतः इतके बलाढ्य आहेत, जे समोरच्या माणसाला दोन लगावून देऊ शकतात त्यांचे लैंगिक शोषण झाल्याची बातमी सर्वांनाच माहित आहे. नक्कीच स्वरक्षण करणे प्रत्येकाने शिकले पाहिजे आणि स्त्रियांनी तर नक्कीच शिकले पाहिजे, यात दुमत नाही. त्याकरिता क्रांतिकारी दुर्गावती देवी ब्रिगेडही स्थापन केल्या पाहिजेत. परंतु फक्त स्त्रियांच्या हातात धारदार शास्त्र देऊन काय हे हल्ले थांबणार आहेत? असं केल्याने मूळातून बदल शक्य नाही, कारण यामुळे फक्त थोडी दहशत निर्माण होईल, पितृसत्ताक विचारांचा पाया खचणार नाही. कठोर शिक्षा केल्याने गुन्हे होणे कधीच थांबलेले नाही. सर्वात जास्त बलात्कार तर वैवाहिक बलात्कार आहेत, तिथेही स्त्रीच्या हातात शस्त्र देण्याचे समर्थन ही मंडळी करणार आहेत का?

## "शिकून-सवरून" अन्याय अत्याचार थांबतात हा केवळ एक भ्रम

"शिक्षणाचे माहेर घर" म्हणवणाऱ्या पुण्यासारख्या शहरात अशा अमानवीय घटना घडू शकतात हे ऐकून अनेकांची तारांबळ उडाली. काही दिवसांपूर्वी अतिशय क्रूर आणि अमानवीय घटना समोर आली. पत्नीवर संशय असल्यामुळे, तिच्या गुप्तांगाला कुलूप लावलं, चावी हरवल्यामुळे हा घृणास्पद प्रकार समोर आला. ही घटना सुद्धा पुण्यात घडली. अनेकांनी कॉमेंट्स मध्ये पुण्याविषयी विशेष "काळजी" व्यक्त केली:

*"शिक्षणाचे माहेरघर अशी पुण्याची ओळख पुसली"*

*"पुण्याच झालं आहे बिहार"*

*"पुण्यासारख्या शहरात असं होतंय हे आपल्यासाठी खूप दुर्दैवाची गोष्ट आहे"*

खरं तर शिक्षणाचा आणि महिला विरोधी नसण्याचा काही संबंध नाही. अनेकांचा असा भ्रम आहे की सगळे लोकं शिकले-सवरले की हे जग बदलेल, लोकांची "मानसिकता" बदलेल, अन्याय अत्याचार थांबतील. पुण्या "सारख्या" शहरात सतत होणाऱ्या घटनाच वेगळे सिद्ध करतात. तथाकथित शिकलेल्या कुटुंबांमध्ये घरगुती हिंसाचाराच्या घटना समोर येतात. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण - 5 (NFHS-5), 2019-2021 नुसार, 18 ते 49 वर्षे वयोगटातील 29.3 टक्के विवाहित महिला घरगुती/लैंगिक हिंसाचाराच्या बळी आहेत, 18 ते 49 वयोगटातील 3.1 टक्के गर्भवती महिलांनी त्यांच्या गर्भधारणेदरम्यान शारीरिक हिंसाचार सहन केला आहे. या समोर आलेल्या घटना आहेत, अशा अनेक घटना आहेत ज्या नोंदवल्या गेल्या नाही आणि महिला निमूटपणे शारीरिक आणि लैंगिक शोषण सहन करतात. कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण करणारा भाजपचा खासदार ब्रिजभूषण सिंह हा उच्चशिक्षित आहे. श्रद्धा वालकरच्या मृतदेहाचे तुकडे करून त्याची विल्हेवाट लावणारा आफताब पूनावाला मुंबईच्या एल.एस रहेजा कॉलेज मधून शिकलेला, पेशाने ग्राफिक डिझाईनर आहे. कित्येक उदाहरणे आहेत समाजामध्ये जी दाखवून देतात की नुसतं "शिकून-सवरून" अन्याय-अत्याचार थांबतात हा केवळ एक भ्रम आहे.

## बुधवार पेठेत देहविक्रय : नफ्याच्या बाजारपेठेत मानवी शोषण

नफ्यावर आधारलेल्या भांडवली व्यवस्थेत सगळ्या गोष्टी विकाऊ "माल" बनून राहिल्या आहेत. स्त्रीदेहाला सुद्धा उपभोगाची वस्तू म्हणून बघितलं जातं आणि त्यामुळे पैसे फेकून आपल्या लैंगिक स्वार्थासाठी स्त्रिया केव्हाही उपलब्ध असाव्यात यात काही वावगं वाटत नाही. अनेकांना वाटतं की बलात्कार करण्यापेक्षा पैसे देऊन आपली "गरज" भागवता आली पाहिजे. अनेकांनी केलेल्या कॉमेंट्स मधून ते दिसून येतं.

*"बुधवार पेठ सर्व्हिस चांगली नाही देत वाटतं"*

*"बुधवार पेठेत बहुतेक चांगले मॉडेल राहिले नाहीत माझी सरकारला विनंती आहे येणाऱ्या आर्थिक बजेट मध्ये बुधवार पेठ साठी स्वतंत्र निधी द्यावा आणी हो परदेशी गुंतवणूक वाढवावी."*

भारतात देहविक्रीत पुण्यातील बुधवार पेठ तिसऱ्या क्रमांकावर येतं. बुधवार पेठ तब्बल 5000 वेश्यांचं शोषणाचं ठिकाण आहे. हा विक्रय "व्यवसाय" नाही, शोषण आहे. आपले शरीर हा कोणत्याही व्यक्तीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा शेवटचा किल्ला आहे आणि तो विकण्यासाठी व्यक्ती एकतर भांडवली शोषणाने अत्यंत मजबूर झालेली हवी किंवा भांडवली मूल्यमान्यतांनी एकदम बरबटलेली. दोन्ही बाबींमध्ये माल खरेदी-विक्री, "सबकुछ बिकता है" ला मान्यता देणारी मानवद्रोही भांडवली व्यवस्थाच काम करत असते. भांडवलशाहीने एक मुक्त बाजारपेठ जन्माला घातली ज्यामध्ये कारखान्यात उत्पादित केलेल्या मालापासून ते मानवी नातेसंबंध आणि मानवी शरीरा पर्यंत सर्व काही नफ्यासाठी विकले आणि विकत घेतले जाऊ लागले. आपल्या समाजात प्राचीन काळापासून देहविक्रय चालत आलेला आहे. त्याची सुरुवात

पान 14 वर

# महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम 2024

## जनतेच्या आंदोलनांना दाबण्याकरिता महाराष्ट्र सरकारचे पाऊल

✎ प्रवीण

महाराष्ट्रातील महायुती सरकारने 11 जुलैला विधानसभेत 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम 2024' सादर केले. या विधेयकाद्वारे "शहरी नक्षलवादाला" आळा घातला जाईल असे सरकारचे म्हणणे आहे. विधेयकांत मात्र "शहरी नक्षलवाद" म्हणजे नक्की काय याची व्याख्या केलेली नाही. नक्षलवादी संघटना तसेच त्यांना मदत करणाऱ्या व्यक्ती, संस्था व संघटना यांच्यावर कठोर कारवाई करण्याची तरतूद या कायद्यात केली असल्याची वल्गना सरकारने केली आहे. या कायद्याद्वारे जे लोक 'बेकायदेशीर संघटनेचे' सदस्य नाहीत परंतु ते त्या संघटनेच्या व्यक्तींशी संबंध ठेवतात, त्यांच्या बैठकांमध्ये सहभागी होतात किंवा त्यांना कोणत्याही स्वरूपाची मदत करतात, त्या सर्वांना या कायद्यान्वये गुन्हेगार ठरवले जाणार आहे.

प्रस्तावित कायद्याद्वारे आरोपी व्यक्तीला तुरुंगाची शिक्षा होईलच, परंतु त्याची संपत्ती सुद्धा जप्त करण्याचे अधिकार पोलिसांना दिले जाणार आहेत. हा कायदा राज्य पोलीस आणि इतर सुरक्षा संस्थांना, वॉरंटशिवाय आणि आरोपीस गुन्ह्याची माहिती न देता अटक अधिकृत बनवेल. ही अटक अजामीनपात्र असेल याचा स्पष्ट अर्थ असा आहे की अटक झालेली व्यक्ती खटल्याशिवाय तुरुंगात राहू शकते. हा कायदा पारित झाला तर या कायद्यांतर्गत सर्व अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असतील आणि त्यांचा तपास उप-निरीक्षक पदाच्या अधिकारी सुद्धा करू शकेल.

लोकसभा निवडणुकीत अपयश पदरी पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उल्लेख केला होता की विरोधकांच्या निवडणुक प्रचारात "अर्बन नक्षलीं"चा सहभाग होता. यावरूनही दिसत आहे की सरकारचा रोख त्या प्रत्येकाविरोधात आहे, ज्यांनी भाजप-शिवसेनेच्या फॅशिस्ट सत्तेला विरोध केला आहे.

### अर्बन नक्षल म्हणजे कोण?

अर्बन नक्षल म्हणजे नक्की कोण याची भाजप-संघ परिवाराकडे कोणतीही व्याख्या नाही. हा शब्द कायद्याने सुद्धा व्याख्यायित नाही. खरेतर, या शब्दाची व्याख्या न करता, त्या शब्दाला एका भयप्रद शब्द म्हणून वापरत मनमानीपद्धतीने विरोधकांवर आरोप लावणे हाच या शब्दामागील उद्देश आहे. आजवर या शब्दाला संघ-भाजप परिवारातील व्यक्ती व संघटनांनी जितक्या प्रकारे वापरले आहे, ते पाहता यामागील उद्दिष्ट स्पष्ट होते.

मे 2017 मध्ये स्वराज या संघपरिवाराच्या विचारांच्या मॅगझिन मध्ये संघ परिवाराच्या सर्वाधिक विखारी प्रचारकांपैकी एक विवेक अग्रिहोत्री यांनी म्हटले होते की "भारताचे अदृश्य शत्रू" म्हणजे अर्बन नक्सल. या व्याख्येतून खरेतर अज्ञाताचे भय सोडून काहीही सुचित होत नाही. परंतु जनतेमध्ये मात्र अशा शब्दप्रयोगांद्वारे षडयंत्रकारी पद्धतीने गैरप्रचाराची जमिन तयार होते. राजस्थानच्या निवडणुकीत तर प्रधानमंत्री मोदींनी भांडवलदार वर्गाच्या विश्वासू पक्षाला, काँग्रेसच्या प्रचारालाच, उद्देशून म्हटले की त्यांचा विचार अर्बन नक्सलींसारखा होत आहे, आणि पक्षावर अर्बन नक्सलींचा कब्जा झाला आहे. 2022 च्या गुजरात निवडणुकीत भांडवलदारांच्या दुसऱ्या विश्वासू पक्षाला, आम आदमी पक्षाच्या प्रचाराला, उद्देशून मोदी पुन्हा म्हणाले की अर्बन नक्सल चेहरा बदलून गुजरात मध्ये घुसू पहात आहेत. नर्मदा धरणाला विरोध करणाऱ्यांना (म्हणजे मेधा पाटकर व त्यांचे साथीदार यांच्यासारखे समाजवादी-गांधीवादी) सुद्धा त्यांनी अर्बन नक्सल म्हटले. 2022 मध्ये झालेल्या धनिक शेतकरी वर्गाच्या नेतृत्वातील तीन शेती कायदे विरोधी आंदोलनातही अर्बन नक्सल असल्याचा आरोप महाराष्ट्रातूनच झाला होता. अस्मितावादी राजकारणाला बळी पडलेल्या काही संघटनांनी आयोजित केलेल्या भीमा-कोरेगाव परिषदेनंतर अटक केल्या गेलेल्या पत्रकार, प्राध्यापक, मानवाधिकार कार्यकर्ते, इत्यादी अनेक कार्यकर्त्यांबद्दल अर्बन नक्सल असल्याचा प्रचार केला गेला. दिल्लीचे भाजपचे नेते मनोज तिवारी यांनी अरविंद केजरीवाल यांना "अर्बन नक्सलचे सर्वात मोठे उदाहरण" म्हटले होते. महाराष्ट्रात निघालेल्या शेतकऱ्यांच्या लाँग मार्चवेळी सुद्धा भाजपच्या नेत्यांनी त्याला अर्बन नक्सलची कारवाई म्हटले होते. या प्रचाराचा परिणाम तर इतका आहे की सोशल मीडियावर तर काही मोठ्या उद्योगपतींना सुद्धा "भक्तां"नी अर्बन नक्सल म्हटल्याचे दिसून येते. या अपप्रचाराच्या परिणामीच संघ परिवाराच्या या प्रचारा विरोधात अल्ट न्यूजच्या प्रतिक सिन्हा यांनी ट्विटरवर #MeTooUrbanNaxal असा ट्रेंड चालवला होता, जो काही वेळ सर्वोच्च ट्रेंड करत होता.

विरोधकांना उद्देशून तुकडे तुकडे गँग, देशद्रोही, अर्बन नक्सल, टर्बन नक्सल, वगैरे शब्दप्रयोग करणे आणि त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करणे ही एक सुव्यवस्थित संघी रणनीती आहे हे आता देशातील जनतेला चांगलेच समजू लागले आहे. सीपीआय(माओवादी) या संघटनेच्या कामांचा प्रसार शहरांमध्ये होत आहे या आरोपाखाली अर्बन नक्सल शब्दाचा प्रयोग संघ परिवारातील व हिंदुत्ववादी संघटनांकडून केला जातो. परंतु जंगलातील सीपीआय(माओवादी)ची चळवळ आज संपुष्टात येत असताना, आणि तिच्या विचारधारात्मक भरकटण्यातून ती अत्यंत कमजोर झालेली असताना भाजप-संघ परिवाराला "अर्बन नक्सल"ची कल्पना पुढे आणावीशी वाटते याचे कारण त्यांच्या मनात शहरातील कामगार-कष्टकरी जनतेची असलेली अतोनात भिती आहे. शेवटी आप, काँग्रेस, धनिक शेतकरी आंदोलन, भीमा-कोरेगावचे आरोपी, इत्यादी सर्वांमध्ये समान काय आहे - तर त्यांनी अत्यंत कमजोर पद्धतीने का असेना, भांडवलदार वर्गाच्या नग्न हुकूमशाही विरोधात आणि त्यांच्या भाजप-संघ प्रणित नेतृत्वाने व्याख्यायित केलेल्या हितसंबंधांविरोधात केविलवाणा का होईना सूर लावला होता, आणि बड्या भांडवलदारांव्यतिरिक्त लोकांच्या इतर हिश्श्यांचे काहीतरी आर्थिक हित मांडण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा अर्थ स्पष्ट आहे की कामगार-कष्टकऱ्यांच्या हिताचे कोणतेही आंदोलन भाजप-संघाच्या दृष्टीने अर्बन नक्सलच असणार आहे. नथुराम गोडसेचे वारस असलेल्या, इंग्रजांचे माफीवीर बनलेल्या सावरकरांचे वारस असलेल्या, आणि स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारकांसोबत गद्दारी करत त्यांना इंग्रजांच्या हवाली करणाऱ्यांचे वारस असलेल्या हिंदुत्ववादी शक्तींकडून आज सत्तेत बसल्यानंतर जनतेप्रती यापेक्षा कमी घृणेची अपेक्षा केलीही जाऊ शकत नाही.

### कायद्यातील मनमानी तरतूदी

या कायद्याला बनवताना "बेकायदेशीर संघटना" हा शब्दप्रयोग केला गेला आहे. कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर ठरवण्याचा सरकारी अधिकार खरेतर गैरवापराचा अधिकार आहे. बेकायदेशीर कृत्यांबद्दल बोलताना सुद्धा शांतता, सुव्यवस्था भंग करणे वा एकात्मतेला धोक्यासारखे शब्द वापरले गेले आहेत. या शब्दांची पूर्णत: स्पष्ट व्याख्या नसेल तर पोलिसांना मनमानी अधिकार दिलेले आहेत. हे वास्तव आपण उघड्या डोळ्यांनी पाहू बघतो की विखारी भाषणे देणाऱ्या संघ-भाजप-हिंदुत्ववादी परिवारातील अनेक वक्त्यांविरोधात कोणतेही गुन्हे दाखल केले जात नाहीत, परंतु जन-अधिकारांसाठी लढणाऱ्यांवर मात्र सर्रास खोटे गुन्हे दाखल केले जातात. शहरी नक्षलवाद म्हणजे नेमका कोणता गुन्हा याचा स्पष्ट उल्लेख कायद्यात नाही. यामुळे शांततेच्या मार्गाने चाललेल्या आंदोलनांना सुद्धा फक्त राजकीय़रित्या नक्षलवादी संबोधून त्यांवर कारवाई केली जाणार, आणि जनतेची सोयीची नसलेली सर्व आंदोलने दडपण्याची सरकारला संधी मिळणार हेच निश्चित.

या कायद्यानुसार सरकार अगोदर कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर घोषित करू शकते आणि त्यानंतर त्या संघटनेला कलम 5(1)(2) नुसार नेमलेल्या तीन व्यक्तींच्या सल्लागार मंडळासमोर फिर्याद करता येईल. म्हणजे अगोदर सरकार अशा संघटनेवर कारवाई करेल, त्यांचे काम अशक्य करेल, आणि नंतर तारखेवर तारीख पडत त्या संघटनेने सरकारनेच नेमलेल्या समितीपुढे स्वत:चे "निर्दोषत्व" सिद्ध करत बसायचे.

कायद्यातील कलम 9 व 10 नुसार पोलिस प्रशासन, कोणत्याही जागेला सील करू शकते. यावर दाद म्हणून उच्च न्यायालयात जावे लागेल जे बहुसंख्यांक जनतेच्या आवाक्याबाहेरचे आहे! कारवाई करणाऱ्या पोलिस व इतर अधिकाऱ्यांविरोधात दाद मागण्याचीही सोय कायद्याने ठेवलेली नाही.

कायद्यानुसार बेकायदा संघटनांचा सदस्य असल्याचे आढळून आल्यास किंवा अशा संघटनेच्या बैठकीत वा कृत्यांत सहभाग असल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि तीन लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा; सदस्य नसलेल्या पण अशा संघटनेला कोणत्याही प्रकारे मदत केल्यास वा संघटनेच्या सदस्याला आश्रय दिल्यास अशा व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास व दोन लाख रुपयांपर्यंत दंड; बेकायदा संघटनेचे वा तिच्या बैठकीचे व्यवस्थापन करणाऱ्यास तीन वर्षे तुरुंगवास आणि तीन लाख रुपयांपर्यंत दंड; बेकायदा कृत्य वा करण्याचा बेत याकरिता 7 वर्षांपर्यंत तुरुंगवास आाणि पाच लाख रुपयांपर्यंत दंड अशा तरतूदी आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या सद्यस्थापित निर्णयानुसार, व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ लावत कोणत्याही विचारांना मानणे वा न मानणे, वा बेकायदेशीर संघटनेचे सदस्य असणे गुन्हा ठरत नाही, तर फक्त बेकायदेशीर कृत्यच गुन्हा ठरते. परंतु प्रस्तावित कायदा या सर्व व्याख्यांना ओलांडून गुन्ह्याची व्याख्या करू पहात आहे. अर्थ लावायचाच झाल्यास एखाद्या तथाकथित बेकायदेशीर संघटनेच्या सदस्यांची फक्त ओळख आहे म्हणूनही कोणावर कारवाई केली जाऊ शकेल! व्यक्तींच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर म्हणूनच हा मोठा हल्ला आहे.

अशाप्रकारचे कायदे अगोदरच तेलंगणा, ओरिसा, छत्तीसगड, उत्तरप्रदेश सारख्या राज्यांमध्ये लागू आहेत, आणि तेथे त्यांचा योग्य वापर करत सरकारांनी अनेक जनपक्षधर संघटनांवर कारवाया केल्या आहेत.

या कायद्याद्वारे महाराष्ट्र सरकारने यू.ए.पी.ए. कायद्यातील "बेकायदेशीर कृत्या"ची व्याख्या विस्तारली आहे. आता सरकार विरोधातील आंदोलनालाही सरकार "शहरी नक्षलवाद" म्हणून दडपू शकते. यू.ए.पी.ए. कायदाच मुळात नागरी आणि लोकशाही अधिकार कार्यकर्त्यांची गळचेपी करण्यासाठी वापरला जातो आहे. मागील 10 वर्षात मोदी सरकार सत्तेत आल्या पासून बेकायदेशीर कृत्य (प्रतिबंध) अधिनियम (यू.ए.पी.ए.) कायद्याद्वारे सरकारविरुद्ध उठणाऱ्या प्रत्येक आवाजाला दाबण्याचे काम केले आहे. हा कायदा खटला न चालवता व्यक्तींना दीर्घ कालावधीसाठी तुरुंगात डांबून ठेवण्याची परवानगी देतो आणि व्यक्तींवर पाळत ठेवण्यासाठी आणि नियंत्रणासाठी पोलिसांना व्यापक अधिकार प्रदान करतो. मोदी सरकारने 2014 मध्ये सत्तेत आल्या पासून अनेक लोकशाही आणि मानवाधिकारांसाठी काम करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना वर्षानुवर्षे जेल मध्ये ठेवले आहे. यात अनेक पत्रकार, वकील, मानवाधिकार कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक, कामगार नेते, इत्यादी सामील आहेत. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून "बेकायदेशीर कृत्य प्रतिबंध कायदा, यू.ए.पी.ए. (UAPA)" विरोधाच्या आवाजाला दडपून टाकण्यासाठी वापरण्यात येणारे कायदेशीर हत्यार बनले आहे. टाडा, पोटा, यु.ए.पी.ए. आणि आता 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम 2024' सारख्या कायद्यांमागे खरे उद्दिष्ट दहशतवादाला आळा

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय: द्वारे बबन ठोके, देविका मेडिकोच्या वर, साई कृपा चाळ, साईबाबा मंदिराजवळ, वीर जिजामाता भोसले मार्ग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई - 400043 • मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित